१ फेब्रुवारी ६९ । चाळीस पैसे

# माणूस

नवीन जागेत 'माणूस'ने प्रवेश केला. हा बदल सर्व संबंधितांना कळविल्यानंतर लगेच यापैकी काहींनी पत्र पाठवून वा कार्यालयात समक्ष येऊन आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या. पहिल्या १।२ दिवसात झालेल्या पत्ररूप वा समक्ष गाठीभेटींची ही नोंद. 'माणूस परिवार' या सर्वांचा आभारी आहे.

— संपादक

। सर्वश्री ........................................ ।।
। अरविंद मंगरूळकर ........................ पुणे ।।
। वि. आ. बुवा ........................ कल्याण ।।
। स. ना. सूर्यवंशी ........................ नाशिक ।।
। शिवाजी सावंत ........................ कोल्हापूर ।।
। अनंत देशमुख ........................ अलिबाग ।।
। श्री. ज. जोशी ........................ पुणे ।।
। नरेंद्र बल्लाळ ........................ मुंबई ।।
। मधुकर कुलकर्णी ........................ पुणे ।।
। वि. म. गोगटे ........................ नाशिक ।।
। माधव कानिटकर ........................ पुणे ।।
। दिलीप पारिख ........................ मुंबई ।।
। प. वि. पटवर्धन ........................ पुणे ।।
। अशोक खरे ........................ मुंबई ।।
। बाबुराव इनामदार ........................ पुणे ।।
। दिलीप मुळे ........................ नांदेड ।।
। अच्युत कोल्हटकर ........................ सातारा ।।
। दिनकर शिर्के ........................ मुंबई ।।
। श्री. वा. काळे ........................ पुणे ।।
। सौ. सुहासिनी चांदककर ........................ सातारा रोड ।।
। हरि विश्वनाथ दात्ये ........................ पुणे ।।
। मधु कुलकर्णी ........................ नाशिक ।।
। प्रि. खं. कुलकर्णी ........................ पुणे ।।

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : छत्तिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. जानेवारी, २०

दि. १८-१-६९ च्या 'माणूस' मधील 'चलो देवनार' वाचून मन जितके चकीत तितकेच व्यथित झाले. असे मार्मिक व अर्थगर्भ लेखन हल्ली फार क्वचितच वाचावयास मिळते. श्री. ग्यानबांचे अंत:करणपूर्वक अभिनंदन !

याच अंकातील मोगूबाईंवरील कु. सुशिला अय्यर यांचा लेख भाषासौंदर्याच्या दृष्टीने हृद्य वाटला. कित्येक वेळी प्रश्न पडतो की, साहित्यक्षेत्रात ज्यांचे नावही कधी वाचले नाही असे लोक इतकी समर्थ व ओघवती भाषा लिहूच कसे शकतात ? त्यातूनही 'अय्यर' हे नाव काही मराठी नाही. कु. अय्यर यांनी केलेल्या निवेदनावर हा लेख आधारलेला असून तो एखाद्या समर्थ मराठी सारस्वताने मराठीतून लिहिला, असे तर झाले नाही ना ? तसे नसेल तर कु. अय्यर यांचे त्यांच्या ओघवत्या शैलीदार व समर्थन भाषेबद्दल मन:पूर्वक अभिनंदन !

मोगूबाईंबद्दलची अल्प माहिती–त्यांचा जन्म, शिक्षण, भाषा वगैरेसंबंधीची–या लेखात नाही. त्यामुळे, त्यांच्या वैयक्तिक जीवनाचा पुरेसा परिचय घडला नाही. त्यांची मातृभाषा मराठी आहे की नाही हे जाणण्याची तर

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मला फार उत्कंठा होती. यात प्रांताभिमान, भाषाभिमान वगैरे भावना नाही.

**सौ. गीता आठवले**, नागपूर

**स. न.** **जानेवारी, ४**

आपला ४ जानेवारीचा अंक आजच मिळाला. पुन: आपण खून खटले द्यायला सुरुवात केली हे बघून वाईट वाटले. आपल्या 'शुभं करोति', 'लाल व्होल्गा' वगैरे लेखमाला फारच सुंदर होत्या, पण दोन चांगल्या लेखमालांमधली गॅप भरण्यासाठी आपण मधे खून खटले देता हे काही खरे नव्हे आणि सगळ्यांत वैताग कशाचा येत असेल तर त्या खटल्यांच्या लेखांत आपण इंग्रजी मूळ लिखाण (मराठी भाषांतरानंतर) उद्धृत करता याचा. हा शुद्ध मराठीचा अपमान आहे, किंवा लेखकाला स्वत:च्या मराठीची खात्री नाही. आणि किती बंडल ठिकाणी मूळ इंग्रजी रचना देता! कायद्याची किंवा शास्त्राची क्लिष्ट तांत्रिक भाषा असेल आणि तिथे मराठी भाषांतराबरोबर मूळ इंग्रजी वाक्य दिल्यास समजू तरी शकेल. पण ह्या लेखातून मूळ इंग्रजी देणे हास्यास्पद आहे.

**अशोक साठे**, बंगलोर

**स. न.** **जानेवारी, २०**

आपल्या साप्ताहिकातील अॅड. माधव कानिटकरांची कथा–मागील 'रूपवती भार्या शत्रू:' व चालू 'तो मी नव्हेच' फारच आवडली. त्यांमधील इंग्रजी Version तर टॉप असते. पुरावे मस्त असतात. वर्णनीय असून कथेबद्दल आकर्षण जास्त आहे.

**रत्नाकर बक्षी**, कोल्हापूर.

**स. न.** **जानेवारी, २४**

राज्यनाट्य महोत्सवामध्ये झालेल्या पुणे केंद्रातील नाटकांच्या समीक्षणातील काही भागाला आक्षेप घेणारे श्री. अनंत ओक (दिग्दर्शक–मीही एक जटायू) यांचे पत्र वाचले. त्यांच्या पत्रामध्ये व्यक्त झालेले विचार पाहता माझ्या समीक्षणातील 'Healthy tone' श्री. ओक यांच्या लक्षातच आला नाही असे दिसते.

पी. डी. ए. या नाट्यसंस्थेच्या संदर्भात माझ्या लिखाणात मी कोठेही टीका केलेली नाही. त्यामुळे ती औद्धत्यपूर्ण असण्याचा प्रश्नच येत नाही. मात्र असे असूनही समीक्षक या नात्याने "संस्थेच्या सदस्यांखेरीज अशी टीका करण्याचा अधिकार कोणालाच–समीक्षकाला तर नाहीच नाही," या श्री. ओक यांच्या विधानाशी मी सहमत होऊ शकत नाही. अशी टीका करण्याचा सर्वांत जास्त अधिकार समीक्षकाला आहे, असे माझे मत आहे.

संस्था चालवताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मान्यवर संस्थांच्या भरीस कोणी पडू नये हे श्री. ओक यांचे विधान पलायनवादी आहे. क्वचित एखाद्या माणसाच्या नेतृत्वापायी जर उत्तम नाटयसंस्थेच्या प्रगतीत अडथळा येत असेल, तर समीक्षक या नात्याने त्या घटनेची दखल घेणे अगत्याचे आहे असेच मी मानतो.

आपल्या पत्राचे शेवटी " मान्यवर संस्थांना निवृत्त व्हा " म्हणून सांगणे याची इतरांना लाज वाटली पाहिजे, असे श्री. ओक म्हणतात.

माझ्या समीक्षणात संस्थेने निवृत्त व्हावे असे मी कुठेही लिहिलेले नाही. माझी अपेक्षा अशी की मंबई, नागपूरचे कलावंत स्पर्धेतील सर्वोच्च बहुमान दोन–तीन वेळा मिळाल्यानंतर आपण होऊन बाजूला होतात. स्पर्धेबाहेरील रंगभूमीवर ते कामगिरी बजावीत असतात आणि त्याची दखलही घेतली जाते. मग बाहेर जे घडते ते पुण्यात का होऊ नये ? असा माझा सवाल होता. त्याच दृष्टीने पी. डी. ए. च्या संदर्भात लिहिताना भालवांनी स्पर्धेच्या रंगभूमीवरून आता बाजूला व्हावे असे मी सूचित केले होते. माझे ते मत अजूनही कायम आहे.

श्री. ओक यांचे या खुलाशाने समाधान होईल, अशी अपेक्षा आहे.

**शरद गोखले, पुणे**

# ' माणूस ' महाराज ! वरचेवर असाच गाशा गुंडाळा !

जग ही एक रंगभूमी आहे !

असं शेक्सपीयर म्हणाला असं म्हणतात. प्रत्येकजणच तसं वेगवेगळ्या शब्दांत सांगत आला आहे. आमच्या भारतात तर यच्चयावत् साधुसंत, तत्त्वज्ञानी, परमार्थमार्गी मंडळी कंठशोष करून सतत बजावत आली आहेत की, बाबारे, ही दिसते ती सारी माया आहे !

आद्य शंकराचार्य म्हणाले होते,

" ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ।"

एवढी ती रम्या नगरी, केवढा तो महान् नृपती ! पण म्हणतात ना महाराज तसं झालं–

" लिखितमपि ललाटे प्रोंझितुम् क: समर्थ: ?"

मी जर्मन शिकवितो ना !

त्या भाषेतदेखील एक म्हण आहे :

Glueck und Glas
wie leicht bricht das !

नशीबाला नि काचेला किती सहज तडा जातो !

मनुष्य सारा पसारा मांडतो पण त्याला कधीतरी गाशा गुंडाळावाच लागतो !

हे सारं खरं आहे !

पण हे सारं तत्त्वज्ञान विनोदबुद्धीनंच ऐकायचं असतं !

माणूस जेव्हा जन्माला आला तेव्हाच त्याचा मृत्यू अटळ ठरला !

म्हणून काय कुणी बारशाच्या घुगऱ्या वाटत हसतखिदळत नाही ?

लग्नमुंजींचे मांडव आपण गाजवितो तेव्हा काय–" शुभ बोल रे नाऱ्या "–अशा प्रकारचं वक्तव्य कुणी करतो ?

लाल त्रिकोणानं कितीही गर्जना केल्यातरी गर्भाधान समारंभाला दूर्वा आणल्या जातातच !

अन् किती मझा येतो अशा वेळी !

जीवनाच्या या साऱ्या विनोदी झालरी आहेत ! अन् म्हणूनच मानवी जीवन सुसह्य होतं.

माणूस घर बांधतो तो तिथं सुखानं नांदण्याकरिता. आप्तेष्टांना तो आवर्जून निमंत्रण देतो नि वाजतगाजत वास्तुशांत करतो. आजकालची मध्यमवर्गीय मंडळी स्वतःचं घरकुल बांधतात, एखादा हक्काचा ब्लॉक घेतात, सहकारी घरयोजनेत सभासद होतात–त्या वेळी बहुधा त्यांचं वय पन्नाशीच्या आसपास टेकलेलं असतं. म्हणून काय कुणी त्यांना ओंकारेश्वराची आठवण करून देतं ?

'आता आमचे डोळे तिकडे लागले आहेत,' असं सांगणाऱ्या म्हाताऱ्यांची विनोदबुद्धी तर भारीच तल्लख असते. अजून कितीतरी पावसाळे पाहण्यास ते उत्सुक असतात !

हे सारं गंभीरपणानं सांगायचं कारण म्हणजे 'माणूस'ची अचाट विनोदबुद्धी ! 'माणूस' आता नारायण पेठेतून उठून १०२५ सदाशिव पेठेत, नागनाथ पाराजवळ मोठ्या जागेत राहायला गेला आहे. पण हे त्यानं आपल्या स्नेह्यांना ज्या पत्रिकेनं कळविलं आहे तिच्या पानावर लिहिलं आहे ते चक्क असं :–

" अखेर 'माणूस'ने गाशा गुंडाळला !"

प्रथमदर्शनी वाचक मनाशी पुटपुटतो, " अरेरे ! पण काय म्हणून ? "

आतल्या पानावरचा खुलासा वाचून त्याचा जीव मांड्यात पडतो. 'माणूस' मोठा होत आहे, त्याला मोठी जागा शोधावी लागली हे वाचून कुणाला आनंद होणार नाही ?

ही माणसं स्वतःचीच अशी मौज उडवितात ! वा: फार छान ! स्वतःचीच जो टिंगल करू शकतो त्याची विनोदबुद्धी खरी जिवंत नि प्रखर असते असं म्हणतात !

' माणूस 'च्या विन्हाडी एकंदरीत खूपच गंमत चालते हे माझ्यासारख्या त्याच्या घरच्याच माणसाला तसं माहीत आहे. तथापि या दोस्त लोकांच्या विनोदबुद्धीचा पल्ला इतका अकटोविकटोपर्यंत पोचला असेल याची मला कल्पना नव्हती. 'माणूस'ची ही पत्रिका पाहून मार्क ट्वेननंही शरणागती दिली असती, गडकरीही पोट धरून हसले असते, आचार्य अत्रे तर हसूनहसून ' गडबडा लोळायला ' लागतील, पु. लं. चा चष्मा उडून अरबी समुद्रात जाऊन पडला नाही म्हणजे मिळविली !

पुढं कधीकाळी उंदीर-घुशी बिळं करतील म्हणून घर बांधायचं कोणी सोडलं आहे का ? इति मोरोपंत. घर बांधायच्या वेळी माणसाला मोरोपंतांची ही आर्या आठवते नि तो खदखदून हसतो.

Fools build houses, wise men live in them !

ही म्हण ऐंशी टक्के खरी आहे असं मानणारा नवा घरमालक तिच्यावर शंभर टक्के खूष होतो नि आपलं घर अधिकाधिक सुंदर करायच्या कल्पनेत मश्गुल होतो ! अशा या म्हणी माणसाची विनोदबुद्धी जागृत करतात नि त्याला अधिक कार्यप्रवृत्त करतात असं नाही का तुम्हांला वाटत ? " कर्मण्येवाधिकारस्ते, " असं सांगणाऱ्या भगवान् श्रीकृष्णांच्या व्याख्यानाचा इत्यर्थ काय तर हाच. काम करत राहा, पण गाशा गुंडाळायचीही तयारी ठेवा ! तात्पर्य काय, तर स्थितप्रज्ञ व्हा !

आमचा ' माणूस ' स्थितप्रज्ञ झाला आहे ! त्याला भगवद्गीतेचा अर्थ उमजला आहे असं दिसतं !

माणसानं सतत कार्यरत राहावं, स्वतःचा धर्म आचरावा म्हणजेच आपलं कर्तव्य एकनिष्ठेनं पार पाडावं, त्यातच खरा आनंद आहे ! आपल्या पूर्वजांची या बाबतीतली विनोदबुद्धी पार आकाशाला गवसणी घालणारी ! काय म्हणे तर, " गृहीत-इव केशेषुमृत्युना धर्ममाचरेत् ! "

केवढं मोठं दृश्यकाव्य, जणू एक नाटचच या ओळीत भरलं आहे !

माणसानं सतत आपलं विहीतकर्म करत राहावं, अन् मनाशी खूणगाठ बांधून ठेवावी, की आपली शेंडी कायमची यमानं हाती धरली आहे ! तो त्या शेंडीसह आपणांस केव्हा उचलून नेईल याचा भरंवसा नाही !

' माणूस 'ने आपला गाशा गुंडाळला याचा अर्थ आता कळला ना तुम्हांला ?

' माणूस 'ला मानवी जीवनाचा अर्थ उमगला आहे, त्याला स्थितप्रज्ञत्व प्राप्त झालं आहे.

म्हणजेच शेंडी तुटो वा पारंबी तुटो, या जिद्दीनं तो आता वाचकांची सेवा करणार आहे !

अशा प्रकारे आणखीही मोठमोठ्या जागांत, बंगलीत, प्रासादात गाशा गुंडाळण्याची पाळी ' माणूस 'वर यावी, हीच सर्वांची इच्छा असणार !

**व्यं. न. कुलकर्णी**

सु. ल. सोमण

# शाही दांपत्याची भारतभेट

इराणच्या शाही दांपत्याने आपली प्रदीर्घ भारतभेट पंधरा दिवसांपूर्वी आटोपली व मुंबईहून इराणकडे प्रस्थान ठेवले. ह्या भेटीला अमाप प्रसिद्धी मिळाली. राष्ट्रातल्या प्रमुख वृत्तपत्रांनी रेझा पहलवी शाह व शाहबानू फराह ह्यांच्या भारतभेटीच्या निमित्ताने खास पुरवण्या प्रसिद्ध केल्या, अग्रलेख लिहिले. ह्या भेटीच्या वेळी असे वातावरण निर्माण झाले होते की, जणू इराण-भारताचे गाढ मित्रत्वाचे संबंध आहेत. मुळात इराणच्या राजप्रमुखांची ही इतक्या मित्रत्वाची पहिलीच भारतभेट. एरवी आतापर्यंतचे ह्या दोन राष्ट्रांतले संबंध तितकेसे मित्रत्वाचे नव्हते. त्यामुळेच व ह्या भेटीच्या यशस्वी सांगतेमुळे, ह्या दोन देशांत मित्रत्वाचे नवीन भरीव नाते ह्या पुढच्या काळात निर्माण होईल असे मानायला हरकत नाही. ह्या इराणी दांपत्याचे भारतात सर्वत्र स्वागतही अमाप उत्साहाने झाले. ह्या स्वागतात देशातल्या इराणी समाजाबरोबरच भारतीयांनीही भाग घेतला. शाही दांपत्याची ही भेट दोन देशांमधल्या सहकार्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे. ह्या भेटीत इतर अनेक प्रश्नांबरोबरच दोन देशांतल्या व्यापारात वृद्धी व्हावी ह्या दृष्टीनेही बोलणी झाली. दोन्ही राष्ट्रांच्या सहकार्याने इराणमध्ये प्रकल्प आखले जावेत, भारताने इराणला तंत्रज्ञान पुरवावे वगैरे बाबींवर चर्चा झाल्या. इतकेच नाही तर इराणचे शहा भारतात असतानाच इराणच्या पहिल्या तंत्रज्ञ तुकडीचे शिक्षणार्थ म्हणून ह्या देशात आगमन झाले ! टाटा खत प्रकल्पासाठी अमोनियाचा पुरवठा करण्याचे मान्य करून शहांनी त्या गाजलेल्या प्रकल्पाबाबतचा एक महत्त्वाचा अडसर दूर केला. अमेरिकन सहकाऱ्यांनी दगा दिला आहे, श्री. गाडगीळ व डॉ. के. व्ही. आर. राव ह्यांचा ह्या प्रकल्पाला विरोध आहे, ह्या गोष्टींचा विचार ह्या ठिकाणी अर्थातच अप्रस्तुत आहे ! सेन्टोचे समासद राष्ट्र, तुर्कस्थान, इराण व पाकिस्तान ह्यांच्या सामाजिक विकास मंडळांतले एक राष्ट्र. १९६५ च्या भारत-पाक लढ्यातले पाकिस्तानचे पक्षपाती राष्ट्र, ह्या नात्यांनी आजपर्यंत ओळखल्या जाणाऱ्या इराणने भारताबरोबरच्या मैत्रीबाबत दाखवलेली ही आस्था, भारताला नवीन होती. आणि ह्याच कारणाने, आपल्या नवनवीन आश्वासनांनी भारताच्या काश्मीरविषयक भूमिकेबाबतच्या त्यांच्या विचारांनी, इराणच्या शहांनी भारतीयांना सुखद धक्के दिले—आणि म्हणूनच त्यांची ही भारतयात्रा अत्यंत गाजली ! देशात ठिकठिकाणी विखुरलेल्या हॉटेलवाल्या व अन्य इराणी समाजाच्या

मायभूमीचे–इराणचे–भारताशी पुन्हा जवळचे संबंध निर्माण करण्याची शक्यता ह्या शाही दांपत्याच्या भारतभेटीने वाढीस लागेल !

इराण आज एक विकसनशील राष्ट्र म्हणून ओळखले जात आहे. १९५३ च्या यादवीत इराणच्या शहेनशहांना देश सोडून परागंदा व्हावे लागले होते. नंतर काही राजनिष्ठ व ब्रिटन-अमेरिका इत्यादी राष्ट्रे यांचे सहकार्य घेऊन त्यांनी पुनश्च इराणचे राज्यपद बळकावले. पण त्यानंतर मात्र खरोखरच देशाचा कायापालट करण्याचे कार्य धडाडीने चालू आहे. विशेषत:, रेझा पहलवींच्या कारकीर्दीत गेल्या पाच-सात वर्षांत–इराणचे चित्र झपाट्याने बदलत आहे. इराणच्या शहांनी स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखून, सेन्टो, तुर्की-पाकिस्तानी मित्रराष्ट्रे व ब्रिटन-अमेरिका ह्या मर्यादित वर्तुळाबाहेर पाऊल टाकले आहे. आज इराणचे अनेक राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित होत आहेत. एकेकाळी अशक्य वाटत असलेले रशियन सहकार्यही इराणने संपादले आहे. सध्या रशिया एक पोलाद कारखाना इराणमध्ये काढत आहे. इराणने काही शस्त्रास्त्रेदेखील रशियाकडून मिळवली आहेत. शहांच्या ह्या नवीन धोरणाने इराणचा व्यापार अन्य राष्ट्रांशी वाढत आहे. रशियासह अनेक पौर्वात्य राष्ट्रांना तेल व गॅस इराण पुरवीत आहे !

इराणची सांपत्तिक स्थितीही आज सुधारत आहे व सर्वसामान्य माणूस आज अधिक चांगले दिवस पाहत आहे, ह्यालाही शहांची नवीन धोरणे कारणीभूत आहेत. शहांनी स्वत:ची मालमत्ता, जमीन वगैरे राष्ट्राला दिली आहे व त्या पाठोपाठच जमीनदारी, मक्तेदारी नष्ट केली आहे. कुळांना सहकारी शेतीचा मंत्र दिला आहे. कामगारांना व्यवसायाच्या फायद्यात भागीदार बनवून घेतले गेले आहे. गेल्या चार वर्षांत इराणच्या राष्ट्रीय उत्पन्नात अकरा टक्क्यांनी वाढ झाली आहे व त्या मानाने मालाच्या किंमतींतली वाढ खूपच कमी झाली आहे. इराणच्या ह्या भरभराटीला त्या देशातल्या खनिज तेलांच्या साठ्यांनी फार मोठा हातभार लावला आहे. शहांच्या कारकीर्दीत ह्या तेलाच्या उत्पादनात, १९५८ पासून साडेबारा टक्क्यांनी वाढ झाली आहे. खनिज तेले व वायू ह्यांच्यामुळे इराणपुढे परकी चलनाचा प्रश्न फारसा नाही. तेले व वायू हवे तेवढे डॉलर्स, पौंड, रुबल्स खेचून आणताहेत. इराणच्या चौथ्या योजनच्या शेवटच्या वर्षात केवळ खजिन तेला-मुळे इराणला जवळजवळ तेराशे कोटी रुपये मिळाले; परंतु मिळणारी ही प्रचंड संपत्ती विकासाकडे योजनापूर्वक वळवली जात आहे, ह्याचे श्रेय मात्र शहांनाच जाईल ! पर्शियन गल्फमधल्या इतरही अनेक राष्ट्रांना ह्या नैसर्गिक संपत्तीचा वाटा मिळलेला आहे. आणि तरीही त्या राष्ट्रांची आजही आर्थिक दुर्दशा आहे. ह्या उलट, इराणमधला प्राथमिक शिक्षकदेखील ५०० ते ७०० रुपये सुरुवातीला मिळवतो !

पण इराणपुढे आजही अनेक प्रश्न शिल्लक आहेत. विशेषत:, शेतीविषयक प्रश्नां

मध्ये इराणला अजून बराच पल्ला गाठायचा आहे. चौथ्या योजनेत राष्ट्रीय उत्पादनात ९ टक्के व दरडोई उत्पन्न ५०० रु. पर्यंत वाढले असले तरी शेतकी उत्पादनात अवघी पावणेदोन टक्के वाढ झाली आहे. ह्याशिवाय शास्त्रीय व तांत्रिक शिक्षण ह्यांबाबतही इराण फार मागे आहे. आणि ह्याच क्षेत्रात आज इराणला भारत साहाय्य करू शकेल, तिथे भारतीय तंत्रज्ञ पाठवून प्रकल्पांची उभारणी करू शकेल व भारताच्या परकी चलनावरील ताण कमी करू शकेल. शहांच्या भेटीची एवढी फलनिष्पत्ती झाली तरी खूप आहे!

तीन कोटी इराणी जनतेच्या ह्या प्रमुखांनी भारत–पाक प्रश्नांबाबत, उभयतांनी मान्यता दिल्यास व तडजोडीची शक्यता दिसल्यास, मध्यस्थी स्वीकारायची तयारी दर्शविली आहे. ह्या उत्तरात त्यांनी भारत–पाक वादात स्वतःला गुंतवून न घेण्याचेच धोरण अवलंबलेले दिसते आहे. पाकिस्तान मग भले त्यांच्या ह्या वक्तव्याचा काहीही अर्थ घेवो. भारत–इराणच्या नवीन मित्रत्वाच्या संबंधांच्या दृष्टीने पाक–प्रश्नांवर इराणने मत व्यक्त न करणे जास्त हितकर आहे. काश्मीरविषयक भारताच्या धोरणाला मान्यता देऊन, उपखंडात पक्षपाती धोरण न स्वीकारता, दोन राष्ट्रांत मैत्री, सांस्कृतिक–तांत्रिक–औद्योगिक सहकार्य करण्याचा मानसच शहासाहेबांनी व्यक्त केला नसेल ना? तसे असेल तर 'फिरदौसी'च्या लाडक्या भारताची त्याच्या इराणशी जानी दोस्ती होऊ शकेल. दोन्ही राष्ट्रांच्या अन्य राष्ट्रांबरोबरच्या हितसंबंधांना बाध न येता!

## कॉमनवेल्थ कशासाठी?

लंडनला राष्ट्रकुल–पंतप्रधानांची बैठक नुकतीच संपली. इंग्लंडचे साम्राज्य डळमळीत होऊ लागले, एकेक राष्ट्र ब्रिटिश गुलामगिरीतून मुक्त होऊ लागले आणि त्याच वेळी, ह्या नवोदित राष्ट्रांवर थोडीशी तरी आर्थिक, राजकीय पकड असावी, जागतिक राजकारणात ह्या राष्ट्रांच्या समूहाचा काही प्रभाव पडावा ह्या कल्पनेतून कॉमनवेल्थ–ब्रिटिश साम्राज्यातून बाहेर पडलेल्या राष्ट्रांचा ब्रिटनच्या नेतृत्वाखालील समूह–ह्या संस्थेची उभारणी झाली. ह्या राष्ट्रांचे प्रमुख ठराविक कालावधीनंतर लंडनला जमतात, कॉमनवेल्थ अंतर्गत व जागतिक प्रश्नांवर चर्चा करून काही मार्ग काढायचे प्रयत्न करतात. आजवर अशा तऱ्हेच्या अंतर्गत व जागतिक प्रश्नांवर भरीव मार्गदर्शन करण्यात ह्या संस्थेला कधीही फारसे जमले नाही. २८ राष्ट्रांच्या कॉमनवेल्थ–परिषदांतून, कॉमनवेल्थ–अंतर्गत प्रश्नांवरही सर्वमान्य निर्णय कधी घेतले गेले नाहीत. यंदाच्या 'मार्लबरो हाऊस'मधील परिषदेमध्ये दक्षिण आफ्रिका, ऱ्होडेशियातले स्मिथ सरकार, बायफ्रा प्रश्न, भारत–पाक संबंध, इमिग्रेशन धोरण, केनिया, युगांडा वगैरे राष्ट्रांचे आफ्रिकीकरणाचे धोरण–वगैरे अनेक

प्रश्न उघडपणे व त्याप्रमाणे खासगीरीत्या चर्चिले गेले; परंतु कुठलाही निर्णय घेणे, ठाम धोरण आखणे, मार्गदर्शक तत्त्वप्रणाली तयार करणे ह्या बाबतींत कॉमनवेल्थला यश मिळाले नाही.

आर्थिकदृष्टचा नवोदित राष्ट्रांना ब्रिटनमार्फत थोडेबहुत साहाय्य झाले आहे. नाही असे नाही. परंतु असे साहाय्य कॉमनवेल्थसारख्या कुठल्याही बंधनाशिवायही दोन राष्ट्रांत होऊ शकते. राजकीयदृष्टचा एक प्रभावी शक्ती म्हणूनही कॉमनवेल्थचा जागतिक राजकारणावर कुठलाही प्रभाव पडलेला नाही. खुद्द दोन कॉमनवेल्थ राष्ट्रांमधले झगडेही कॉमनवेल्थ निस्तरू शकलेली नाही. अशा परिस्थितीत, कॉमनवेल्थ चालू ठेवण्याचा अट्टाहास का व्हावा ? आज कॉमनवेल्थमध्येही काळा–गोरा भेद आहेच. खुद्द ब्रिटन व अन्य गोऱ्या राष्ट्रांत काळ्या सभासदांबद्दल सौहार्द नाही. अनेक आशियायी–आफ्रिकी राष्ट्रे आज समाजवाद–साम्यवादाकडे झुकू पाहत आहेत, त्यांनाही ब्रिटन–कॅनडा–ऑस्ट्रेलियाविषयी आत्मीयता नाही. त्यांच्याविषयी विश्वास नाही. साहजिकच कॉमनवेल्थमध्येच 'गोरे कॉमनवेल्थ' व 'काळे कॉमनवेल्थ' अशी अंतर्गत शकले पडलेली आहेत. 'कॉमनवेल्थ'मुळे ब्रिटनला युरोपियन सामाईक बाजारपेठेत प्रवेश मिळणे जड जात असल्यामुळे ब्रिटिश जनतेचाही कॉमनवेल्थ राबवण्याच्या कल्पनेला विरोध आहे. आफ्रिकी व आशियायी राष्ट्रांनाही कॉमनवेल्थपासून तसा कुठलाही फायदा झालेला नाही. ह्या राष्ट्रांतून राष्ट्रव्यापी कल्पना फोफावत आहेत आणि त्यातूनच स्वामित्वाचा वारसा सांगणाऱ्या कॉमनवेल्थला विरोध होत आहे.

असा सर्वच बाजूंनी विरोध होत असताना व कुठल्याही प्रकारचे कार्य कॉमनवेल्थमार्फत पार पडत नसताना, कॉमनवेल्थ राबवण्यात काय फायदा आहे ? प्रचंड खर्च, निष्कारण वायफळ चर्चा ह्यांसाठी ही मृतप्राय कॉमनवेल्थ राबवायची का ?



ह्यापेक्षा अधिक भरीव कार्य समान प्रश्न, समान प्रणाली असणाऱ्या राष्ट्रांच्या जवळ येण्याने होऊ शकेल. दोन राष्ट्रांच्या प्रत्यक्ष चर्चेतून होऊ शकेल, मग कॉमनवेल्थचा फापटपसारा कशासाठी ? ह्या प्रश्नाचे उत्तर सर्व कॉमनवेल्थ राष्ट्रप्रमुखांना आज ना उद्या द्यावेच लागेल.

## रशियन आघाडी

सोयुझ–४ आणि सोयुझ–५ ह्या अवकाशयानांच्या अंतराळ विक्रमामुळे, मूलभूत वैज्ञानिक पाया भक्कम करण्याच्या दृष्टीने रशियाने अमेरिकेवर निःसंशय आघाडी मिळवली आहे. आपल्या नेहमीच्या प्रथेनुसार, कुठलाही गाजावाजा न करता, कुठलीही पूर्वप्रसिद्धी न देता १४–१५ जानेवारीला, रशियाने कर्नल खुर्नोव्ह, कॅप्टन व्ही. व्होलिनीव, कर्नल येवजेनी क्रूनोव्हा आणि ॲलेक्सी एलिसेयेव ह्या आपल्या चार अंतराळवीरांना सोयुझ–४ आणि सोयुझ–५ मधून अवकाशात पाठवले, अंतराळात दोन्ही यानांना एकत्रित केले, सोयुझ–५ मधून बाहेर पडून क. येवजेनी क्रूनोव्हा आणि ॲलेक्सी एलिसेयेव यांना अंतराळात अधांतरी जवळजवळ तासभर चालवले व नंतर त्यांना सोयुझ–४ मध्ये प्रवेश करायला लावला आणि ही दोन्ही अंतराळयाने शेवटी, ठरलेल्या वेळेनुसार मध्यपूर्वेत, कझागस्तानात परत उतरवली. आता कदाचित् चंद्रावर मानव प्रथम उतरवून अमेरिका आघाडी संपादीलही, परंतु ती केवळ चंद्रावरील स्वारीपुरती मर्यादित राहील; परंतु कायमची अंतराळस्थानके प्रस्थापित करून तिथून प्रचंड अशी अवकाशयाने सोडायची (अशा स्थानकांवर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा जोर कमी असल्याने, वातावरण व हवेचा दाब नसल्याने ह्या स्थानकांवरून ही उड्डाणे पृथ्वीवरून होणाऱ्या उड्डाणांपेक्षा अधिक सुलभ ठरतील, कमी त्रासाची ठरतील व सहजशक्य होतील.)—ह्या मूलभूत योजनेच्या अंमलबजावणीत रशियाने अमेरिकेवर निश्चित आघाडी संपादली आहे. अशा तऱ्हेचे स्थानक निर्माण करायच्या दृष्टीनेच हा सोयुझ-४ आणि सोयुझ-५चा प्रयोग होता व तो कल्पनेबाहेर यशस्वी झाला आहे. आणि अशी अंतराळेस्थाने स्थापन झाली की अन्य ग्रह व चंद्र ह्यांवरील पुढच्या स्वाऱ्या अधिक जोमाने आखता येतील. ह्या सर्व रशियन अंतराळविक्रमाचे मूळ प्रवर्तक आहेत, रशियन अवकाशशास्त्रज्ञ कॉन्स्टॅन्टिन त्सिल्कोव्हस्की !

अमेरिकन अंतराळयान व रशियन अंतराळयान ह्यांतला आणखी एक महत्त्वाचा फरक म्हणजे, अमेरिकन अवकाशयानातले सर्व कार्यक्रम बोर्मन, अँडर्स ह्यांना स्वतः पार पाडावे लागले, तर रशियाच्या दोन्ही अंतराळयाने एकमेकांपासून जवळजवळ शंभर यार्डावर येईपर्यंत सर्व क्रिया आपोआप या प्रयोगांत घडत गेल्या. रशियाच्या यशाने अवकाशसंशोधनात एक महत्त्वाचे पुढचे पाऊल टाकले गेले आहे.

अमेरिका–रशियाचे हे अंतराळ विक्रम चालू असतानाच दि. १९ ला भारता-तर्फे 'युनो'च्या सर्वसाधारणसभेत एक सूचना मांडली. रॉकेट्स्, पृथ्वीभोवती फिरणारी अवकाशयाने व मानवनिर्मित उपग्रह, वगैरेंमुळे व ह्या आयुधांच्या चुकीच्या प्रक्षेपणामुळे जर काही नुकसान इतर राष्ट्रांना पोचले तर त्यांना भरपाई दिली जावी. भारताच्या ह्या सूचनेला, आमसभेत कुणाकडूनही विरोध झाला नाही. मानवी प्रगतीचे, वैज्ञानिक भरारीचे कौतुक करीत असतानाच, दोन बड्यांव्यतिरिक्त इतर राष्ट्रांच्या मनात कुठले विचार डोकावतात ह्याचेच हे प्रतीक नाही का ?

---

## पाटील साहेब, लिहाच तुम्ही !

---

'गांधीजींच्या जीवनाचे विविध पैलू' ह्या विषयावर प्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रा. न. र. फाटक वर्षभर एक व्याख्यानसत्र सुरू करणार आहेत. श्री. फाटकांच्या ह्या व्याख्यानसत्राचे, परवा मुंबईला साहित्यसंघात श्री. स. का. पाटलांनी उद्घाटन केले. "पाकिस्तानच्या प्रश्नावर नेहरू व पटेल ह्यांच्याविरुद्ध माझ्यासारख्या ७८ वर्षे वयाच्या म्हाताऱ्याने तलवार उपसावी काय ? असा प्रतिसवाल गांधींनी आपल्याला केला होता." असे श्री. स. का. पाटील ह्यांनी ह्या प्रसंगी बोलताना सांगितले. ह्याच भाषणात बोलताना श्री. पाटील पुढे म्हणाले की, "नेहरू-पटेल–वादांत मी स्वतःच इतका खोल उतरलेला होतो की आज त्याबद्दल मी सहज हजार पानांचा ग्रंथ लिहू शकेन." फाळणीच्या वेळी नक्की काय घडले, पटेल-नेहरू-गांधी आणि विरोधक त्याला कितपत जबाबदार होते ह्याविषयी नेहमीच उलटसुलट मतप्रवाह वाहताना आढळून येतात. दोन्ही पक्ष उभयतांवर आरोप-प्रत्यारोप करीत असतात. पाटील, कै. गाडगीळ वगैरे थोडीशीच मंडळी अशी आहेत की ज्यांचा ह्या प्रकरणा-तील महत्त्वाच्या व्यक्तींशी वैयक्तिक व अत्यंत जवळचा संबंध आला होता. खऱ्या इतिहासाच्या निर्मितीच्या दृष्टीने आणि पुढच्या राज्यकर्त्यांना बोध घेण्याच्या दृष्टीने ह्या व्यक्तींनी खुलेपणाने सर्व हकीकती पुढे मांडणे–लिहून ठेवणे आवश्यक आहे. तो वाद काय होता, त्याचे परिणाम तात्कालिक राजकारणावर काय झाले, त्यावर पाटलांचे भाष्य काय, हे सर्व म्हणूनच सर्वांच्या व विशेषतः देशाच्या हिताच्या दृष्टीने पाटलांनी सांगणे, लिहून काढणे आवश्यक वाटते.

O

## ☐ प्रश्न नेहमी विचाराधीन असावा !

पंतप्रधान इंदिराजी राष्ट्रकुल परिषदेसाठी लंडनला जायला निघाल्या. मोहिमेवर जाण्यापूर्वी सेनापतींना निरनिराळ्या आघाड्यांवर रवाना करणे हे राजाचे कामच असते. इंदिराजींनी गृहमंत्री यशवंतराव चव्हाण व गृहसचीव सिंग यांना बोलवणे धाडले. दोघे लगबगीने पंतप्रधानांच्या वाड्यावर दाखल झाले. अगदी निघायच्या वेळी हे काय तातडीचे काम निघाले हे त्यांना कळेना. देशात नक्सली बंडे ठिकठिकाणी उभी राहत होती, त्यांना आवरण्याचे आदल्या दिवशीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतच नक्की झाले होते. मग आता हे जाता जाता काय काम निघाले ? दोघे इंदिराजींसमोर गेले तेव्हा पंतप्रधान संतापाने फेऱ्या मारीत होत्या.

सिंग यांनी पुढे होऊन अदबीने वर्दी दिली—

" सरकार, आम्ही आलो आहोत... "

" सगळा उशीर झाला आहे... "

पंतप्रधानांचे वाक्य संपण्यापूर्वी यशवंतराव म्हणाले—

" उशीर झालाच नाही असे म्हणणारा मी नाही. मी हे मानतो की उशीर होऊ शकतो. "

" मग आता धर्मयुद्ध पुकारा...Start Crusade..."

" सरकार, धर्मयुद्ध कसे पुकारणार ? आपण निधर्मी आहोत ना ?... " सिंग.

" तुम्ही बोलू नका मध्ये मध्ये ! गृहमंत्र्यांना सांगते आहे मी. यशवंतराव, धर्मयुद्ध पुकारा—जातीयवादाविरुद्ध. गेल्या दहा वर्षांत जातीय दंगलीने जितकी माणसे मारली गेली त्यापेक्षा अधिक गेल्या एका वर्षात मारली गेली. पूर्व पाकिस्तानात दंगे झाले तर त्याची प्रतिक्रिया म्हणून इथे दंगली होत. आता पाकिस्तानात जातीय दंगली होत नाहीत... "

" सरकार पाकिस्तानात आता मारण्यासारखे हिंदू शिल्लक नाहीत. साफसफाई आणि भंगीकाम यांसाठी लागतात तेवढेच हिंदू तिथे... " सिंग.

" यशवंतराव... हे का मध्ये मध्ये बोलत आहेत ? गृहसचीवांजवळची अनावश्यक माहिती मला नको आहे. त्यांना गप्प बसायला सांगा... "

यशवंतरावांनी सिंग यांना डोळ्याने चापताच सिंग गप्प बसले.

" कुठवर आले होते मी ? "

" पाकिस्तानात जातीय दंगली होत नाहीत... "

" तर पाकिस्तानात जातीय दंगली होत नसताना इथे दंगली होतात याचा अर्थ काय ? क्षुल्लक भांडणातून दंगल पेटते. ते काही नाही. तुम्ही कामाला लागा ! राष्ट्रकुल परिषदेत अर्शद हुसेन प्रश्न काढील तेव्हा मला सांगता आले पाहिजे, की जातीयवादाविरुद्ध धर्मयुद्ध सुरू झालेले आहे. "

इंदिराजींनी निरोप देताच गृहमंत्री व गृहसचीव तडक कचेरीत परतले. गृहमंत्र्यांना कारवाई करणे सोपे जावे यासाठी गृहखात्याने देशातील जातीयवादी प्रवृत्तींचा शोध सुरू केला. कोण काय बोलतो याची नोंद सुरू झाली.

पहिल्याच दिवशी गृहसचिवांनी ' भारतीय मजलिसे मिल्लत 'चे अध्यक्ष सय्यद हुसेनी यांच्या निवेदनाचे कात्रण गृहमंत्र्यांपुढे ठेवले. ' बीड ' ला भीड चेपलेल्या हुसेनींनी सांगितले—

" मुसलमानांना संरक्षण देण्यास भारत सरकार अयशस्वी ठरले आहे. मुसलमानांनी स्वतःच संरक्षणास सिद्ध झाले पाहिजे. गोळवलकर गुरुजी म्हणतात—येथून देश सोडून निघून जा. हे आम्हांला सांगणारे कोण ? हिंदूंनीच या देशातून प्रथम बाहेर पडावे ! "

सिंग यांनी विचारले—

" सय्यद हुसेनी यांच्याविरुद्ध मुसलमानांना चिथावणी दिल्याच्या आरोपावरून कारवाई करावयाची का ? "

गृहमंत्री विचारात पडले. कारवाई कशी करणार? इंदिराजी म्हणतात तेच सय्यद हुसेनी म्हणतात ! सरकार असमर्थ ठरले आहे. कारवाई गोळवलकर गुरुजींविरुद्ध केली पाहिजे. गृहमंत्र्यांनी सिंग यांना सांगितले—

" गोळवलकर गुरुजी मुसलमानांनी या देशातून जावे असे कधी म्हणाले का ? म्हणाले असले तर कधी म्हणाले, कुणाजवळ म्हणाले, याचा शोध घ्या. सय्यद हुसेनीलापण विचारा की मुसलमानांनी इथून पाकिस्तानात जावे असे कदाचित कुणी सांगितले असले तरी हिंदूंनी इथून कुठे जावे हे कुणी सांगत नाही ! हिंदूंनी कुठे जावे असे सय्यद हुसेनींना वाटते ? "

दुसऱ्या दिवशी सहा जानेवारीला सिंग धावत आले—

" कारवाई करता येईल अशी घटना सापडली आहे साहेब. आपले कांग्रेस

अध्यक्ष निजलिंगप्पा काल त्रिवेंद्रमला काँग्रेस भवनावर स्पष्टपणे म्हणाले—" मल-पुरम जिल्हा निर्माण करण्याची केरळ सरकारची कल्पना भयंकर आहे. त्यामागे जातीय द्वेष निर्माण करण्याचे कारस्थान आहे ! " आता चौकशीत वेळ घाल-वण्याचे कारणच नाही. निजलिंगप्पाच फिर्यादी आहेत ! नंबुद्रीपादला पदच्युत करू. जातीय द्वेष निर्माण करण्याचा हा प्रयत्न हाणून पाडला पाहिजे. इंदिरा-जींना फोन लावू का ? त्यांना सांगा-- शुरू हुआ है जंग हमारा ! साहेब, हे मोपलास्तानच आहे. १९२१–२२ साली ज्या भागात मोपल्यांनी हिंदू स्त्रियांवर बलात्कार केले, खून पाडले, सक्तीची धर्मांतरे घडविली त्याच विभागांचा हा मलपूरम जिल्हा तयार होतो आहे. या जिल्ह्याला समुद्रकिनारा आहे. या किनाऱ्यानजीक जी लहानलहान बेटे आहेत, तिथे भारत सरकारविरुद्ध पाकिस्तानी हेरांनी असंतोष पसरवलेला आहे. एम्. के. वेलोदींसारखा तज्ज्ञ सांगतो आहे की हे केरळात होऊ घातलेले ' पाकिस्तान ' आहे. ज्या मुसलमानांना इथे अशा तऱ्हेची पाकिस्ताने हवी असतील त्यांनी भारताबाहेर जावे, असे वेलोदीदेखील आपल्या लेखात म्हणतात ! हा लेख आपण वाचावा साहेब ! "

खूप चर्चा झाली. भारताबाहेर निष्ठा ठेवू पाहणाऱ्या मुसलमानांनी हिंदुस्थान सोडून रस्ता धरावा, असे गोळवलकर गुरुजी म्हणाले असतीलच तर त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याच्या दृष्टीने काय करता येईल याचा विचार झाला. श्री. वेलोदी यांना ' को-अॅक्युझड् ' म्हणून या कारवाईत गोवता येईल, असाही चर्चेचा सूर होता. मलपुरम जिल्हा निर्माण होत आहे. कारण गृहखात्यात प्रश्न अजून विचारा-धीन आहे !



# □ लंगोटीपत्राची हनुमान झेप !

ए. डी. गोरवाला यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होणाऱ्या 'ओपिनियन' या इंग्रजी साप्ताहिकात मुंबई विद्यापीठाच्या कारभारावर टीका करण्यात आलेली आहे. विद्यापीठाच्या उपकुलगुरूचे पद हे बहुधा निवृत्त राज्यपाल व निवडणुकीत पराभूत झालेल्या राजकारणी विद्वानांसाठी असते !' मुंबई विद्यापीठाचे सध्याचे उपकुलगुरू हे मात्र भारताचे भूतपूर्व प्रमुख न्यायाधीश आहेत, ही गोष्ट लक्षात घेता ही टीका पाहून आम्हांला आश्चर्य वाटले.

उपकुलगुरूंच्या निवासासाठी सिंडिकेटकडून ज्या रकमा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या या पत्राने पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

| | |
|---|---|
| १,७५,००० | इमारत खर्च. |
| २५,००० | फर्निचर |
| ४,००० | पंखे आदी विद्युतसाधने |
| १७,००० | पडदे, पायपुसणी, पलंग वगैरे |
| २४,००० | निवासाला जोडणारा काँक्रिट रस्ता करण्यासाठी |
| १२,००० | निवास वातानुकूल करण्यासाठी |
| १६,००० | निवासातून दिसणाऱ्या पॅव्हेलियनच्या संडासांचे दृश्य झाकण्यासाठी भिंत उभारण्यास |
| २२,४०० | छपरावरील अॅस्बेस्टॉस पत्रे खराब होऊ नयेत म्हणून 'ट्रेलिस' बसवण्यासाठी. |
| २,१०० | पंप हाऊसकरता |
| ३,०६,५०० | एकूण |

तीन लाखांवर सहा टक्के व्याजाने महिना १५०० रुपये या निवासावर अशा रीतीने प्रतिमासी खर्च होत राहणार आहेत. या निवासातील गॅस, पाणीपट्टी, वीज, दूरध्वनी, नगरपालिका कर हा सर्व खर्च विद्यापीठाने करावा, असेही तीन महिन्यांपूर्वी एक ठराव करून मान्य करण्यात आले आहे.

'ओपिनियन' पत्राची टीका अशी आहे की देशाच्या प्राप्त परिस्थितीत गजेंद्रगडकर यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या मुंबई विद्यापीठाने त्यांच्याच निवासावर एवढा अवाढव्य खर्च करणे हे योग्य आहे काय ? विद्यापीठाच्या चौथ्या योजनेत उपकुलगुरू–निवास हा सांताक्रूझ येथील नव्या 'कॅम्पस 'मध्ये बांधण्यात येणार असताना तात्पुरत्या निवासावर तीन लाख रुपये खर्च कशासाठी ?

एकतर हा खर्च अवाढव्य आहे असे आम्हांस वाटत नाही ! सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश म्हणून निवृत्त होताना न्या. गजेंद्रगडकर यांचे वय ६५ होते. इतक्या

उतारवयात त्यांनी मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरुपद पत्करले आहे. यामुळे उपकुलगुरूंच्या निवासात ठिकठिकाणी पंखे, गाद्या-गिरद्या, सोफे, पलंग, फर्निचर असणे आवश्यक नाही काय ? तरुणपणी माणसाला कसलेही वास व दृश्य सहन झाले तरी म्हातारपणी संडासाचे दर्शन होऊ नये यासाठी १५–१६ हजार रुपयांचा खर्च करण्यास मुळीच हरकत नाही. उपकुलगुरूंकडे फक्त विद्यापीठातले मध्यमवर्गीय प्राध्यापक येत असते तर गोष्ट निराळी होती. उपकुलगुरू झाल्यापासून २–२॥ वर्षांत न्या. गजेंद्रगडकर यांनी डिअरनेस अलाऊन्स कमिशन, नॅशनल लेबर कमिशन व जम्मू–काश्मिर इन्क्वायरी कमिशन...अशा मंडळांचे अध्यक्षपद स्वीकारलेले आहे...विद्यापीठाचे काम मग कधी करतात असा प्रश्न इतर कुणा सामान्य उपकुलगुरूंबाबत विचारण्याचा मोह व्हावा अशी ही अवाढव्य कामे आहेत. गजेंद्रगडकर यांना कामाचा विलक्षण उरक आहे यात शंका नाही. या सर्व कामांच्या संबंधात, थोर थोर माणसे उपकुलगुरूंकडे येत राहणार, त्यांना निदान तीन लाखांची इमारत नको काय ? आता नुकतेच त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठाच्या चौकशी कमिशनचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. उगाच आपली टीका करायची म्हणजे काय ?

देशाची परिस्थिती व खर्च यासंबंधातही टीका करण्यासारखे यात काहीही नाही ! इतर देशांचे राजेरजवाडे आपल्याकडे येतात, इकडे तिकडे जातात. या भेटीगाठींमुळे दोन्ही देशांची मैत्री दृढ होते असे म्हणतात. आता त्या त्या देशातील वकिलाती काय मग हजामती करतात, असा रागाचा प्रश्न विचारून या गोष्टींवर होणाऱ्या खर्चावरही टीका करता येईल. आता नुकतेच इराणचे शहा आणि शहाबानू आल्या. इराणने भारत-पाक युद्धात पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरवली असली आणि कच्छ लवादात इराणच्या प्रतिनिधीने भारताची सफा मान कापली असली तरी इराणच्या शहा व शहाबानूंकरिता आपल्या देशाने ३०–४० लाख रुपये केले ना खर्च ? यात उपकुलगुरूंचे आणखी १५ निवास झाले असते ! आलात तर तंगडी मोडीन असे सांगावे अशी खरी देशाची परिस्थिती, परंतु म्हणूनच, काय खर्च करायचा नाही की काय ? काटकसर काय इतरत्र करता येईल ! निवासावर जास्त खर्च झाला तर प्राध्यापकांच्या श्रेणी कमी करू. त्यांच्या निवासांचा प्रश्न पुढल्या योजनेत ढकलू. खर्च जसा अमाप करता येतो तशी काटकसरही करता येते. मात्र ही काटकसर नेहमी सामान्य जनतेने करायची असते हे गोरवाला यांनी लक्षात ठेवावे.

' ओपिनियन ' हे पत्र केवढेसे ! फुटकळ प्रत ५ पैसे आणि वार्षिक वर्गणी दोन रुपये ! कोण वाचतो ते ! अशा लंगोटीपत्राला असे मोठे विषय पेलत नाहीत हेच खरे.

मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू भव्य आलिशान निवासात राहणार याचा आम्हांला आनंद आहे.

We are all jolly good fellows !

—ग्या न बा

# छोट्या कारखान्यांची परवड

भारताच्या औद्योगिक विकासात छोटया उद्योगधंद्यांना फार महत्त्वाचे स्थान आहे. सर्वंकष भांडवलटंचाई व प्रत्यही वाढणारी बेकारी या दोन गृहितांच्या संदर्भात कमी भांडवल लागणाऱ्या व रोजगारप्रधान अशा या क्षेत्रास उत्तेजन देण्याचे प्रयत्न सर्व बाजूंनी सुरू आहेत. छोटया उद्योगधंद्यांसाठी खास औद्योगिक वसाहतींची उभारणी, सवलतीच्या दराने कर्जपुरवठा, आवश्यक त्या आयातीसाठी खास अग्र-हक्क, पक्क्या मालाचा उठाव व्हावा यासाठी सरकारी माल–खरेदीत राखीव वाटा, अशा अनेक उपाययोजना जारी आहेत. या क्षेत्राच्या संवर्धनासाठी नित्य नव्या यंत्रणा उभारल्या जात आहेत. या क्षेत्रास वाढता भांडवलपुरवठा व्हावा यासाठी व्यापारी बँकांवर सामाजिक नियंत्रण–योजनेखाली खास जबाबदारी टाकण्यात आली आहे.

या साऱ्यांचा परिणाम म्हणून छोटया उद्योगधंद्यांत अमर्याद वाढ झाली. सरकारी आकडेवारी व प्रकाशने या प्रगतीचे दर्शन घडवीत असतात. मात्र गेली दोन-तीन वर्षे अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा सर्वांत जास्त फटका या क्षेत्रासच बसला. त्याची पद्धतशीर पाहणी व छाननी अद्याप झालेली नाही. त्याचप्रमाणे औद्योगिक मंदी येण्यापूर्वीसुद्धा या क्षेत्रातील उद्योगधंद्यांचा कारभार कसा चालला होता, याचीही वस्तुनिष्ठ दखल सरकारी पातळीवर घेण्यात आलेली नव्हती. या दृष्टीने केलेला एक प्रयत्न म्हणून मध्यप्रदेश राज्यातील औद्योगिक वसाहतींमधील छोटया कारखान्यांच्या पाहणीचा उल्लेख करावयास हवा.

१९६० ते १९६८ या आठ वर्षांच्या काळात या वसाहतींमधील कारखान्यांची संख्या ३१० वरून २४० वर घसरली. याच काळात ५२ नवे कारखाने निघाले हे जर लक्षात घेतले तर आठ वर्षांमध्ये १२२ कारखाने बंद पडले हे सत्य स्पष्ट होते. या पाहणीत दुसरी एक गोष्ट आढळून आली ती अशी की, कारखाना सुरू झाल्यानंतरच्या दोन ते तीन वर्षांत तो बंद पडण्याचे प्रमाण जास्त आहे. नवीन कारखान्यांना उत्तेजन देण्याच्या धोरणाबरोबरच अस्तित्वात असलेल्या कारखान्यांची स्थितीही लक्षात घ्यावयास पाहिजे, हे यावरून स्पष्ट होते.

१९६०–६१ ते १९६७–६८ या आठ वर्षांच्या काळात नवीन सुरू झालेल्या व बंद पडलेल्या कारखान्यांची वर्गवारी खाली दिली आहे.

| | नवीन | बंद |
|---|---|---|
| १९६०–६१ | ६ | १० |
| १९६१–६२ | ४ | ८ |
| १९६२–६३ | १० | १२ |
| १९६३–६४ | १२ | २२ |
| १९६४–६५ | ८ | १८ |
| १९६५–६६ | ६ | ३६ |
| १९६६–६७ | ४ | ४ |
| १९६७–६८ | २ | १२ |
| | ५२ | १२२ |

कोणत्याही वर्षी नवीन निघालेल्या कारखान्यांपेक्षा बंद पडलेले कारखाने जास्त आहेत. १९६४–६५ पासून नवीन कारखाने निघण्याचे प्रमाण सातत्याने घसरत आहे. साऱ्या वर्षांची सरासरी काढता एका नव्या कारखान्यास दोन बंद कारखाने असे प्रमाण पडते.

बंद कारखान्यांची ते अस्तित्वात असलेल्या वर्षांनुसार वर्गवारी खालीलप्रमाण आहे.

| | बंद कारखान्यांची संख्या | एकूण बंद कारखान्यांशी प्रमाण |
|---|---|---|
| २ ते ३ वर्षे | ७० | ५७·३७ |
| ३ ते ५ „ | ३० | २४·५९ |
| ५ ते ६ „ | १२ | ९·८५ |
| ६ ते ८ „ | १० | ८·१९ |

एखादा कारखाना स्थिर झाला असे मानण्यासाठी त्यास कमीत कमी पाच वर्षे पूर्ण व्हावयास पाहिजेत, असे अनुमान यावरून निघते. आजवर या प्रश्नाकडे जावे तितके लक्ष गेले नाही याचे एक कारण म्हणजे कारखाना बंद पडल्यावर तसे सरकारला कळविण्याची तसदी छोटे कारखानदार घेत नाहीत वा निव्वळ पाटी लावून ठेवून प्रत्यक्ष व्यवहार बंद करण्यात येतो.

कारखाने बंद पडण्याच्या वाढत्या प्रमाणास अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. त्यांतील काही प्रमुख खालीलप्रमाणे–

छोटया उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याच्या सरकारी प्रचाराला व वारेमाप योजनांना भुलून अनेक लोक कारखाने काढण्याकडे आकर्षिले जातात. प्रत्यक्षात सरकारी

कारभार तितकासा साहाय्यकारी ठरत नाही. सरकारी योजना कागदावरच राहतात वा त्यांचा फायदा नको त्या घटकांसच मिळतो.

सरकारी हालचालींचा फायदा उठविण्याच्या दृष्टीने कसलेही तांत्रिक ज्ञान नसलेले अर्धे-कच्चे लोक या कारखान्यात पडतात व या सवलती घेऊन झाल्यावर दोन-तीन वर्षांत कारखाना गुंडाळून ठेवतात. या क्षेत्रात आवाडीवर असणारा दुसरा वर्ग म्हणजे व्यापारी वर्ग होय. व्यापाराला कर्ज देण्याबाबत बँकांवर बरीच बंधने आहेत. त्यामुळे बहुतेक व्यापारी एक तरी औद्योगिक कारखाना काढतात व त्यासाठी सवलतीच्या दराने कर्ज मिळवून ते व्यापारात वापरतात. कर्ज मिळण्याचे काम झाल्यावर व सरकारी सवलती घेऊन झाल्यावर ते आपले लक्ष दुसऱ्या एखाद्या जुजबी औद्योगिक कारखान्याकडे वळवितात.

याखेरीज पुरेसा कार्यक्षम व्यवस्थापकवर्ग नेमण्याची ऐपत नसणे, एकाच बड्या गिऱ्हाइकावर अवलंबून राहून धंद्याची बेसुमार वाढ करणे, धंद्यातील चालू नफ्यापेक्षा जास्त रकमेची गुंतवणूक भांडवली खर्चासाठी करणे, एखाद्याच ऑर्डरवरून उत्पादनशक्तीत बारेमाप वाढ करणे, माल खपविण्यासाठी पाच-सहा महिन्यांच्या उधारीवर मालाचा पुरवठा करणे, अशा अनेक चुकीच्या निर्णयांच्या व मर्यादांच्या संयुक्त परिणामांमुळे धंदा बंद पडतो. काही वेळा त्या त्या कारखान्याच्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे—उदाहरणार्थ, आयात धोरणातील अचानक बदल, एखाद्या नवीन प्रकारच्या पर्यायी मालाचा शोध, दुष्काळ वगैरे—कारखाने डबघाईला येतात.

जे झाले तिकडे सरकार कधीच लक्ष देत नाही. ते नेहमी नवीन योजना—प्रकल्प आखण्यात गर्क असते. त्यामुळे पुढे पाठ, मागे सपाट असा प्रकार सुरू होतो. छोट्या उद्योगधंद्यांच्या बाबतींत तरी कारखानदार, कामगार, सरकार व बडे ग्राहक यांची काही संयुक्त यंत्रणा उभारून अस्तित्वातील कारखान्यांच्या स्थितीची वारंवार पाहणी झाली पाहिजे. ○


सोने-चांदीच्या
तसेच
खड्यां मोत्यांच्या कलात्मक
दागिन्यासाठी.
डी. एस. मालेकर
आणि कं. ज्युवेलर्स
एन. सी. केळकर रोड दादर मुंबई २८

# काझीरंगाचा गेंडा

हरी मिरासदार

प्रतिवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास ' वन्य पशूंचे रक्षण करा '–(Preserve Wild Life) अशी अक्षरे असलेले फलक आणि त्या सोबत वाघ-सिंह-हत्ती-गेंडे वगैरे प्राण्यांची चित्रे सर्वत्र झळकू लागतात. वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतून सुंदर सुंदर चित्रांसह या प्राण्यांच्याविषयीचे लेख प्रसिद्ध होतात. गेली काही वर्षे मीही हे पाहत आलो होतो. परंतु लक्षात येईना, वन्य पशूंच्यासाठी किंवा त्यांच्या रक्षणासाठी आपण काय करायचे ? घरात एखादी गाय किंवा म्हैस ठेवण्यासाठीही जागा नाही. हां ! अगदी गुण्यागोविंदाने नाही तरी एकमेकांची तोंडे चुकवीत उंदीर आणि मांजर ही मात्र बिचारी मुक्तपणे घरात वावरत असतात. ' Preserve Wild Life ' म्हणून दोन-चार (रान) बोके किंवा कोणीही पाहुणा घरात शिरल्यानंतर चटकन् त्याची पँट किंवा धोतर पकडणारे एखादे झिपरे कुत्रे घरात बाळगण्याचे साहस करून बघण्यासारखे आहे; अथवा 'वन्य पशू दिना 'च्या निमित्ताने पेशवे पार्कातील किंवा राणीच्या बागेतील वाघ-सिंहांना खडे मारायचे नाहीत अशी शपथ घेण्याचा कार्यक्रम सर्वांनी करावा या सूचनेलाही माझा विरोध नाही. अशा काही कल्पना माझ्या मनात ते फलक किंवा चित्रे पाहत असताना येऊन गेल्या होत्या, पण त्या बिचाऱ्या वाघ-सिंह-हत्ती–गेंड्यांसाठी आपण आणखी काय करायचे हे मात्र कधी लक्षात आले नाही. गंमत अशी की, खूप प्रचाराने जी गोष्ट समजत नाही ती गोष्ट एखाद्या दृश्याने किंवा एखाद्या अनुभवाने समजून जाते. काझीरंगामध्ये गेंडा हा प्राणी पाहिल्यानंतर या एका प्राण्यासंबंधी असे सहजच एक प्रकारचे कुतूहल वाटायला लागले.

ब्रह्मपुत्रेच्या दक्षिण तीरावर शिवसागर–नौगाव जिल्ह्यामध्ये काझीरंगा नावाचे जंगल दाट वृक्ष आणि चित्रविचित्र प्राणी यांनी खच्चून भरले आहे. एका दृष्टीने



हे जंगल जितके भयानक आहे तितकेच सुरम्य देखील आहे. गेल्या शतकामध्ये संपूर्ण ब्रह्मपुत्रेचे खोरे दाट गवत आणि घनदाट वृक्ष यांनी व्यापलेले होते. आसाममध्ये चहाची लागवड सुरू झाल्यानंतर ही जंगले पुष्कळशी साफ होत गेली आणि त्या जागी रेखीव हिरव्यागार अशा चहाच्या मळ्यांची दृश्ये दिसू लागली. परंतु अद्यापही घनदाट लांबलचक पसरलेली काही जंगले भारताच्या या पूर्वभागात आहेत. काझीरंगा हे त्यांपैकीच एक जंगल आहे. ब्रह्मपुत्रेच्या दक्षिणेला आणि मिकीरपहाडाच्या उत्तरेला पंचवीस-तीस मैल लांबीचे आणि तितक्याच रुंदीचे हे जंगल उंच गवत, वेगवेगळ्या प्रकाराची झाडेझुडपे आणि प्रचंड वृक्ष यांनी भरलेले, व्यापलेले आहे. वर्षातून आठ महिने येथे पाऊस पडत असतो. त्या पडलेल्या पाण्याची लहानमोठी डबकी, तळी साचलेली असतात, त्यांतूनच ती झाडे सूर्यप्रकाशासाठी उंच उंच झेपावत जातात. पण नानाप्रकारची हिरवीगार झाडेझुडपेच केवळ या जंगलात असली तर माणसांचे लक्ष या जंगलाकडे कदाचित वेधले गेले नसते. या जंगलात असलेल्या चित्रविचित्र पशुपक्षी, प्राणी यांचे जे विश्व आहे त्याने मात्र साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतलेले आहे. बदक–बगळे, हंस, सारस वगैरे विविध प्रकारचे, विविध रंगांचे पक्षी जसे येथे दिसतात तसे जगाच्या अन्य भागांत क्वचितच सापडतात. असे काही दुर्मिळ प्राणी पाहायला मिळतील. त्यांमध्ये कळपाकळपाने हिंडणाऱ्या रानम्हशी, ज्याला इंग्रजीत हॉग डिअर (Hog Deer) म्हणतात तशी विशिष्ट जातीची हरणे, शेकडोंच्या टोळ्यांनी हिंडणारे जंगली हत्ती आणि अगदी एक–एकटयाने हिंडणारा, जगतातील आद्य पुरुष मानला गेलेला तो भव्य देहाचा आणि टणक कातडीचा गेंडा !

पावसाळ्यात म्हणजे विशेषत: जून-जुलैच्या सुमारास वरून तर सतत पाणी कोसळतच असते; ब्रह्मपुत्रेचे पाणीही या जंगलात हळूहळू घुसते. जलमय झालेल्या या जंगलात त्या जंगली प्राण्यांची अवस्था काय होत असेल कोण जाणे. पण ऑक्टो-बर-नोव्हेंबरमध्ये पावसाळ्याचा, पुराचा प्रहार झेलून पुन: हे प्राणी काहीच झाले नाही अशा आविर्भावाने खेळू-बागडू लागतात. याच काळात भारतातील नव्हे तर देशोदेशींचे हौशी प्रवासी हे जंगल किंवा आज ज्याला ' काझीरंगा वाइल्ड लाईफ सँक्चुअरी ' म्हणतात ते पाहण्यासाठी येतात. प्राण्यांविषयी थोडेफारदेखील कुतूहल ज्यांना आहे त्यांना तेथील प्राण्यांचे हे अद्भुत विश्व पाहणे खरेच मोठे मनोरंजक वाटेल. सर्कशीत किंवा प्राणीसंग्रहालयात अनेकांनी अनेक प्रकारचे प्राणी पाहिले असतील, पण खुल्या जंगलात जाऊन स्वच्छंदपणे वाघ-हत्ती-गेंडे पाहणे ही गोष्ट काही वेगळीच आहे. शिवाय तुम्हांला या जंगलात फिरावयाला घेऊन जाण्यासाठी शिकवून तयार केलेले हत्ती आहेत. त्या हत्तीवर बसले की तो डुलत डुलत जंगलात शिरतो. सुरुवातीला मुख्यत: उंचच उंच गवत आहे. तुमच्या भाग्याने जर त्या दिवशी छानपैकी ऊन पडले तर त्या गवतात तुम्हांला इकडून तिकडे उगीचच पळणारी हरणे, विविध प्रकारचे पक्षी, टवकारून पाहणाऱ्या रानम्हशी आणि मधूनच सुस्त-पणे ऊन खात पडलेला गेंडाही दिसेल ! त्यात जर एखाद्या गेंडीणबाई (Cow Rhino) आपल्या बच्चाला घेऊन कुरवाळीत बसल्या असतील तर तुम्हांला खरे म्हणजे हत्तीला–पाहून आपल्या दोन्ही नाकपुड्या उडवून हत्तीच्या अंगावर धावून आल्याचे सोंग करतील. पण हत्तीही या हल्ल्याला तयार असतो. आपली सोंड उंच करून, पाय घट्ट रोवून तो थबकून तेथेच उभा राहतो. दोघेही लढण्याच्या पवि-त्र्यात. तुमचा श्वासोच्छ्वास जोराने चालायला लागतो. पण हे काही क्षणच. लगेच हत्ती आपला रस्ता किंचित बदलून चालायला लागतो. आणि मग तुम्ही या 'थ्रिल'-मधून गेल्यानंतरचा निश्वास टाकता ! असे एक घंटाभर गवत-चिखल आणि जंगल यांतून हिंडत असतानाच हत्तीच्या आणि गेंड्याच्या, वाघाच्या आणि गेंड्याच्या लढाईच्या कहाण्या ऐकायला मिळतील. या सर्वांत गेंडा हा किती ताकदवान आहे, दोन दोन वाघांशी तो एकटा कशी झुंज देतो वगैरे किस्से मोठ्या अभिमानाने हत्तीवरचा माहूत सांगेल !

गेंडा हा प्राणी अलीकडे दुर्मिळ होत चालला आहे असे म्हणतात. फार पूर्वी पंजाब-सिंधमध्ये जेव्हा जंगल होते तेव्हा तिकडेही गेंडे सापडत असत. सात हजार वर्षांपूर्वीच्या मोहेंजो-दारोच्या अवशेषांत गेंड्याचे चित्र पाहायला मिळते. तैमूर-बाबर वगैरेंनी गेंड्याच्या शिकारी केल्याच्या कथाही इतिहासात आहेत. अलीकडे मात्र हा प्राणी नेपाळ, उत्तर बिहार, उत्तर बंगाल आणि आसाम याच भागात मिळतो. या भागातील–विशेषत: आसाममधील–गेंड्यांची संख्या मध्यंतरी खूपच कमी झाली होती म्हणून शिकारी आणि चोरटे यांच्यापासून रक्षण करण्यासाठी सरकारने

आसाममधील या जंगलाला 'Kaziranga Wild Life Sanctuary' हे नाव देऊन त्या जंगलात शिकारीलाच नव्हे तर विना अनुमती प्रवेश करायलादेखील बंदी केली आहे.

## टणक कातडीची उत्पत्ती

गेंडा हा मोठा मजेदार प्राणी आहे. गेंड्याचे चित्र जवळून पाहिले तरी ओठावर हसू फुटेल. त्याचं ते अवाढव्य शरीर, त्याला पाठीमागे लोंबत असलेली इवलीशी शेपटी, नेहमीच उभे असलेले कान, या अवाढव्या गोळ्यामध्ये सुईने कुठेतरी दोन भोके पाडावीत तसे ते डोळे ! त्या डोळ्यांमध्ये जणू काय 'नजर' नाही म्हणून डोळ्यांशेजारी असलेल्या नाकपुड्यांतून तुमच्याकडे तो टवकारून पाहत आहे असे वाटेल आणि त्याची ती कवचासारखी कातडी (Armour Plate) एकावर एक लेप द्यावेत तशी चिकटविलेली आहे असे वाटते. त्या कातडीच्या आतमध्ये बंदुकीची गोळीदेखील शिरेल की नाही याची शंका यावी. मग तलवार-भाला वगैरे शस्त्रेही बोथट होऊन जातील तर नवल नाही! गेंड्याला हे इतके जाड, टणक कातडीचे कवच कसे प्राप्त झाले, याविषयी एक कथा आहे. भगवान श्रीकृष्ण अती चाणाक्ष पुरुष. त्यांनी पाहिले होते की युद्धामध्ये आघाडीच्या हत्तीवर बसलेल्या माहुताला आणि वीराला बाण वेधून नेमके टिपून मारणे फारसे कठीण नाही. तेव्हा आघाडीला हत्तीऐवजी गेंडा ठेवावा. झाले. श्रीकृष्णाची आज्ञा झाल्याबरोबर गेंड्याला पकडून आणला. युद्धासाठी त्याला जाड कवच वगैरे चढविले आणि थोडेफार शिक्षणही दिले. युद्ध सुरू होण्यापूर्वी गेंड्याला श्रीकृष्णासमोर आणण्यात आले. श्रीकृष्णाने त्याचे निरीक्षण केले तेव्हा लक्षात आले की हा प्राणी इतका मूर्ख–बुद्दू आहे की याला आज्ञा वगैरे काहीच कळत नाहीत. श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून सैनिकांनी मग गेंड्याचा कान पकडून तसेच त्याला जंगलात नेऊन सोडून दिले. त्या वेळेस युद्धाचे कवच घातले होते ते त्याच्या अंगावर तसेच राहिले !


परंतु गेंड्याविषयी विलक्षण आकर्षण आहे ते त्याच्या शिंगामुळे. साधारणपणे आठ ते अठरा इंच लांबीचे हे शिंग नाकावरच्या कातडीतून निघून वर वाकदार होत गेलेले असते. आपल्याकडील गेंड्याला एकच शिंग असते पण आफ्रिकेतील गेंड्याला दोन शिंगे असतात. आपल्याकडील गेंड्याच्या शिंगाच्या विविध गुणांसंबंधी एक अद्‌भुत वलय फार पूर्वीपासून आहे. अशी समजूत फार प्राचीन काळापासून आहे की, गेंड्याच्या शिंगापासून केलेल्या पेल्यात जर विषयुक्त पदार्थ दिला तर तो पदार्थ आणि विष आपोआपच वेगळे होते. राजघराण्यातील लोक कधी कधी या पेल्याचा उपयोग करीत असत. या शिंगाचा आणखी एक विलक्षण गुण सांगितला जातो तो असा–हे शिंग प्रसूतीच्या वेळेस बाईच्या बिछान्याखाली ठेवायचे. विनासायास–सहज प्रसूती होते ! श्री. शर्मा नावाच्या एका गृहस्थांनी सांगितले की, त्यांच्याजवळ एक लहानसे शिंग होते. अडल्या-नडल्या

वेळेस ते लोकांना देत असत. एकदा एका ओळखीच्या माणसाने नेले ते परत दिलेच नाही तेव्हा ते बरेच हळहळले ! हे शिंग पाण्यात बुडवून नंतर काही वेळाने ते पाणी प्याल्यास शरीरात उत्साह-चैतन्य येते असेही काही लोक सांगतात. अशा या विलक्षण प्रभाव असलेल्या शिंगाची किंमत काय असेल ? पूर्वी या शिंगाच्या बदल्यात त्याच्या वजनाच्या अर्ध्या वजनाइतके सोने मिळत असे. हल्ली सोन्यापेक्षाही या शिंगाचा भाव वधारला आहे. अगदी अलीकडे एक शिंग दहा ते बारा हजार रुपयांस एक या प्रमाणे विकले जाते ! केवळ शिंगच नव्हे तर गेंड्याचे कातडे, मांस, एवढेच काय, गेंड्याचे मूत्रदेखील बाजारात विकले जाते. श्री. ई. पी. गी नावाच्या इंग्लिश माणसाने—ज्याने वन्य प्राण्यांच्या जीवनाचा अभ्यास केला आहे, म्हटले आहे की, गेंड्याच्या शिंगाच्या या विलक्षण गुणाविषयी ज्या समजुती प्रचलित आहेत त्या म्हणजे शुद्ध भंपकपणा आहे. त्याच्या म्हणण्यानुसार लॅबोरेटरीत केलेल्या परीक्षणामध्ये अशा तऱ्हेचे काहीही वैज्ञानिक गुणधर्म असल्याचे सिद्ध झाले नाही. खरेखोटे कोणास ठाऊक ! नाही तरी प्रयोगशाळेत तरी अद्याप सर्वच गोष्टी कोठे सिद्ध झाल्या आहेत. आणि गंमत म्हणजे या शिंगाला सध्या भारताबाहेर विशेष मागणी असते !

गेंडा हा प्राणी अगदीच मंदबुद्धीचा दिसत असला तरी चांगलाच ताकदवान आणि लढाऊ आहे. हत्तीशी आणि वाघाशीही तो चांगलीच टक्कर देतो. अतिशय वेगाने पळू शकतो आणि आपल्या मजबूत जबड्यातील दातांनी शत्रूवर हल्ला करून त्याचे तुकडे तुकडे करतो. हत्ती काय किंवा वाघ काय दोघेही गेंड्याच्या वाटेला सहसा जात नाहीत. असा हा प्राणी दणकट असूनदेखील एकतर याला अगदी कमी ऐकू येते आणि दुसरे म्हणजे दूरवरचे दिसत नाही. म्हणजेच शॉर्ट साइटेड आहे. या दोन गोष्टींमुळे हा प्राणी धीरे धीरे आपले अस्तित्व गमावत चालला आहे !

महाराष्ट्र सरकारचे जसे 'लामण दिवा' तसे 'गेंडा' हे आसाम सरकारचे अधिकृत चिन्ह आहे. ○





# रंगलेले परिसंवाद

भीमराव कुलकर्णी

'होणार ! होणार !! ' म्हणून रेंगाळत राहिलेले आणि अध्यक्ष पु. शि. रेग्यांच्या काही वक्तव्यांमुळे गेल्या महिन्यापासून लोकांचे लक्ष वेधून राहिलेले वर्ध्याचे ४८ वे मराठी साहित्य संमेलन जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात ४–५–६ या तारखांना एकदाचे पार पडले. गंमत ही की, हे संमेलन अपेक्षेपेक्षाही यशस्वी ठरले आणि त्याबद्दलच्या हकीकती ऐकून कित्येकांना, आपण त्याला हजर राहिलो नाही, याबद्दल चुटपूट लागून राहिली.

वास्तविक गेल्यावर्षी मे महिन्यात हे संमेलन भरावयाचे, परंतु वऱ्हाडी उन्हाळ्याचा बागुलबुवा पुढे करून हे संमेलन पुढे ढकलण्यात आले. त्यामुळे दिवाळीच्या सुटीत तरी हे संमेलन भरेल अशी साऱ्यांची अपेक्षा होती; परंतु तसे काही घडले नाही. संमेलनाबाबतीतल्या साऱ्या हालचाली अतिशय थंडावल्याप्रमाणे झाल्या होत्या. त्यासंबंधाने मल्याबुऱ्या हकीकतींचे इकडे पेव फुटल्यासारखी अवस्था झाली होती. सगळीकडून जेव्हा पृच्छा होऊ लागली; आणि वर्तमानपत्रांनी ज्या वेळेस या प्रश्नाकडे लक्ष द्यावयाचे ठरविले, तेव्हा कुठे 'महामंडळ' जागे झाले असावे.

(असा आमचा तर्क) 'महामंडळ' याबाबतीत कार्यप्रवण नाही, असे वाटून आम्ही पुणेकर साहित्यिक मंडळी, 'साहित्य–संमेलने पुण्याच्या साहित्य परिषदेनेच भरवावी' असे आग्रहाने म्हणू लागलो, आणि साहित्य परिषदेने किती चांगल्या रीतीने व व्यवस्थितपणाने संमेलने भरविली हे बहुतेकांना ऐकवू लागलो. महामंडळाच्या हातून हे दगदगीचे काम नीट होण्यासारखे दिसत नाही, तेव्हा पुन्हा एकदा हे सारे परिषदेकडे सोपवावे, असेही गंमत म्हणून म्हणावयास आम्ही कमी केले नाही. (असे काही तरी म्हणावयास आम्हांस संधी हवी होती, आणि ती सापडल्यावर आम्ही तसे खेळकरपणाने म्हणवून घेतले इतकेच !)

शेवटी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात संमेलन भरत असल्याचे जाहीर झाले, तेव्हा आम्ही साऱ्यांनी एकमेकांस विचारले, 'हल्ली नाताळच्या सुट्या विद्यापीठाने कमी केल्या आहेत. आम्हांला साधी २५ डिसेंबरची किंवा १ जानेवारीचीही सुट्टी नाही, हे महामंडळाच्या सभासदांस ठाऊक नाही काय ? या वेळी संमेलनास कोण येणार ? आणि आमच्याखेरीज संमेलन म्हणजे हॅम्लेटबद्दल कायसेसे म्हणतात तसे होणार नाही काय ?'

म्हणजे एकंदरीत संमेलन भरविण्यास ही वेळ काही सोयीची नव्हती आणि एकंदर चित्र फारसे उत्साहजनक नव्हते. संमेलनाच्या निरनिराळ्या परिसंवादांत भाग घेण्यासाठी काही साहित्यिकांना आवर्जून पत्रे आली होती, परंतु त्यांमध्ये नेमका प्रवासखर्चाच्या वा नेहमीच्या अन्य गोष्टींचा पुसटसाही उल्लेख नव्हता. त्यामुळे आम्हा कित्येकांचा उरला सुरलाही उत्साह निवडून न आलेल्या अध्यक्षीय उमेदवारांच्या पातळीवर गेला होता. त्यातच नव्या वर्षाच्या आगमनप्रसंगी कडाक्याच्या थंडीनेही असा काही दिमाख दाखविला की, पुन्हा लोकमते कुजबुजू लागली, वर्ध्याचा उन्हाळा परवडला परंतु हिवाळा नको. या वेळी वर्ध्याला जाण्याइतका '......पणा नाही.'

या साऱ्यांचा परिणाम म्हणून अगदी घरून निघावयाच्या क्षणापर्यंत 'जाऊ नये, कशाला आम्ही तडफडायला चाललोय ?' असे म्हणत, मोठ्या कष्टाने रजा मिळवून, इतर कोणी आले नाही तर नाही, मराठी साहित्य संमेलनास (स्व) खिशाला खार लावून, जमलेले निष्ठावंत साहित्यिक म्हणून इतिहासात कधी काळी आपली नोंद होईल, या अपेक्षने थंडीशी सामना करण्यासाठी बरीच वस्त्रास्त्रे बरोबर घेऊन आम्ही संमेलनास हजर राहिलो.

या संमेलनाने प्रत्येक बाबतीत अपेक्षाभंगाचा धक्का द्यावयाचा, असे ठरविले होते की काय कुणास ठाऊक ! आम्ही निघालो त्या गाडीस कसलीही गर्दी नव्हती. गाडीमध्ये मुंबईहून निघालेले हाताच्या बोटांवर मोजण्याइतके साहित्यिक दिसले. त्यांनीही ऐनवेळी निघण्याचा नाइलाजास्तव निर्णय घेतला होता, त्यामुळे रिझर्वेशन, सवलत इत्यादी गोष्टींची दक्षता घेतली नव्हती. या दिवसांत संमेलन घेण्याचा

पहिला फायदा (आणि महामंडळाची योजकताही) आम्हांला तेथेच लक्षात आली कारण गाडीला कसलीच गर्दी नव्हती.

गाडी पहाटे पाच वाजता अगदी वेळेवर (हा पहिला धक्का) वर्धा स्टेशनवर पोचली तेव्हा थंडीचा मागमूसही नव्हता (हा दुसरा धक्का) आणि स्टेशनवर एकही स्वयंसेवक नव्हता. (हा तिसरा धक्का) स्टेशनवर पोचल्यावर, 'संमेलनासाठी आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत असो' अशी कुठे पाटी दिसते का म्हणून चहूबाजूंनी पाहिले तेव्हा तेथेही नन्नाचा पाढा. (हा चौथा धक्का) 'स्वावलंबी विद्यालयात उतरायचे आहे तेव्हा आतापासूनच स्वावलंबनास सुरुवात करा' असे म्हणून आम्ही बाहेर पडलो व सायकलरिक्षा ठरविल्या. रिक्शामध्ये मी आणि मुंबईचे डॉ. मालशे बसलो तेव्हा सामान कुठे ठेवायचे हा प्रश्न पडला. तेव्हा आम्ही बसायचे का सामान ठेवायचे, असा क्षणभर विचारविनिमय करून दोघेही सामान आत ठेवून अर्धे अर्धे आत बसलो. चार पावले चालल्यावर रिक्षा काही केल्या पुढे जाईना तेव्हा खाली उतरून स्वावलंबन अवलंबवावे लागले. पहाटेच्या अंधुक प्रकाशात भिंतीवर लावलेली संमेलनपत्रके दिसू लागली. त्यांमध्ये फक्त करमणुकीच्या कार्यक्रमांचीच नोंद होती. अध्यक्ष, उद्घाटन, परिसंवाद इत्यादिकांचा कसलाही उल्लेख नव्हता (हा पाचवा धक्का !!).

अशा मनःस्थितीत आम्ही संमेलनाच्या निवासस्थानी पोचलो आणि त्या क्षणापासून मनावर आलेले सारे मळभ कुठल्याकुठे दूर गेले. प्रतिनिधी अगदी मोजके

## लोणी : एक वितळणे

भोपाळच्या संमेलनात मुंबईहून नेलेले पोलसन लोण्याचे पाकीट बरेच गाजले होते. ते बेटे उन्हाळ्यामुळे वितळू लागले म्हणून पाण्यात ठेविले तरी वितळायचे राहिले नाही आणि शेवटी 'लोणी : एक वितळणे' ह्या कल्पनेचा जन्म झाला. ते लोण्याचे पाकीट आमच्या एका स्नेह्याने आणले होते.

याही खेपेस आमच्या दुसऱ्या एका स्नेह्याने पोल्सनचे लोणी पाकीट व पाव आणले होते. परंतु संमेलनात जेवण चांगले मिळत असल्यामुळे ते बाहेर काढण्याचा प्रसंग आला नाही. आमच्या भाषणाच्या वेळी आम्ही ते मुद्दाम मागून घेऊन काही प्रतिनिधींना वाटून टाकले व म्हटले की, आमच्या भाषणाच्या वेळी टाळ्या वाजवा.

लोणी खाऊन भाषणाच्या वेळी टाळ्या मात्र कोणी वाजविल्या नाहीत. हे लोण्याचे न वाजविणे आम्हांला मात्र महागात पडले नाही. कारण नाहीतरी ते आमचे नव्हतेच !

आले होते आणि व्यवस्था अगदी उत्तम होती. प्रतिनिधींच्या साऱ्या सोयींकडे जातीने लक्ष पुरविण्यात येत होते. सूर्य वर येऊ लागला तशी धावपळ वाढू लागली. नऊच्या सुमारास आम्ही फिरत फिरत स्टेशनवर गेलो तेव्हा गावातील कित्येक प्रतिष्ठित नागरिक, काँग्रेसचे पुढारी आणि स्वागतासाठी हातांत पुष्पगुच्छ घेतलेल्या विद्यार्थिनींच्या रांगा दिसल्या. आता स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात जमले होते आणि ' प्रतिनिधींचे स्वागत असो 'चा फलक फडफडत होता. सारे स्टेशन उत्साहाने दुथडी भरून वाहत होते. चौकशी केली तेव्हा १० च्या गाडीने अध्यक्ष व उद्घाटक-शिक्षणमंत्री नामदार चौधरी येणार असल्याचे समजले. थोड्या वेळाने रेल्वेने घोषणा दिली, गाडी पावणेदोन तास उशीरा येणार आहे!' (आता या विद्यार्थिनींना ताटकळत ठेवण्याचा दोष मंत्रिमहाशयांवर ठेवता येणार नव्हता!) गाडी आल्यावर अध्यक्षांचे झालेले भव्य स्वागत आणि निघालेली मिरवणूक पाहून बरे वाटले. अध्यक्षांबरोबर पुण्या-मुंबईची मिळून निवडक (हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच) मंडळी होती, त्यामुळे पुण्याच्या वर्तमानपत्रांतून त्यांचीही नावे छापून आली. (त्यांमध्ये सरोजिनीबाई शेंडे यांना ' बाबर ' म्हटले होते!). आम्ही उगीचच आदल्या गाडीने आलो होतो! त्यामुळे तेवढेच ' ज्ञानप्रकाशा 'त आमचे नाव हुकले खरे!!

संमेलनाचे पहिलेच जेवण तेथल्या संचालकांनी असे काही भक्कम योजिले होते की, ते संपवायला दोन-अडीचचा सुमार झाला. संमेलनातील प्रदर्शनाचे उद्घाटन तर दुपारी तीन वाजता ठरविलेले होते. असले भक्कम जेवण घेतल्यावर मंडळी आडवी झाली असती म्हणजे प्रसंग बाका होता, हे लक्षात घेऊनच कार्यक्रम आखण्यात आला होता हे निश्चित!

प्रत्यक्ष संमेलनाला चार वाजता सुरुवात झाली. तेव्हा आश्चर्याची गोष्ट अशी की, सारा मांडव श्रोत्यांनी तुडुंब भरला होता. समोर व्यासपीठावर संमेलनाचे नेहमीचे श्रेष्ठी स्थानापन्न झाले होते. शारदा-पूजनासाठी दहा–बारा उंचावरच्या फळ्या उतरून म. म. पोतदार एखाद्या लहान मुलाप्रमाणे उड्या मारीत उतरले आणि हार घालून तसेच उड्या मारीत चढून वर गेले तेव्हा किती बरे वाटले! (आम्ही त्यांना कुठे धाप लागली का हे पाहात होतो. छे: उलट मोठ्या प्रसन्न वदनाने आमच्याकडे पाहत होते. आम्ही त्याचवेळी त्यांच्याइतके वयाचे झाल्यावर असेच काही तरी करून दाखवू, अशी प्रतिज्ञा केली (मनातच)).

त्यानंतर पोतदार पाचच मिनिटे प्रास्ताविक बोलले. मोठे उचित, गौरवपूर्ण आणि आल्हाददायक. मग मधुकरराव चौधरींनी उद्घाटनाचे दणदणीत भाषण केले. मधुकररावांचे शिक्षण वर्ध्यातच झालेले होते, त्यामुळे त्यांना या वेळी बोलताना हुरूप येणे स्वाभाविक होते. बोलण्याच्या संदर्भात, ' लोकप्रतिनिधींना, मंत्र्यांना काही अक्कल नसते ', ह्या अलीकडच्या विद्वानांच्या समजुतीबाबतीत त्यांनी खंत व्यक्त

केली ! अध्यक्ष रेगे त्यांच्या कथाकवितांप्रमाणे छोटेसे भाषण करतील, असा आमचा कयास होता ( जरी त्यांनी मुंबईत आपण अध्यक्षीय भाषण मोठे म्हणजे ३४ पृष्ठांचे लिहिले असल्याचे जाहीर केले तरी—कारण पाने ३४ असली तरी पानावर मजकूर किती हे त्यांनी सांगितले नव्हते— 'सावित्री' प्रमाणे प्रत्येक पानावर दोन चार ओळी आहेत, असे माहीतगारांकडून कळलेही होते. )

उद्घाटनानंतर स्वागताध्यक्ष श्री. रामेश्वर बजाज यांचे छोटेसेच भाषण झाले. त्यांच्या भाषणातील दोन मुद्दे चांगले लक्षात राहिले. ते म्हणजे त्यांनी केलेली संमेलनाची पंढरीची तुलना व संमेलनानंतर सारे प्रतिनिधी निघून गेल्यानंतर व्यवस्थापकांच्या मनाची होणारी उदास अवस्था. ते आर्ततेने म्हणाले, 'तीन-चार दिवस साहित्यप्रेमी मंडळी एकत्र येतात, भेटतात, बोलतात. रात्री आकाश तारकांनी फुलून यावे व दिवस उजाडताच काही दिसू नये, असे काही तरी संमेलनानंतर होऊन जाते.'

स्वागताध्यक्षांनंतर विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष माडखोलकर हे अध्यक्ष-पद-सूचनेसाठी उभे राहिले. काहीसे उशिरा झालेले आणि तेही पाहिलेच इतके उत्तम जेवण याचा त्यांच्या मनावर अद्यापही प्रभाव असलेला जाणवला. कारण ते म्हणाले, 'विदर्भाचे लोक अतिथ्यशीर म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी जर दुपारी बारा वाजता जेवायला बोलावले तर ते सायंकाळपर्यंत मिळेल याची खात्री नाही, परंतु रात्री बारा वाजेपर्यंत नक्की मिळेल आणि तेही असे भरभक्कम की पुढे दिवसभर जेवण्याची आवश्यकता जाणवू नये.' ( त्यांच्या भाषणाचा परिणाम म्हणून रात्री आम्ही जेवलो नाही. ) ही विदर्भ स्तुती ( ! ) झाल्यावर ते अध्यक्ष रेगे यांच्याबद्दल म्हणाले, 'कवी यशवंतांनंतर त्यांच्या प्रकृतीचा कवी १८ वर्षांनंतर संमेलनाचा अध्यक्ष होतो आहे, याबद्दल मी आनंद व्यक्त करतो.'

त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे याचा विचार करण्यात डोके गुंतले असता विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुखांनी 'संत वाङमय व पसंत वाङमय' यांच्या उल्लेखाने आमचे कान उभे केले. अलीकडच्या लोकांना पसंत असलेल्या वाङमयाचे रेगे हे पसंत अध्यक्ष आहेत, हे त्यांचे वाक्य ऐकून माडखोलकरांचे मागचे वाक्य आम्ही केव्हाच विसरून गेलो. पसंत म्हटल्यानंतर मग वधूपक्ष आणि वरमाला यांच्या दृष्टांताने त्यांनी आपल्या विवेचनाला चांगले टोक आणले. जाता जाता त्यांनी यशवंतानंतर मध्ये कुसुमाग्रज हे कवी अध्यक्ष झाल्याची आठवण दिली व माडखोलकरांच्या विधानांना अर्थपूर्णता आणली. त्यांच्यानंतर पूर्वाध्यक्ष डॉ. कोलते अध्यक्षीय-पदाची सूत्रे अर्पण करण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी अध्यक्षांच्या तथाकथित अधिकारावर आम्हांला चांगलेच हसविले. पुढे लगेच त्यांना मागच्या दृष्टांताची आठवण झाली आणि तो पुढे चालविता चालविता त्यांना रेग्यांच्या रूपाने रंगभूमीवर रंग लावून थंडीच्या

दिवसांत नांदी लांबल्यामुळे रंग तडतडत असलेली नटी दिसू लागली. हे दृष्टांत आणि उदाहरणे पाहून आम्ही अक्षरशः चक्रावून गेलो.

ह्या साऱ्या प्रकरणात काहीसे तंग झालेले वातावरण म. म. पोतदारांच्या एका वाक्याने निवळले. अध्यक्ष पु. शि. रेगे यांना मंडळातर्फे हार अर्पण करताना ते म्हणाले, ' ह्या हारामध्ये अध्यक्षाचे सारे अधिकार आहेत ! '

प्रा. रेग्यांचे हे अध्यक्षीय भाषण रेखीव व विचारप्रवर्तक आहे. त्याच्या प्रती हातांत पडल्यानंतर श्रोते मोकळेपणाने आपापसात गप्पा मारू लागले व रेग्यांनी वर्गात मुलींकडे न पाहता बोलणाऱ्या ( आमच्यासारख्या ) प्राध्यापकांप्रमाणे इकडे तिकडे न पाहता थंडपणाने ते वाचून काढले. रेग्यांचे हे भाषण अतिशय विचार-प्रवर्तक असून त्यावरून त्यांच्या सश्रद्ध, संस्कारप्रिय, परंतु मूलभूत विचार करण्याच्या व्यक्तिमत्त्वाचे चांगल्या रीतीने दर्शन घडते. त्या भाषणाने नव्या-जुन्यांना-दोघांनाही धक्काही बसतो आणि बरेही वाटते. आत्मनिष्ठेबाबतचे व कलावंताच्या अनुभव घेण्याच्या पद्धतीबाबतीतले त्यांचे विचार मूलगामी आहेत. संस्कृत भाषा व मराठी शुद्धलेखन याबाबतीत त्यांनी विनयशीलतेच्या बुरख्याआडून व्यक्त केलेले विचार परखड आहेत. रेग्यांचे मिष्किल व्यक्तिमत्त्व त्यांच्या भाषणामध्ये सगळीकडेच प्रकटले आहे !

दुसऱ्या दिवशी सकाळी ' मराठीचे अध्यापन ' या विषयावर परिसंवाद झाला. या परिसंवादाचे अध्यक्ष प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ डॉ. ना. गो. कालेलकर होते व डॉ. मालशे, प्राचार्य फाटक, प्रा. जोगळेकर, डॉ. मा. गो. देशमुख, सुनील सुभेदार व अ. ना. देशपांडे यांनी त्यामध्ये भाग घेतला होता. हा परिसंवाद ऐकून आमचे काही फारसे समाधान झाले नाही. काव्य, ललितवाङ्मय व संशोधन यांच्या अध्यापनाबाबतीत काहीसे मार्गदर्शन यांमधून झाले. परंतु व्याकरण, भाषाशास्त्र वाङ्मयेतिहास, काव्यशास्त्र इत्यादी विषयांचे अध्यापन यांकडे कोणी लक्ष दिले नाही. प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या अध्यपनाबाबतीतले दृष्टिकोण, त्याबद्दलची अनास्था, पदवीपूर्व वर्गापासून एम. ए. पर्यंतचा अभ्यासक्रम विविध पातळ्यांवरून कसा निश्चित करावा व शिकवावा, हे आमचे खरेखुरे प्रश्न आहेत. मराठीचा अभ्यासक्रम सोपा आहे किंवा त्यामध्ये प्राचीन मराठी वाङ्मयाकडे अधिक लक्ष दिले जाते, अर्वाचीन वाङ्मय अभ्यासास नेमले जात नाही, असे अत्यंत विपर्यस्त विधान मराठीचे अध्यापकही करतात, हे पाहून आश्चर्य वाटले. त्याचा फायदा घेऊन इंग्रजीचे अध्यापक श्री. सुनील सुभेदार यांना मराठी व मराठीचे प्राध्यापक यांची थट्टा व टिंगल करण्यास चांगलेच फावले. (म्हणजे शेवटी आमचाच बावळटपणा अंगाशी आला.)

या परिसंवादानंतर भोजनोत्तर ( दुपारी १ वाजता ) स्त्रीलेखिकांचा (!) अभिनव मेळावा होता. का कुणास ठाऊक, परंतु स्त्रीलेखिकाच त्यासाठी फारशा

उत्सुक नव्हत्या. स्त्रियांचा निराळा मेळावा भरवून पुरुषांपासून त्यांना तोडण्याची कल्पना त्यांना विशेष पसंत नसावी. मेळाव्याच्या अध्यक्ष सौ. शांताबाई किर्लोस्कर यांनी तसे बोलूनही दाखविले. ( कदाचित त्यामुळे स्त्रीलेखकांनी दुसऱ्या कोणत्या परिसंवादात भाग घेतला नसावा ! ) हा मेळावा मात्र छान जमला होता.

ह्या मेळाव्यानंतर ४॥ च्या सुमारास 'माझ्या मते उत्कृष्ट कवितेचे गमक' या विषयावर परिसंवाद झाला. हा परिसंवाद चांगला रंगत गेला. इतका की, दुसऱ्या दिवशीही तो चालू ठेवावा लागला. ह्या परिसंवादाचे अध्यक्ष कवी अनिल यांनी समोर बसलेल्या श्रोत्यांमधील उत्तमोत्तम वक्त्यांना आग्रहाने या परिसंवादात बोलावयास लावले. त्यामुळे अ. ना. देशपांडे, म. श्री. पंडित, मा. गो. देशमुख, या. मु. पाठक, रा. शं. वाळिंबे, ग. त्र्यं. देशपांडे, कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, पु. शि. रेगे यांसारख्या उत्तमोत्तम व्यक्तींची एकापेक्षा एक चढत्या श्रेणीची भाषणे येथे ऐकायला मिळाली. आदल्या दिवशी डॉ. वाळिंबे यांनी केलेल्या भाषणामुळे साऱ्या सभामंडपात खळबळ उडून राहिली. मोठ्या आवेशाने व आक्रमक पद्धतीने त्यांनी आंग्लाळलेल्या आजच्या कोत्या समीक्षण बुद्धीच्या चिंधड्या उडविल्या. संस्कृत-साहित्यशास्त्राने काव्याबाबतीत व्यक्त केलेली मते किती सर्वंकष दृष्टीची आहेत, हे पटवून देण्या-घेण्यासाठी त्यांनी जाहीर वादविवादाचे आव्हान दिले. डॉ. वाळिंबे यांचे हे भाषण कित्येक दिवस स्मरणात राहील. त्यांच्या भाषणानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना उत्तरे देण्याचे काही प्रयत्न झाले. आपल्या अध्यक्षीय भाषणात

## आंबोण : एक रागावणे

संमेलनाच्या सूप वाजण्याच्या सुमारास आभार मानताना डॉ. मा. गो. देशमुख म्हणाले, म्हशीपुढे आंबोण ठेवल्यानंतर म्हैस दूध भरपूर व चांगले देते, हे लक्षात घेऊन इथल्या कार्यकर्त्यांनी प्रतिनिधींसाठी जेवणाची उत्तम व्यवस्था ठेविली होती.

देशमुखांचे हे वक्तव्य ऐकून मुंबईचे प्रतिनिधी 'आम्हांला जेवायचे नाही' म्हणून बसले. आम्ही म्हटले, 'अहो, त्यांनी काहीही म्हटले तरी संमेलन चांगले झाले, ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही मनाला लावून घेऊ नका. जेवणाचे तुम्ही पैसे मोजले आहेत.'

'आंबोण न घेताही आम्ही संमेलन चांगले झाले असेच म्हणू !' म्हणून त्यांनी शेवटी जेवण घेतलेच नाही.

अनिलांनी वाळिंब्यांचा आग्रह रास्तच होय, असा अभिप्राय व्यक्त केला. आजचे नवशिक्षित समीक्षक उद्धट वृत्तीचे असून त्यांच्यामध्ये विनयशीलतेचा गंधही नसल्याचे त्यांनी सांगितले. लयबद्धतेसारख्या त्यांच्या परभृत कसोटयांबद्दल बोलताना ते सात्त्विक संतापाने म्हणाले, 'लयबद्धता म्हणे लयबद्धता, कसली आली लयबद्धता या लयाची लयलय करून त्यांनी सारी विवेकबुद्धीच लयाला नेली आहे.' एकंदरीत ज्येष्ठ पिढीने या संमेलनात फड मारला हेच खरे. या परिसंवादातील या. मु. पाठक, कविभूषण खापर्डे, ग. त्र्यं. देशपांडे व पु. शि. रेगे यांची भाषणे अतिशय उद्बोधक होती. विशेषत: ग. त्र्यं. देशपांडे यांनी अतिशय सहजतेने संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका साक्षेपाने उलगडून दाखविली.

तिसऱ्या दिवसाचा परिसंवाद 'ऐतिहासिक कादंबरीचे निकष' या विषयावर झाला. या परिसंवादात सारे कुलकर्णीच भाग घेणार होते. म. म. पोतदारांनी आपण मूळचे 'कुलकर्णी' असल्याचे सांगून अध्यक्षपदावरच्या आपल्या अधिकाराची जाणीव दिली होती. (त्याच वेळी रेगे हेही कुलकर्णीच आहेत असे कळले.) अपवाद म्हणून प्रा. पेशकार यांनी सुरुवातीचे भाषण थोडक्यात 'पेश' केले. प्रा. श्री. मा. कुलकर्णी व द. भि. कुलकर्णी यांनी कादंबरीची लक्षणे आपल्या व्याख्यानातून विशद केली. नंतर व. दि. कुलकर्णी यांनी अलीकडच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील वातावरणनिर्मितीबाबत काही विचार मांडले. 'स्वामी'मधील प्रणयप्रसंग, कालविसंगत वाटतात असे त्यांनी सांगितले. नंतर प्रा. भीमराव कुलकर्णी बोलले. भारतीयांना ऐतिहासिक दृष्टी नव्हती, हे पोतदारांनीच मागे कधीतरी सांगितलेले सूत्र घेऊन त्यांनी व्याख्यानाची मांडणी केली होती. पुराणे व इतिहास यांना एकत्र संबोधण्याची आपली प्रवृत्ती, आपल्या बखरींचे पौराणिक स्वरूप, त्यामुळे इतिहासाच्या आकलनाला येणाऱ्या अडचणी आणि म्हणूनच आजच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांना आलेले काल्पनिक बखरवजा स्वरूप यांचे थोडक्यात विवेचन करताना, आजच्या ऐतिहासिक कादंबरीकारांना इतिहासकालीन मराठी संस्कृती का गवसली नाही, हे त्यांनी एखाददुसऱ्या उदाहरणांनी सांगितले.

'मराठ्यांचा इतिहास जागेवर नाही' हे माझ्या व्याख्यानाचे सूत्र होते, आणि त्या संदर्भात पोतदार लिहीत असलेल्या 'शिवचरित्रा'चा मी उल्लेख केला. पोतदारांनी अध्यक्षीय भाषणात या उल्लेखाच्या आधाराने मोठे मार्मिक विवेचन केले. ते म्हणाले, 'मी शिवचरित्र लिहिण्यासाठी कोणाकडून एक पैही घेतली नाही व पुढेही घेणार नाही. अर्थातच ते लिहून झाल्यावर ते विकत घेण्यासाठी दक्षिणा दिली तर मी ब्राह्मण, नाही म्हणणार नाही. मात्र हे 'शिवचरित्र' जगाच्या आणि हिंदुस्थानच्या संदर्भात लिहिणार आहे आणि या संदर्भात शिवाजी टिकत आहे असे दिसले आणि त्याचे स्वरूप देखणे आहे असे वाटले तरच मी ते लिहीन. तसे नसेल तर उगीच पोचट चरित्र लिहिण्यात काय अर्थ आहे!' (शिवाजी कसाही असो तो निर्धाराने

सांगण्याची इतिहासकाराची निर्लेप दृष्टी पोतदारांना मान्य नाही. तो प्रतिष्ठेचा असेल तरच ते लिहितील ! इतिहासकाराने असा आग्रह धरावा का, हे दुसऱ्या एखाद्या परिसंवादात त्यांना विचारूच ! )

पुढे त्यांनी सांगितले की, 'भीमराव म्हणतात की, भारतीय हे इतिहास आणि पुराणे एकच मानतात. मी सांगतो नाही. नाही, नाही, त्रिवार नाही.'

पोतदारांच्या या विवेचनाने आश्चर्यचकित होऊन आम्ही पाहू लागलो तो त्यांनी पुढे सांगितले की, फार फार पूर्वी इतिहास व पुराणे यांमध्ये फरक करीत, हे वेदांतील काही उल्लेखांवरून लक्षात येईल !, पुढे तर पोतदारांनी रामायण-भारतकाळापासून इतिहास व पुराणे यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला हे सांगून नंतर शेकडो वर्षे इतिहास व पुराणे यांजमधला फरक नाहीसा झाला, असे चक्क सांगितले. (म्हणजे सुरुवातीला चपराक मारायची आणि नंतर नाही रे बाबा, तुझेच बरोबर, अगदी बरोबर, असे म्हणण्याचा पोतदारांचा खाक्या येथेही लक्षात आला. पोतदार असे फड मारून जातात आणि चांगल्या चांगल्या वक्त्यांचा खेळकरपणाने 'मामा' करतात.) पोतदारांनी हे सारे मात्र अशा काही मोकळेपणाहे आणि गमतीने सांगितले की, त्यांचे हे भाषण ऐकण्यास आम्ही हजर होतो, हे सांगण्यास कोणालाही अभिमान वाटेल. शेवटी तर पोतदारांनी आपल्या भाषणाची परिसीमा गाठली. त्यांनी यापुढे वृद्धत्वामुळे पुढच्या संमेलनास हजर राहू शकणार नाही, असे सांगून निरोप घेतला तेव्हा त्यांच्या डोळ्यांच्या कडा किंचित पाणावल्या होत्या आणि साऱ्या श्रोत्यांची अंतःकरणे गलबलून गेली होती. साहित्य संमेलनासारखा भंकसपणा दुसरा नसेल, असे म्हणणाऱ्या काही नवसाहित्यिकांनीही पोतदारांचे हे भाषण ऐकून त्यांचे पाय धरावेसे वाटले, असे कबूल केले. (खरे पाहिले तर आम्हांलाही तसे वाटले होते परंतु उद्या ठणठणपाळ 'दादा, असे म्हणू नका हो !' म्हणत आमचे वर्णन 'काका मला वाचवा'च्या धर्तीवर चितारतील. त्यांना कशाला संधी द्या म्हणून आम्ही ती संधी दवडली)

या संमेलनामध्ये कविसंमेलन नव्हते, हे बरे झाले, असे कित्येकांना वाटते, परंतु मला तसे वाटत नाही. कारण विदर्भात कवींची आणि तरुण कवींचीही संख्या अधिक आहे. त्यांना एका अर्थाने हे नाराज करण्यासारखे आहे. आजच्या नवकवितेच्या जमान्यात विदर्भातील तरुण कवींचा वाटा मोठा आहे. सत्यकथेच्या चोखंदळ दृष्टीने त्यांना प्रोत्साहन दिले आहे, जोपासले आहे. त्यातले फारच थोडे या संमेलनास हजर होते. आपल्याला काही 'वाव' नाही असे त्यांना वाटले असल्यास चुकीचे ठरणार नाही. मधुकर केचे, सुरेश भट, ढ्हाके, गणोरकर, सिरास अहमदाबादकर इत्यादी नव्या दमाच्या कवींचा रसिकांना परिचय घडावयास हवा होता. यांमध्येच 'बालकवी स्मेटे' यांचाही उल्लेख करावयास हवा. श्री. स्मेटे यांची वऱ्हाडी भाषेतील विनोदी कविता सर्वस्वी स्वतंत्र प्रतिभेची असुन लोकरंजनाचे

फार मोठे सामर्थ्य तीमध्ये आहे. प्रतिनिधींनी आग्रहाने स्मेटे यांजकडून त्यांच्या काही कविता म्हणवून घेऊन हास्याची लयलूट केली. हजारो श्रोत्यांना हसवून बेजार करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेमध्ये आहे. वर्ध्याच्या संमेलनात कविजनांची चांगलीच कुचंबणा झाली. फडमारू, बाजारी काव्य गायनाच्या अतिरेकाने काव्यगायन बंद ठेविले असेलही, परंतु त्यामध्ये काही योजकता दाखविली असती तर बरे झाले असते !

त्यामुळे प्रतिनिधींनी आपल्या प्रतिनिधीनिवासात रात्री काही तरुण कवींच्या कविता–वाचनाचा स्वतंत्र कार्यक्रम ठेविला होता. त्यामध्ये या. मु. पाठक या ज्येष्ठ कवींनी भाग घेऊन मोठा ' मजा ' आणला. या. मु. पाठकांसारख्या ज्येष्ठ पिढीच्या कवींची या संमेलनातील उपस्थिती आणि त्यांची रसिक वृत्ती पाहिल्यानंतर मन प्रसन्न झाले.

आणखी एक महत्त्वाचा विचार या वेळी प्रकर्षाने जाणवला :

विदर्भातील बहुतेक सारे ज्येष्ठ पिढीचे साहित्यिक या संमेलनास अगत्याने हजर राहिले होते. प्राचार्य चोरघडे, डॉ. कोलते, डॉ. देशमुख, प्रा. पाठक, प्रा. अ. ना. देशपांडे, ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. खापर्डे, प्रा. त्र्यं. देशपांडे, प्रा. पंडित, प्रा. शेवाळकर, प्रा. ऊर्ध्वरेषे......

नवी पिढी मात्र अभावानेच दिसली. तिच्या मनात जुन्यांबद्दल राग होता. अविश्वास होता का ?......

जुन्या–नव्यांमधील हे अंतर अशा संमेलनात दूर होणे आवश्यक आहे. परंतु त्यासाठी तरुणांनी ही संमेलने हातात घ्यायला हवी. जिद्दीने, ईर्षेने. इथे तरुण कमी पडतात का ?

या संमेलनाची सारी उभारणी प्राचार्य चोरघड्यांच्या देखरेखीखाली झाली होती. रामेश्वर बजाज, प्रा. कंठाळे, प्रा. वेर्णेकर, प्रा. कुसुमाकर बोरीकर इत्यादिकांनी त्यासाठी फार धडपड केली व संमेलन सर्व दृष्टींनी यशस्वी केले.

प्रतिनिधी मर्यादित होते परंतु ते सर्व कार्यक्रमांना आवर्जून हजर राहत होते. सकाळी ९ वाजल्यापासून भोजनाचा तासभर वेळ सोडला तर सायंकाळी सात आठ पर्यंत मंडप श्रोत्यांनी भरलेला असे. समोर सारे ज्येष्ठ साहित्यिक बसून व्याख्याने ऐकत असत. त्यामुळे परिसंवाद चांगलेच रंगत गेले. संमेलनाचे हे मोठेच यश होय.

शेवटी, 'हे संमेलन शेवटचे न ठरता अशी संमेलने भरली पाहिजेत असे मला मनापासून वाटते ' असे रेगे आपल्या समारोपाच्या भाषणात म्हणाले तेव्हा आम्हाला खूपच बरे वाटले व थोडेसे वाईटही वाटले.

(हे शेवटी (ऐतिहासिक) संमेलन, त्याला हजर राहिलेच पाहिजे, साक्षी असले पाहिजे म्हणून आम्ही इतके जीव तोडून आलो. म्हणजे आम्हांलाही आज ना उद्या चान्स आहे ! ) ○

# नियमितपणें वापरल्यानें फोऱ्हान्स टूथपेस्ट हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालते

तरुण तसेंच वयस्कर लोकांकडून आलेली अनाहूत प्रशस्तीपत्रें हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालण्यात फोऱ्हान्स टूथपेस्टला मिळालेल्या आश्चर्यजनक यशाची स्तुति करतात. ही प्रशस्ती पत्रें जेफ्री मॅनर्स अॅण्ड कं. लि. ऱ्या कोणत्याहि कार्यालयात पहावयास मिळतील.

"मला दांतांच्या विकाराचा त्रास होत असे. मी आपली फोऱ्हान्स वापरू लागलो. आता मला दांतांचा कोणताच विकार नाही. सुमारे २० ते २५ लोक आधीची टूथपेस्ट बदलून फोऱ्हान्स वापरू लागले आहेत. आणि माझ्या कुटुंबात तर ती सर्वांची अत्यंत आवडती होऊन राहिली आहे."

—उदयशंकर तिवारी, पाटणा.

"शास्त्रीय पद्धतीने बनविलेली आपली **फोऱ्हान्स टूथपेस्ट** गेली दहा वर्षे मी वापरीत असून तिच्यामुळे माझे **हिरड्यांचे** सर्व विकार दूर झाले. आता माझ्या कुटुंबातील सर्वजण **फोऱ्हान्स टूथपेस्टने** नियमितपणे दांत घासतात."

—एस्. एम्. लाल, नवी दिल्ली.

## फोऱ्हान्स

### —दंतवैद्यानें निर्मिलेली टूथपेस्ट

दांतांची योग्य निगा राखण्यासाठीं फोऱ्हान्स टूथपेस्ट व फोऱ्हान्स दुहेरी कार्य करणारा टूथब्रश दर रात्रीं व सकाळीं वापरा... आणि आपल्या दंतवैद्याकडे नियमितपणें जात चला!



मोफत! "दांतांची व हिरड्यांची निगा" नामक रंगीत पुस्तिका

ही पुस्तिका आपल्याला मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमधून मिळूं शकेल. त्याकरितां हे कूपन भरून (टपालखर्चासाठीं) १५ पैशांच्या स्टॅम्पसहित पुढील पत्त्यावर पाठवा: मॅनर्स डेन्टल ॲडव्हायझरी ब्यूरो, पोस्ट बॅग क्रमांक १००३१, मुंबई १.

नांव ______________ वय ____

पत्ता ______________

भाषा ______________

54F-152 MR

M—22

# का ही नों दी

[ बनारस हिंदू विद्यापीठात तंत्रज्ञानाच्या विद्या-शाखेत ( Faculty ) पदव्युत्तर अभ्यास करीत असलेले व परवाच्या दंगलीच्या घटनांचे साक्षीदार श्री. सुरेंद्रनाथ द्विवेदी यांच्या मुंबईतील मुलाखतीवर आधारीत ]

नुकत्याच झालेल्या दंगलींच्या अंतरंगात शिरण्यापूर्वी विद्यापीठात त्याआधी झालेल्या आंदोलनाचा मागोवा घेतला पाहिजे. पहिली चळवळ झाली ती त्या वेळचे शिक्षणमंत्री श्री. छागला यांच्या 'हिंदू' शब्द रद्द करणाऱ्या लोकसभेतील ठरावाविरुद्ध. विद्यापीठातील सर्व विद्यार्थ्यांच्या पाठिंब्याने झालेल्या या आंदोलनाचे रूप जवळजवळ शांततामय होते. त्यानंतर सुरू झाले ते देशव्यापी हिन्दी आंदोलन. उत्तर व दक्षिणेतील दोन्हीकडच्या विद्यार्थ्यांचा या विषयावर तोल सुटला होता. बनारस हिन्दू विद्यापीठातील विद्यार्थ्यांवरही याचा परिणाम होणार असे दिसू लागले होते. बस व ऑफिसांपासून ते चित्तरंजन लोकोमोटिव्ह जाळण्यापर्यंत बेत चालले होते. सुदैवाने या राष्ट्रीय संपत्तीच्या विध्वंसनाच्या प्रश्नावर काही मंडळी खंबीर राहिली व आंदोलनाला अनिष्ट वळण लागावयाचे टळले.

अजित पटवर्धन

□ राष्ट्रपतींतर्फे श्री. राजनारायण ( संसोपा ) आणि श्री. सत्यनारायण सिन्हा ( कम्युनिस्ट ) यांच्यासारख्या राजकारण्यांची विद्यापीठ विधिसभेवर ( Senate ) नेमणूक ही अलीकडच्या घटनांची नांदी म्हणावी लागेल. त्यामुळे उद्भवलेले प्रसंगही लगेच सांगतो. सध्याचे कुलगुरू श्री. जोशी यांच्या उपस्थितीत विधि-

सभेची बैठक चालली होती. श्री. राजनारायण यांनी विद्यापीठाचा उल्लेख हिन्दू शब्द वगळून करण्याचे धोरण ठेवले. काही सदस्यांनी त्यांस विरोध केला. राजनारायण चिडले व टेबलावर उभे राहून अद्वातद्वा बोलू लागले. कुलगुरूंनी बैठक स्थगित केली. राजनारायणांनी मांडणात नसलेल्या मंडळींना मांडणात ओढण्याकरिता रा. स्व. संघाचे येथील काम नेस्तनाबूत करीन, अशी घोषणा केली.

□ एकदा वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी एका सतत चोऱ्या करणाऱ्या मनुष्याला ठोकले. मुलांनी मारपीट केल्यानंतर तीन दिवसांनी हा चोर इस्पितळात मरण पावला. हा चोर नेमका मुसलमान निघाला. त्यावर बराच गहजब करण्यात आला. प्रकरण राष्ट्रपतींपर्यंत नेण्यात आले. घटनेला वेगळाच रंग देण्यात आला व त्याचे खापर संघाच्या मंडळींवर फोडण्यात आले.

□ विद्यापीठातील निरनिराळ्या कार्यक्रमांना पाहुणे म्हणून आलेल्या आपल्या पंतप्रधान व उपपंतप्रधान यांना बोलू देण्यात आले नाही तर गृहमंत्र्यांना काळी निशाणे दाखविण्यात आली.

□ विद्यापीठाच्या विद्यार्थी युनियनच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत कम्युनिस्टप्रणीत स्टुडंट फेडरेशनचे श्री. नरेन्द्रप्रसाद सिन्हा निवडून आले. पेकिंग रेडिओनेसुद्धा हा विजय घोषित केला.

□ अलिकडच्या घटनांची सुरुवात जगजीवनराम यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी झाली. समारंभाच्या वेळी मंत्र्यांबरोबर येणारा पोलिसांचा लवाजमा हजर होता. काही मंडळींनी ह्या पोलिसांना आधी विद्यापीठाच्या आवाराबाहेर काढा अशी मागणी केली. कुलगुरू श्री. जोशी यांनी ते पोलीस मंत्र्यांबरोबर आले आहेत व त्यांच्याचबरोबर जातील असे सांगितले. जेव्हा कार्यक्रमानंतर पाहुण्यांना पोचवून कुलगुरू परत येत होते, तेव्हा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारापाशीच त्यांच्या मोटारी अडविण्यात आल्या. त्या विद्यार्थ्यांनी कुलगुरूंशी उद्धट वर्तन केले, एका चपराशाला मारले. रेक्टर डॉ. हजारीप्रसाद द्विवेदीदेखील त्यांच्या तडाख्यात सापडले. या प्रकारामुळे विद्यापीठात प्रक्षोभ निर्माण झाला. तीन विद्यार्थी नेत्यांना विद्यापीठातून काढून टाकण्यात आले. श्री. नरेन्द्रप्रसाद सिन्हा व श्री. मजुमदार यांचा त्यांत समावेश होता. मजुमदार हे चतुर्थश्रेणी सेवक युनियनचे अध्यक्ष आहेत तर सिन्हा कम्युनिस्ट पुढारी आहेत. दहा दहा वर्षे ही मंडळी विद्यापीठात शिकत आहेत व त्यामुळे त्यांना विद्यार्थी म्हणावे लागते.

□ कुलगुरूंनी या मंडळींवर केलेल्या कारवाईचे विद्यार्थ्यांनी, छात्र महासंघ व अध्या-

पक संघ यांनी समर्थन केले. ह्यामुळे चिडून जाऊन समाजवादी युवजन सभा (S.Y.S) व स्टुडंट फेडरेशन (S. F.) या संघटनांनी हरताळाचा आदेश दिला. त्यांनी असा तीन–चार वेळेला दिलेला आदेश मानला गेला नाही व हरताळ पूर्णतः अयशस्वी झाला. मग त्यांनी दि. २८ ऑक्टोबरला एक निकराचा प्रयत्न करावयाचे ठरविले. २७ तारखेला बाहेरून अनेक मंडळी बोलविण्यात आली. विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ सभा आयोजित केली होती. त्या छात्रमहासंघाच्या कार्यकर्त्यांनी व्यासपीठावरून बोलण्याच्या संधीची मागणी केली. सभा गोंधळात बंद पडली. त्या दिवशी रात्री, विद्यार्थ्यांनी दि. २८ ला विद्यापीठात जाऊ नये म्हणून मनधरणी करण्यात आली. आमच्या (राजकीय) जीवनमरणाचा प्रश्न आहे असेही हे नेते सांगत होते. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, २८ तारखेला विद्यापीठात जास्तीत जास्त उपस्थिती होती.

¤ दुसऱ्या दिवशी या मंडळींनी बाहेरची मुले गोळा केली व ध्वनिक्षेपकांसह विद्यापीठाच्या आवारात घुसण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रॉक्टर श्री. पटवर्धन यांनी तसे घुसण्यास मनाई केली, तेव्हा त्यांच्यावर सुरीहल्ला करण्यात आला. त्यांना वाचविण्याकरिता आतील विद्यार्थी मदतीला धावले. मग धुमश्चक्रीच झाली. हल्लेखोर पळून गेले. आता कुलगुरूंच्या बंगल्यावर दगड फेकणे, ॲसिडच्या बाटल्या फेकणे वगैरे प्रकार चालू झाले. नंतर दोन–तीन दिवसांतच तेथील अध्यापक संघाची जीप व टीचर्स ट्रेनिंग कॉलेजची बस जाळण्यात आली व डीन आणि स्टुडंट ऑफिसला आग लावण्यात आली. तेथील पोस्ट ऑफिसही यातून सुटले नाही. एवढ्याने भागेना म्हणून की काय अनेक दुर्मिळ पुस्तकांनी युक्त असे विद्यापीठाचे प्रचंड ग्रंथालय जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे पोलीस विद्यापीठाच्या आवारात शिरले. लगोलग विद्यापीठाच्या आवारातील काही दुकाने लुटण्यात आली. लुटालूट करणारी मंडळी वसतिगृहात लपून बसली. पोलिसांनी शोधाशोध व पाठलाग सुरू केला. वसतिगृहातील अनेक निरपराध विद्यार्थ्यांना त्यामुळे त्रास झाला. धरपकड व मारहाण झाली. वसतिगृहांतून संपूर्ण गोंधळ माजला. वसतिगृहे रिकामी होऊ लागली. या प्रकाराबद्दल कुलगुरूंना दोष देण्यात येऊ लागला. विद्यापीठ बंद पडले. जे हरताळ पाडू इच्छिणाऱ्या मंडळींना दीड महिन्यात जमले नाही ते यामुळे विनासायास साध्य झाले.

¤ याच काळात विद्यार्थिनींचे छेड काढण्याचे प्रकार झाले व त्याचा आरोप संघाच्या मंडळींवर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच चोऱ्या करणाऱ्या एका चपराश्याला विद्यार्थ्यांनी चोप दिला. या उपद्रवी मंडळींनी त्याला धाकधपटशा दाखवून एका खाणीत नोकरीस लावले व इकडे, तो मेला अशी आवई उठविली.

मजुमदाराच्या चतुर्थश्रेणी सेवक संघातील मंडळी चिडावी असा उद्देश होता. पण छात्रमहासंघाच्या मंडळींनी त्याला शोधून आणून एका सभेत हजर केले.

¤ या सर्व प्रकारांत अनेकांचे हितसंबंध गुंतलेले होते. चळवळया विद्यार्थी नेत्यांना अटक होऊ नये म्हणून श्री. राजनारायणांपासून ते केंद्रीय मंत्री दिनेशसिंगांपर्यंत अनेकांनी प्रयत्न केले. श्री. रुस्तुम सैटिन (कम्युनिस्ट उपगृहमंत्री संविद सरकार) ह्यांनी ही मंडळी सुटावी म्हणून प्रयत्न केले. पण नंतर हे गृहस्थ, तसेच चारूदत्त त्रिपाठी (मार्क्सिस्ट) व इतर अनेक कार्यकर्ते पकडले गेले. कम्युनिस्टांच्या कचेरीवर छापा घालण्यात आला. मार्क्सिस्ट कम्युनिस्टांचे प्रदेश चिटणीस रवी सिन्हा पकडले गेले. नंतर लोकसभेत समाजवादी व कम्युनिस्ट यांनी संघ व जनसंघाच्या नावाने ओरड केली.

¤ विद्यापीठात कुलगुरूपद मिळावे म्हणून श्री. त्रिपाठी यांच्यासारख्या वरिष्ठ प्राध्यापकांचे प्रयत्न चालूच होते. त्यामुळे म्हणून की काय, डॉ. जोशींसारख्या श्रेष्ठ शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ असलेल्या माणसावर चिखलफेक करण्यात आली. शिस्तप्रियता व खंबीर धोरण यांचा अर्थ ते संघवाले आहेत असा लावण्यात आला.

आता श्री. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमली गेली आहे. त्याच वेळी देशातील शिक्षणाविषयी आस्था बाळगणाऱ्या व विचार करणाऱ्या मंडळींपुढे ही घटनांची मालिका ठेवली आहे.

○


स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ शीतल चंद्रावरचा हॉट् डॉग

एका अमेरिकन विमान-कंपनीने चंद्रावर जाण्यासाठी ॲडव्हान्स बुकिंग सुरू केले आहे व आतापर्यंत एक हजार माणसांनी रिझर्व्हेशन करून ठेवले आहे असे नुकतेच वर्तमानपत्रांत वाचले. कल्पना अगदी गगनाला गवसणी घालणारी आहे, पण परलोक-प्रवासाची इतकी घाई झालेली मंडळी आपल्या तरी पाहण्यात नव्हती. त्यातून अमेरिकन पर्यटक म्हटला की अत्याधुनिक सुखसोयी हव्यातच, तेव्हा चंद्रावर त्यांची कितीशी तरतूद शक्य आहे हे पाहणे क्रमप्राप्तच आहे. पहिली गोष्ट म्हणजे चंद्रावर हवाच नाही, मग या अमेरिकन मंडळीसाठी बांधाव्या लागणाऱ्या आलीशान हॉटेलात 'एअर' कंडिशनिंगची व्यवस्था काय ? मला वाटते ही समस्या सोडविण्यासाठी आधी हिंदुस्थानातल्या राजकीय पुढाऱ्यांचे एक शिष्टमंडळ चंद्रावर पाठवावे, म्हणजे ही मंडळी सवयीनुसार तोंडाची वाफ दवडून दवडून योग्य ते 'वातावरण' निर्माण करतील. बरे, हवा म्हटली की पाणी आलेच. चंद्रावर पाणीही नाही. पण अमेरिकन माणसाचे पाण्यावाचून फारसे अडत नाही. कोकाकोला पुरेसा असला की झाले. शिवाय परदेशातले पाणी अस्वच्छ व अपायकारक असेल की काय अशी अमेरिकन प्रवाशाला नेहमी भीती वाटतेच. तेव्हा मुळात पाणी नसले की पाण्याची भीती कोठून असणार ? त्यातूनही पाण्याशिवाय जीवन कंठण्याचे ट्रेनिंग ज्या अमेरिकन प्रवाशांना हवे असेल त्यांनी आधी भर उन्हाळ्याच्या दिवसांत आठ-पंधरा दिवस दिल्लीला मुक्काम करावा म्हणजे झाले. पाण्याची एक अडचण सोडली तर चंद्रावर पिण्याची अडचण पडू नये. कारण हवे तेवढे पेग मारले तरी सुधाकररावाची सुधा संपायची नाही.

आणखी एक मोठी अडचण म्हणजे कॅमेरा. हे अमेरिकन प्रवासाच्या अंगचे अविभाज्य अंग आहे, तेव्हा फोटो काढण्यालायक प्रेक्षणीय स्थळे चंद्रावर नसतील तर ? चंद्राच्या टूरिस्ट डिपार्टमेंटने संस्कृत कवींची वर्णने उसनी घेऊन आपले प्रवास-पत्रक तयार केले असेल तर अशी भीती बाळगायला नको. तरीदेखील भारत सरकारच्या बांधकामखात्याने राजधानी दिल्लीत कारकुनांचे तबेले बांधायचा कार्यक्रम दोन-चार महिने स्थगित ठेवून तेवढ्या वेळात चंद्रावर ताजमहाल

उभारला तर एक मोठी सोय होईल. आणि शेवटीं म्हणजे शॉपिंग हे अमेरिकन पर्यटकाचे अवतारकार्य असते, तेव्हा चंद्रावर त्याला वाव किती ? अर्थात स्त्री-प्रवाशांना चंद्रमण्याच्या माळा एकदम स्वस्तांत मिळतील यांत शंका नाही, पण इतर हँडीक्राफ्टसची सोय काय हे एक चंद्रमौळी शंकरच जाणे. राहता राहिली एकच अडचण—शीतल चंद्रावर हॉट् डॉग कसा मिळणार ? याला मात्र उपाय नाही. चंद्रावरचे टूरिस्ट डिपार्टमेंट आणि अमेरिकेतली विमान-कंपनी या दोघांनी मिळून असा आभास निर्माण केला असला की, चंद्रावर स्वर्गसुख आहे, तरी ज्या स्वर्गात हॉट् डॉग नाही तो स्वर्ग कसला ?

## □ अज्ञानातला सरकारी आनंद

शासनयंत्रणेत सुधारणा सुचविण्यासाठी नेमलेल्या समिती अध्यक्षाने परवा अशी माहिती दिली की, हिंदुस्थानातल्या काही मंत्र्यांना अक्षरओळखदेखील नाही. यात माझ्या मते आश्चर्यकारक काहीच नाही. कारण पहिली गोष्ट म्हणजे मंत्री व्हायला साक्षर असावे लागत नाही—संत्री व्हायला लागते. (मद्रास सरकारने नुकताच फतवा काढला आहे की, चपराशी व्हायला कमीत कमी आठवी पास असले पाहिजे.) दुसरे म्हणजे एकदा मंत्री साक्षर झाला की, त्याच्यावर स्वतःची भाषणे दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांत वाचण्याचा दुर्धर प्रसंग नित्य ओढवेल, अन् एवढा छळ सोसून मंत्री राहायला कोण तयार होईल ? तिसरे म्हणजे मंत्रिपद मिळवायला माणूस सौदेबाजीत हुशार असावा लागतो. उलट कुठलाही सुशिक्षित माणूस दोन आण्यांच्या भाजीचा सौदादेखील नीट करू शकत नाही. (—त्याच्या बायकोलाच विचारा !) शिवाय बहुतेक सुशिक्षित माणसे नाजूक असतात, तर मंत्री व्हायला धडधाकट प्रकृती लागते. म्हणजे सकाळ-संध्याकाळ भाषणे देण्याइतके नरडे जोरदार लागते. मंत्रीपद मिळविण्यासाठी रोज एका पक्षातून दुसऱ्या पक्षात भ्रमंती करण्यासाठी तंगड्या जोरदार लागतात, तर विरोधी पक्षाच्या वाक्बाणांपुढे टिकाव धरण्यासाठी कातडी निबर लागते. थोडक्यात म्हणजे तेथे पाहिजे जातीचे. मला वाटते, अशिक्षितांनी मंत्री व्हावे व सुशिक्षितांनी कारकून व्हावे असे देवानेच श्रम-विभाजन करून ठेवले असावे. शिवाय अशिक्षित मंत्री कितीही मूर्खपणाने वागला तरी त्याला कोणीही पढत-मूर्ख म्हणू शकणार नाही हा फायदा आहेच. एकूण काय अज्ञानात सरकारी आनंद आहे. ○



अमरिकसिंगासारख्या अट्टल बदमाषाशी जयपालकौरचे लग्न झाले. जयपालच्या गळ्यात जणू दुःखानंच माळ घातली. तिची सवत बलजितकौर हिने शिताफीने जयपालला तिच्या माहेरी, सरदार लाभासिंगांकडे पाठवले. अमरिकसिंग पाठोपाठ तेथे गेला आणि बाचाबाची होऊन त्याने लामसिंगांचा खून केला. जयपालला जखमी केले. तो स्वतः जखमी झाला व त्या अवस्थेतच सबइन्स्पेक्टर इंद्रसिंगांनी त्याला पकडले.

आपल्या उलट सुलट जबान्यांनी त्याने आपल्या विरुद्धच्या भरभक्कम पुराव्यांची पण दाणादाण उडवली आणि सर्वांत कमाल म्हणजे भर कोर्टातून तो पळून गेला. त्याच्या शोधासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न होता होता तीन वर्षांची पाने उलटली.

दिल्ली पोलिसांना त्याचा सुगावा लागला आणि डॉ. अमरस्वरूप आझाद या नव्या स्वरूपात त्याला त्यांनी पकडलं. पुन्हा खटल्याची चक्रे वेगाने फिरायला लागली. दोन्ही बाजूंच्या मिळून ८२ साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. अमरिकसिंगाचे भविष्य अनिश्चिततेच्या लाटांवर हेलकावे खात होतं. आणि ४ ऑक्टोबरला प्रथम मान म्हणून अमरिकसिंगाचे वकील आपल्या भाषणासाठी उभे राहिले. मोठ्या आत्मविश्वासाने त्यांनी भाषणाला सुरुवात केली, " प्लीज युवर ऑनर ! "

आपला काळा झगा सावरीत सरकारी वकील म्हणाले, "या महत्त्वाच्या आणि गाजलेल्या खटल्यात सरकार पक्षाचे म्हणणे असे आहे,

की तारीख १५ फेब्रुवारी १९५० ला अमरिकसिंग नावाच्या कुणा एका इसमाने (!) त्याचे सासरे (!) सरदार लाभसिंग—की ज्यांना माझे अशील डॉ. अमरस्वरूप आझाद यांनी पाहिलेलेदेखील नव्हते !—यांचा जाणून बुजून आणि हेतुपुरःस्सर खून केला ! त्याची पत्नी जयपालकौर हिच्यावर त्याने (!) हकनाक गोळी मारली ! त्याचप्रमाणे तिथे हजर असलेले पंच सरदार अमरनाथ यांना उगाचच गोळी मारली ! युवर ऑनर, एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की असा तो (!) अमरिकसिंग ! सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग आणि इतर अनेक कॉन्स्टेबल्स हजर असताना त्यांच्यादेखत मॅजिस्ट्रेट कोर्टातून पळाला ! सरकार पक्षाचे महत्त्वाचे साक्षीदार सबइन्स्पेक्टर चौधरी राधाकिशन हे मी त्यांच्या घेतलेल्या उलटतपासणीत कबूल करतात की, या घटनेमुळे पंजाब पोलिसांची अब्रू गेली ! वृत्तपत्रात या घटनेला खूप प्रसिद्धी मिळाली ! आणि याच घटनेमुळे अंबाला पोलीस स्टेशनचे त्या वेळचे सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग यांची तडकाफडकी बदली होऊन सबइन्स्पेक्टर चौधरी त्यांच्या जागी आले ! काय घडले असेल युवर ऑनर ? आपली गेलेली अब्रू वाचविण्यासाठी पंजाब पोलीस अशा कुठल्यातरी माणसाच्या शोधात होते की खरा अमरिकसिंग मिळत नसला तर निदान त्याच्यासारखा दिसणारा कुणीतरी पकडून आणू (!) लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करू आणि आपली गेलेली अब्रू वाचविण्याचा निदान प्रयत्न करू ! पंजाब पोलीस लोकांना बनविण्यात यशस्वी ठरले युवर ऑनर ! पण मला खात्री आहे युवर ऑनर ! की या कोर्टाला ते बनवू शकत नाहीत. हे मी उगाच बोलत नाही युवर ऑनर ! सरकार पक्षाचे म्हणणे असे की २० जून १९५३ ला कुणी एक खबरी म्हणे दिल्ली पोलीस स्टेशनवर गेला ! त्याने पोलिसांना खबर दिली की, अमृत हॉटेल, दिल्ली येथे उतरलेला माझा अशील डॉ. अमरस्वरूप आझाद हाच अमरिकसिंग आहे ! युवर ऑनर ! मला ठाऊक आहे की एव्हिडन्स ॲक्ट (Evidance Act) प्रमाणे खबरी कोण होता ते जाहीर करायला पोलीस बांधलेले नाहीत. पण युवर ऑनर ! त्याचप्रमाणे हा एव्हिडन्स ॲक्ट असे कुठेही म्हणत नाही की 'खबरी'चे नाव पोलिसांनी कधीच सांगू नये म्हणून ! मग या खटल्यात खबरीचे नाव पोलिसांनी सांगण्याचे का नाकारले ? कारण 'खबरी' असा कुणी नव्हताच ! केवळ नैसर्गिक चमत्काराने, योगायोगाने, माझे अशील डॉ. अमरस्वरूप आझाद यांचा चेहरा त्या आरोपी अमरिकसिंगाशी थोडासा जुळतो म्हणून पोलिसांनी माझ्या अशीलाला या खटल्यात गुंतवले ! युवर ऑनर ! आपल्याला ठाऊक आहे ज्या आरोपीवर खुनासारखा

गंभीर आरोप असतो अशा आरोपीला मॅजिस्ट्रेटने पोलीस कस्टडीत ठेवो किंवा जामीन देवो ! पोलीस त्यांच्या रजिस्टरमध्ये आरोपीला जामिनावर सोडण्या-पूर्वी किंवा पोलीस कस्टडीत असतानाच त्याचे अंगठे घेतात! सबइन्स्पेक्टर चौधरी राधाकिशन यांना ते रजिस्टर घेऊन या कोर्टापुढे पुन्हा एकदा यावे लागेल ! आणि युवर ऑनर ! आपण पाहिले असेल की त्या पुस्तकात ( रजिस्टर ) बाकी सर्व आरोपींचे अंगठे असलेली पाने आहेत मात्र त्या (!) आरोपी अमरिकसिंगाचा अंगठा ज्या पानावर होता ते पानच नेमके गायब ! ते रजिस्टर पोलीस स्टेशनमध्ये असताना ! माझ्या अशीलाविरुद्ध केस बनवीत असताना पोलीस या स्टेजला गेले की त्यांच्याच एका महत्त्वाच्या रजिस्टरमधले एक पान त्यांनी मुद्दाम फाडले ! नाहीसे करून टाकले ! का ? कारण त्या पुस्तकाच्या त्या पानावर घेतलेले आरोपी अमरिकसिंगाने अंगठे माझ्या अशीलाच्या अंगठ्याशी मिळते-जुळते नव्हते म्हणून ! युवर ऑनर ! मी खात्रीपूर्वक सांगतो की कॅप्टन मेनन यांनी जे अमरिकसिंगाचे आयडेंटिटी कार्ड या कोर्टाला सादर केले ! तो बनावट पुरावा आहे ! अमरिकसिंग B. A., LL. B. होता ! कुठला डबल ग्रॅज्युएट माणूस आपल्या आयडेंटिटी कार्डा-वर सहीबरोबर आपला अंगठादेखील देईल ? माझी खात्री आहे की ज्या वेळी कॅप्टन मेनन यांनी त्या कार्डावर अॅटेस्टेशन दिले त्या वेळी तिथे फक्त अमरिक-सिंगाची सही असली पाहिजे ! अंगठा जिथे उमटवलेला दिसत आहे तो चौकोन मोकळा असला पाहिजे ! पण पोलिसांनी मात्र याचा फायदा उठवला ! माझे अशील डॉ. अमरस्वरूप आझाद याचा अंगठा त्या ठिकाणी पोलिसांनी जबरदस्तीने उमटवून घेतला ! की जे आयडेंटिटी कार्ड त्या (!) अमरिकसिंगाचे आहे ! कॅप्टन मेनन मात्र त्या आयडेंटिटी कार्डावरचा अंगठा हा अमरिकसिंगाचाच आहे असे साक्षीत सांगतात ! खोटे सांगतात ! का ? कारण युवर ऑनर ! आपली गेलेली अब्रू वाचवण्यासाठी ! आपणांला थोडा त्रास देतो. माफ करा ! पण आयडेंटि-फिकेशन परेड घेणाऱ्या मॅजिस्ट्रेटचा रिपोर्ट पाहा !

( Sorry to disturb this Hon'ble Court ! if Your Honour will be pleased to refer to the report of the Magistrate ! ... )

काय दाखवतो तो रिपोर्ट ! कॅप्टन मेनन–जे सैन्यात असल्यामुळे त्यांची नजर असलीच पाहिजे–असे खुद्द माझे सरकारी वकीलमित्रच म्हणतात – ते कॅप्टन मेनन आयडेंटिफिकेशन परेडमध्ये डॉ. अमरस्वरूप आझाद यांना अमरिकसिंग म्हणून ओळखू शकले नाहीत ? कसे ओळखणार ? कारण माझे अशील डॉ. अमरस्वरूप हे अमरिकसिंग नव्हेतच. एवढ्यावर भागले ? खुद्द सासूबाई आपल्या जावयाला ओळखू शकणार नाहीत ! बायको आपल्या नवऱ्याला ओळखू शकणार नाही ? मी तर म्हणतो की आयडेंटिफिकेशन घेणाऱ्या मॅजिस्ट्रेटने जयपालकौरला जरुरीपेक्षा जास्त सवलती दिल्या ! सगळ्यांना चेहऱ्यावरच्या पट्ट्या काढायला लावल्या ! प्रत्येकाला तिच्याशी चार चार वाक्ये बोलायला सांगितली. सांगा ! कुठली पत्नी आपल्या

पतीचा आवाजदेखील ओळखू शकत नाही ?

( It was the Identification Parade of June 26, which attracted the spear-point of attack on the prosecution ! )

तरीदेखील त्या दोघी डॉ. अमरस्वरूप आझाद हाच अमरिकसिंग असे ओळखू शकल्या नाहीत ! कारण हा अमरिकसिंग नव्हेच ! राहता राहिले फक्त सरदार गुरुबक्षसिंग, की जे त्या आयडेंटिफिकेशन परेडमध्ये म्हणतात की हाच अमरिकसिंग ! इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे युवर ऑनर, की माझे अशील डॉ. अमरस्वरूप यांनी ओळखपरेड सुरू होण्यापूर्वीच मॅजिस्ट्रेटसाहेबांना तक्रार दिली होती की काल अंबाला पोलिसांनी मला काही लोकांना दाखवून ठेवले आहे म्हणून ! आणि ती तक्रार खरी असली पाहिजे युवर ऑनर ! कारण त्या लोकांच्यात दोन बायादेखील होत्या, अशी माझ्या अशिलाने तक्रार केली. पोलिसांची


वीर सावरकर, आत्मार्पण दिनानिमित्त विशेष सूट !

रुपये ४ ची पुस्तके २॥ रुपयांत

प्रचलित विचारांना हादरा देणारे आणि खळबळ माजविणारे

**स्वा. वीर सावरकर यांचे विज्ञाननिष्ठ निबंध**

**भाग १ : पृष्ठे ८४ : मूल्य २ रुपये**

★ मनुष्याचा देव नि विश्वाचा देव ! ★ ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय ? ★ खरा सनातन धर्म कोणता ? ★ यक्ष ( पूर्वार्ध–उत्तरार्ध ) ★ गोपालन–गोपूजन नव्हे ! ★ हा बौद्धिक आवडेपणा नव्हे काय ?

**भाग २ : पृष्ठे ९३ : मूल्य २ रुपये**

★ दोन शब्दांत दोन संस्कृती ! ★ आजच्या सामाजिक क्रांतीचे सूत्र ★ पुरातन की अद्यतन ? ★ मंत्र : यंत्राने का बेकारी वाढते ? ★ न जनयेत बुद्धिभेदम् म्हणजे काय ? ★ जर का आज पेशवाई असती ? ★ आमच्या धर्मभावना दुखवू नका अं !

हे विचारप्रवर्तक निबंध असलेली चार रुपयांची दोन पुस्तके

केवळ अडीच रुपयांत + टपालव्यय एक रुपया

**दोन्ही पुस्तके छापून तयार आहेत.**

आमच्याकडे किंवा आपल्या पुस्तक विक्रेत्यांकडे मागणी करा.

समग्र सावरकर वाङ्मय खण्ड १ ते ८ : पृष्ठे ५६०० : मूल्य १२०

लिहा : **वीर सावरकर प्रकाशन**

**सावरकर सदन, ७१ शिवाजी उद्यान, मुंबई २८**

आयडेंटिफिकेशन परेडच दाखवते की हा अमरिकसिंग नव्हे ! युवर ऑनर, माझा अशील मूळच होशियारपूरचा. पंजाब युनिव्हिसटीचा वैद्यकशास्त्राचा पदवीधर ! ईस्ट पंजाबचा भाग पाकिस्तानात गेला. १९४७ साली हिंदुस्थानची फाळणी झाली ! माझ्या अशिलाचे सर्व नातेवाईक त्यांच्या डोळ्यांदेखत अक्षरश: कापले गेलेले ! अशा वेळी तो इकडे पळून येताना काय त्याचे सर्टिफिकेट शोधत बसेल ? पाकिस्तानचे आपल्या देशातल्या नागरिकांबद्दलचे धोरण काय आहे, कसे आहे, त्यावर वेगळे भाष्य मला करायला नको ! पाकिस्तानातून पळून आलेल्या हिंदूंना पाकिस्तान सरकार साध्या त्यांच्या सर्टिफिकेटस्च्या नकलासुद्धा देत नाही ! आणि अशाही स्थितीत हा नाइलाजास्तव पुन्हा एकदा परीक्षेला बसून वैद्यकशास्त्रातली परीक्षा पास झाला ! असा माणूस कुणाचा खून करील हे कितपत संभवते ? १ नव्हे, २ नव्हे तर बचावाचे २३ साक्षीदार सांगतात की डॉ. अमरस्वरूप आझाद हे बनारसला प्रॅक्टिस करतात आणि आपण त्यांना डॉक्टर म्हणूनच ओळखतो ! उलट सरकार पक्षाचे सर्व महत्त्वाचे साक्षीदार म्हणतात की " हा तसाच दिसतो ! " युवर ऑनर ! अमरिकसिंग आणि डॉ. अमरस्वरूप आझाद ह्या एकच व्यक्ती आहेत दोन नव्हेत असे सरकार पक्ष संशयातीतरीत्या सिद्ध करू शकलेला नाही ! उलट आम्ही असे सिद्ध करू शकलो आहोत की डॉ. अमरस्वरूप आझाद हा अमरिकसिंग नव्हेच ! युवर ऑनर, चेहऱ्यावरचे साम्य हा गुन्ह्याचा पुरावा होऊ शकत नाही ! या गुन्ह्याशी डॉ. अमरस्वरूप आझाद यांचा कवडीमात्र संबंध नाही ! आणि म्हणून एका किळसवाण्या आरोपामधून एका निष्पाप वैद्यकशास्त्रासारखा पवित्र व्यवसाय करणाऱ्या, निपराध नागरिकाची निर्दोष मुक्तता करण्यात यावी अशी मी नम्र विनंती करतो ! "

उत्तम इंग्रजीमध्ये बचावाचे प्रदीर्घ भाषण करून अमरिकसिंगाचे वकील खाली बसले ! आपल्या वक्तृत्वशक्तीने त्यांनी ' सभा जिंकली ' होती ! खटला ऐकायला आलेली जवळ जवळ प्रत्येक व्यक्ती अमरिकसिंगाकडे सहानुभूतीने पाहू लागली ! नुसत्या शब्दांच्या फेकीने त्यांनी सरकार पक्षाच्या मजबूत पुराव्याच्या भिंतीला भगदाडे पाडून ती भिंतच खिळखिळी करून टाकली ! कोर्टात टाचणी पडली तरी आवाज यावा अशी शांतता होती. ते भाषण ऐकून पिंजऱ्यात बसलेल्या खुद्द अमरिकसिंगालासुद्धा असे क्षणभर वाटले असेल की, " अमरिकसिंग ! अमरिकसिंग म्हणतात तो मी नव्हेच ! "

अमरिकसिंगाच्या बचावाचे प्रमुख मुद्दे न्यायमूर्ती बेदींनी लिहून घेतले होते ! त्यांनी सरकारी वकिलांना त्यांची बाजू मांडण्यासाठी आदेश दिला आणि सरकारी वकील उभे राहिले. " प्लीज युवर ऑनर ! माझ्या वकीलमित्रांचे कायद्याचे सूक्ष्म ज्ञान ! त्यांचे अलौकिक वक्तृत्व, हेवा वाटावे असे इंग्रजी, याबद्दल आदर राखूनदेखील मी असे म्हणतो की, ' मला भारून टाकण्यासारखे काही बोलायचे नाही ! ' मी सुरुवातीलाच सांगतो की, माझ्या इतक्या वर्षांच्या सरकारी नोकरीत

हा पहिलाच खटला असा आहे की ज्यामध्ये खुद्द बचावपक्षदेखील कबूल करतो की अमरिकसिंग नावाच्या आरोपीने ता. १५ फेब्रुवारी १९५० ला सरदार लाभसिंग यांचा जाणून बुजून व हेतुपुरःस्सर खून केला! जयपालकौर व सरदार अमरनाथ यांच्या खुनाचा प्रयत्न केला आणि त्यानंतर स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला! अर्थात खुनासारखा गंभीर आरोप आरोपीने मान्य केला तरीदेखील सरकार पक्षाला त्याच्याविरुद्ध पुरावा द्यावाच लागतो आणि युवर ऑनर! तसा प्रचंड पुराव्याचा डोंगर आम्ही आपल्यापुढे उभा केला आहे. घडलेला तो भीषण प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहणारे १० साक्षीदार इथे तेच सांगतात की अमरिकसिंगानेच ही भीषण कृत्ये केली आणि युवर ऑनर! हा पुरावा बचाव पक्षाने चॅलेंज केलेला नाही. जयपालकौरने तिच्या माहेरी लिहिलेली पत्रे आम्ही साक्षीदार रामरखीमार्फत या कोर्टापुढे ठेवली आहेत की ज्या पत्रात तिने लिहिलेल्या घटना खऱ्या आहेत असेच इतर साक्षीदारांच्या साक्षीवरून स्पष्ट होतंय! एवढेच कशाला? खुद्द अमरिकसिंगाचे त्याला प्रथम अटक झाल्यानंतर त्याने फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटपुढे केलेले स्टेटमेंटदेखील या घटना घडल्या असेच दाखवतात! अप्रत्यक्षरीत्या अमरिकसिंगाने कबुलीजवाबच दिलेला आहे! उदाहरणार्थ पाहा, युवर ऑनर! जयपालकौर आपल्या पहिल्याच ३ सप्टेंबर १९४९ च्या माहेरी लिहिलेल्या पत्रात म्हणते 'आई! अग, ह्यांच्याबद्दल मी जे जे ऐकले ते ते खरे ठरले ग ऽ! ह्यांचे पहिले लग्न झालेले आहे! त्यांना बलजीतकौर नावाची पहिली बायको असून त्यांना दोन मुलेदेखील आहेत! हे चिक्कार पितात आणि माझा असह्य छळ करतात केवढी मोठी फसवणूक झाल्ये ही माझी!'

युवर ऑनर! इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की जयपालकौर मद्रासला घडणाऱ्या घटना गुप्तपणे पत्र पाठवून माहेरी कळवते हे आरोपी अमरिकसिंगाला ठाऊक नव्हते! कारण जयपालकौर याच पत्रात पुढे म्हणते 'आई! आता काय करू ग? तुझ्याकडे पळून येण्यावाचून मला गत्यंतर नाही! मेहरबानी करून या किंवा इथून पुढे माझ्याकडून येणाऱ्या पत्राला उत्तर देऊ नकोस! नाहीतर मी हे सर्व तुला कळवले म्हणून हे माझे इकडे आणखीनच हाल करतील!'

त्यानंतर १० सप्टेंबर १९४९ च्या पत्रात जयपालकौर काय म्हणते पाहा 'आई! मनाच्या अत्यंत असहाय्य अवस्थेत हे पत्र मी लिहीत आहे. वाहे गुरुची कृपा झाली तरच तुझीमाझी आता या जन्मात भेट होईल! मी इथून पळून जाण्याचा प्रयत्न केला ग! पण कसे कोण जाणे गाडी भोपाळ स्टेशनात थांबली आणि अचानक हे रागारागाने डब्यात घुसले! माझे सामान आणि मला खेचून बाहेर काढले! मी एकटी काय करणार? मला गुपचूप ह्यांच्याबरोबर परत जावंच लागलं. आतातर मला हे कुठंच जाऊ देत नाहीत. माझा असह्य छळ चालू आहे......"

युवर ऑनर, घटना खऱ्या घडल्या त्या अशा! आरोपी अमरिकसिंग आपल्या कबुलीजवाबात म्हणतो, 'मला कुणालाही फसवून दुसरं लग्न करायचं नव्हतं!'



युवर ऑनर ! 'अमरिकसिंग उर्फ डॉ. आझाद हा माणूस 'माणूस' म्हणवून घ्यायच्या लायकीचा नाही.

मग त्याची पहिली पत्नी बलजीतकौर त्याच्या दुसऱ्या लग्नाला का हजर नव्हती ? सरदार लाभसिंग हा एक सज्जन माणूस होता असं अंबाल्यातल्या बहुसंख्य साक्षीदारांनी सांगितलं आणि असा सज्जन माणूस केवळ हौस म्हणून दुसरं लग्न करणाऱ्या, दोन मुलांचा बाप असलेल्या माणसाला आपली लाडकी पोर केवळ २००० रुपयांसाठी देईल का ? शक्य नाही. आरोपी अमरिकसिंग पुढे म्हणतो, 'मी जयपालकौरला समजावण्यासाठी भोपाळ स्टेशनवर गेलो–' आपल्या पत्नीला समजावून परत आणण्यासाठी हा माणूस विमानाने जातो. जाताना त्याच पत्नीविरुद्ध पोलिस स्टेशनवर फिर्याद करून. पुढे पाहा युवर ऑनर, हा बेशरम भरकोर्टात सांगतो की, 'माझी मेहुणी हरबीरकौर माझ्याकडे मद्रासला आली. कशासाठी ? जयपालकौरवर लक्ष ठेवण्यासाठी ! तेव्हा तिनं माझं इतकं केलं, की माझं तिच्यावर प्रेम बसलं. तिचंही माझ्यावर बसलं. मी संभोग घेतला. हे जयपालकौरने माहेरी कळवलं. सासऱ्यानं हरबीरकौरबरोबर केलेल्या व्यवहाराबद्दल माझ्याकडे २००० रुपये मागितले. मी देण्याचं नाकारलं. म्हणून जयपालचं आणि माझं भांडण झालं. त्यानंतर माझ्या सासूबाई रामरखी यांनी जयपालला त्या पैशांसाठी पळवून

अंबाल्याला नेलं !' युवर ऑनर ! ही कपोलकल्पित भाकड कथा म्हणजे आपल्या भीषण कृत्यावर पांघरूण घालण्याच्या केविलवाण्या प्रयत्नाची तयारी होती. का ? कारण, मद्रासचे साक्षीदार काय सांगतात. ते सर्व साक्षीदार म्हणतात,

'बलजीतकौर आणि जयपालकौर दोघी सालस आहेत ! त्यांची चारित्र्यं घुतल्या तांदळासारखी स्वच्छ आहेत !' आणि अमरिकसिंग ? 'दररोज संध्याकाळी दारू पिऊन घरी येतो. बायकोशी नशेतच भांडण करतो आणि बलजीतकौरला माहेरी पाठवून कुठल्या कुठल्या घाणेरड्या बायांना रात्री बिल्डिंगमध्ये आणून धिंगाणा करतो !

आता चित्र स्पष्ट झालंय युवर ऑनर ! जयपालकौर शेवटी आपल्या हातातून निसटली ! आईकडं गेलीच. हे पाह्यल्याबरोबरच अमरिकसिंग संतापला. त्यानं रिव्हॉल्व्हर बरोबर घेतलं आणि १५ फेब्रुवारी १९५० ला अंबाल्याला आला. तो म्हणतो, 'जयपालकौर जिन्यात बसली होती ! मी तिला समजावायला तिथं गेलो.' बायकोची समजूत काढायला जाणारा नवरा खिशात पिस्तूल ठेवून जातो ? आणि तिला जिन्यात बसवून ठेवून तिच्याशी बोलतो ? काय ही भाकडकथा ! त्यानंतर पंच आले. अमरिकसिंग दारू प्यायलेला होता. निकाल त्याच्याविरुद्ध गेला आणि त्यानंतर अमरिकसिंगाने जाणून बुजून गोळीबार केला. सर्व पुराव्याचा आपण जर सुसंगतीने आणि साकल्याने विचार केला तर युवर ऑनर, संशयातीतरीत्या सिद्ध होत आहे की, आरोपी अमरिकसिंग हा इं. पी. को. कलम ३०२, ३०७, आणि ३०९ खाली दोषी आहे. युवर ऑनर मी पुन्हा एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणतो की, हा प्रचंड पुरावा बचावपक्षाने चॅलेंज केला नाही. करूच शकत नव्हते. त्यांच्या बचावाचं सूत्र काय ? तर 'तो मी नव्हेच' हे ! युवर ऑनर, आता मी त्या मुद्द्याकडे कळतो. माझं म्हणणं असं आहे की पोलीस खात्याकडून काही किरकोळ चुका व वरवर बघता पुराव्याच्या दृष्टीने थोडी पोकळी निर्माण झालेली आहे.

( Despite certain lacunae and apparent flaws in the case for the prosecution I say that...)

याचा अर्थ असा मात्र नव्हे की, आता कोर्टापुढं असलेला आरोपी अमरिकसिंग हा कोणीतरी वेगळाच आहे म्हणून. आम्ही असा भरपूर पुरावा पुढे आणला आहे की, एकाच निर्णयापर्यंत येऊन आपण पोचू आणि तो असा की, 'हाच तो अमरिकसिंग !' खुनी, मद्यपी, व्यसनी, कपटी, ढोंगी, म्याड !"

अमरिकसिंगांकडे बोट दाखवीत सरकारी वकील आवेशाने म्हणाले, "युवर ऑनर ! याला व्यसनं कोणती ? तर दारू आणि बाया ! याच्या बायकोचं नाव काय ? तर बलजीतकौर ! दिल्लीला अमृत हॉटेलपुढे हा पकडला गेला, तेव्हा याच्याजवळ मिळतं काय ? तीन बायांचे फोटो. की ज्या बायका ह्याच्या कोण ? ते तो ह्या कोर्टाला सांगू शकत नाही. ह्याच्या जवळ रेल्वे क्लोक रूमची रिसीट

सापडली त्यावर सही आहे ती बलजीतकौरची ! ' अमृत हॉटेल 'च्या खोलीतल्या झडतीत सापडतात त्या ' कंट्री लिकर 'च्या बाटल्या !" वैद्यक शास्त्राचा पवित्र व्यवसाय करणारा इसम कंट्री पितो ! वा ऽ रे डॉक्टर ! एवढंच नव्हे युवर ऑनर, सरकारी हॉस्पिटलचे डॉक्टर आपल्या साक्षीत सांगतात की ह्याच्या चेहऱ्यावरच्या जखमांच्या जागा, जखमांचं स्वरूप आणि प्रत्येक दोन जखमांतलं अंतर तंतोतंत अमरिकसिंगाच्याच जखमांप्रमाणं आहे ! अर्ध्या सेंटिमिटरचासुद्धा फरक नाही. युवर ऑनर ! माझे खुद्द वकीलमित्र बचावाच्या भाषणात म्हणतात, की योगायोगाने व नैसर्गिक चमत्काराने त्यांच्या अशिलाचा चेहरा अमरिकसिंगाशी मिळता जुळता असेल ! पण युवर ऑनर, जखमा, त्यांचं स्वरूप, त्यांमधलं अंतर की जे एका जबाबदार तज्ज्ञ डॉक्टरने आपल्या मेडिको-लीगल रिपोर्टमध्ये नमूद केलं आहे. हा काय केवळ चमत्कार ? नव्हे, नव्हे, हे शास्त्र आहे आणि तो रिपोर्ट हेच दाखवतो की हाच तो अमरिकसिंग ! बचाव पक्षाने एकूण २२ साक्षीदार आणले त्यांपैकी प्रत्येक साक्षीदार सांगतो फक्त इतकंच सांगतो की—मी आरोपीला डॉक्टर म्हणून ओळखतो आणि तेदेखील फक्त गेली २—३ वर्षं ! बस् ! याला ओळखतात ते फक्त पेशंटच ! बाकी याला कोणी मित्र नाही ! समाजातली इतर कुठलीही व्यक्ती याला ओळखत नाही ! तसा एकही साक्षीदार त्याला आणता आला नाही ! नातेवाईक ? थाप तयार आहेच ' सगळे पाकिस्तानात मारले गेले !' युवर ऑनर ! पाकिस्तान सरकार याला १९५१ च्या पूर्वीचं सर्टिफिकेट देत नाही असं हा म्हणतो ! कशावरून आणि हे कितपत खरं ? त्यानं पूर्वीचं सर्टिफिकेट मिळविण्यासाठी काय खटपट केली, कुठं अर्ज केला, कधी केला, त्याची नक्कल कुठाय, हे आरोपी अमरिकसिंग सांगू शकत नाही ! युवर ऑनर ! खून झाला १५ फेब्रुवारी १९५० ला ! आरोपी मॅजिस्ट्रेट कोर्टातून पळाला मार्च १९५० मध्ये ! आणि त्याच्याकडे त्याचं सगळ्यात जुनं सर्टिफिकेट आहे ते ऑक्टोबर १९५० या तारखेचं. त्यापूर्वी तो कोण होता ? अमरिकसिंगच. दुसरा कोणी नव्हे ! आयडेंटिफिकेशन परेडबद्दल मी इतकंच सांगेन की आरोपी अमरिकसिंगाने, " मला पोलिसांनी लोकांना दाखवला " अशी जी तक्रार दिली ती त्याच्या सुपीक मेंदूतून निघालेली बचावाची पूर्वतयारी होती ! सरदार गुरुबक्षसिंग यांनी त्याला ओळखपरेडमध्ये अचूक ओळखला आहे ! रामरखी आणि जयपालकौर यांच्याकडून चूक होणं साहजिक आहे ! कारण रामरखीच्या दोन्ही डोळ्यांत मोतीबिंदू आहेत तर जयपालकौर या वेळी अशा मन:स्थितीत असेल की, ज्या माणसानं आपली फसवणूक करून आपलं आयुष्य नासलं, आपला केवळ मानसिक नव्हे असह्य शारीरिक छळ केला ! आपण प्रथमच गर्भार असताना आठव्या महिन्यात आपल्याला गोळी मारली ! आपलं मिसकॅरेज झालं ! आपलं सबंध कुटुंब उद्ध्वस्त झालं...युवर ऑनर ! काय वाईट करायचं बाकी ठेवलं या माणसानं ? जयपाल-

कौरच्या बाबतीत तिच्या मनावर असलेलं दडपण (टेन्शन) किती असेल ? चुकले ते फक्त कॅप्टन मेनन ! पण तरीदेखील त्यांची साक्ष अविश्वासार्ह ठरत नाही ! खुद्द कोर्टापुढं असलेल्या आयडेंटिटी कार्डावरच स्पष्ट अट आहे की,

"Signature AND Thumb Impression should be taken..."

आणि कॅप्टन मेननच्या दर्जाचा आधिकारी फक्त सही घेऊन अंगठ्याची जागा मोकळी ठेवील, त्यानंतर त्या मोकळ्या जागेवर पोलीस डॉ. अमरस्वरूप नावाच्या भलत्याच माणसाचा आंगठा घेतील हे शक्य आहे ? की जो अंगठा आरोपी अमरिकसिंगाच्या पिस्तुलावरच्या अंगठ्याशी जुळतो, तंतोतंत जुळतो, असं फिंगर प्रिंट एक्स्पर्ट म्हणतो आणि म्हणून म्हणतो युवर ऑनर ! आत्ता कोर्टापुढं असलेला आरोपी हाच तो अमरिकसिंग, हे संशयातीतरीत्या सिद्ध होत आहे युवर ऑनर ! कोर्टापुढे असलेला आरोपी हा अमरिकसिंग नव्हे, या निर्णयापर्यंत जर का आपण येऊन पोचलात तर ते सरकार पक्षाचं दुर्दैव ठरेल पण तरीदेखील तो निकाल मान्य करू. कारण तो न्यायदेवतेचा निकाल आहे.

पण युवर ऑनर, आत्ता कोर्टापुढं असलेला आरोपी हाच तो अमरिकसिंग ! या निर्णयापर्यंत आपण आलात तर मात्र मी म्हणतो की आरोपीच्या पिंजऱ्यात बसलेला हा अमरिकसिंग ऊर्फ डॉक्टर अमरस्वरूप आझाद हा माणूस, 'माणूस' म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाही ! साक्षात नरपशू आहे ! याला नरपशू म्हणणं म्हणजे पशूंचाच अवमान आहे ! जनावरांतसुद्धा काही काही गुण वाखाणण्याजोगे असतात. अमरिकसिंगाची व्यसनं कोणती ? कंट्री दारू आणि बाया ! आणि इतक्या बायांशी मजा करूनसुद्धा ज्याची घाणेरडी वासना पूर्ण झाली नाही ! स्वतःच्या स्वार्था-साठी हा एका कोवळ्या वयाच्या अश्राप मुलीला फसवतो. विवाहसंस्था म्हणजे 'हौस भागवायचं साधन' समजतो ! भरकोर्टात "माझ्या मेव्हणीशी मी संभोग घेतला" असं सांगण्याइतका हा निर्लज्ज आहे ! हा सज्जन माणसांना सहज गोळ्या मारू शकतो ! आपली पहिली पत्नी, दोन मुलं, दुसरी पत्नी यांची बदनामी हा करू शकतो. ज्याचा ह्याने अमानूष खून केला त्या सज्जन सासऱ्याची व त्यांच्या दोन निष्पाप मुलींची की त्यांपैकी एक ह्याची पत्नी आहे. गलिच्छ बदनामी भर कोर्टात करून आपण किती नीच आहोत हे सिद्ध करतो ! आपल्या पत्नीला आठवा महिना लागलेला असून तिला गोळी मारतो. इतका हा क्रूर आहे. पंचांचा निकाल आपल्या बाजूने लागला तर ठीक ! नाहीतर ? गोळी ! ही ह्याची समा-जात वावरण्याची पद्धत आहे. हा कोर्टातूनदेखील पळून जाऊ शकतो. याच्या-कडे असं जीवनाचं कुठलं मूल्य आहे की ज्यामुळे याला जिवंत राहायचा अधिकार आहे ? कायदा, न्याय, व्यवस्था, चारित्र्य, सभ्यता, निर्व्यसनी जीवन, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, शिक्षणाचे संस्कार यांपैकी काही म्हणजे काहीच हा मानीत नाही हे त्यानं आपल्या नीच कृत्यांनी सिद्ध करून दाखवलं. हा अमरिकसिंग समाजात

सोडण्याच्या लायकीचा तर नाहीच, पण जयपालकौरला जिन्यावरून गडगडत खाली येताना, मिसकॅरेज होत असताना, नंतर सात महिने हॉस्पिटलमध्ये तळमळत असताना किती यातना झाल्या असतील ? सरदार अमरनाथसारखा निरपराध माणूस, की ज्यांनी याला काहीही गुन्हा केलेला नव्हता, त्यांना म्हातारपणी अवघ्या चार फुटांवरून हा सहज गोळी मारतो, त्यांना किती यातना झाल्या असतील ? सरदार लाभसिंग यांच्या पोटात गोळी मारून याने त्यांचा अक्षरश: कोथळा बाहेर काढला. कसे तडफडत मेले असतील ते, याचा गंभीर विचार व्हावा आणि स्वत:च्या क्षुद्र स्वार्थासाठी उगाचच हे सर्व करणाऱ्या या निर्लज्ज नराधमाला मरेपर्यंत फाशीची सजा द्यावी अशी मी नम्र विनंती करतो ! ”

सरकारी वकील खाली बसले ! कोर्टातले वातावरण तंग झाले होते ! दोन्ही वकिलांनी कमाल केली होती. दोघांची बाजू ऐकताना खरी वाटत होती. अमरिकसिंगाच्या छातीत धडधडू लागले. काय होणार ? काय होणार ? आपले भवितव्य काय ?

न्यायमूर्ती बेदी यांनी दोन्ही वकिलांना निकालाची तारीख दिली आणि ते उठून गेले ! कडेकोट बंदोबस्तात अमरिकसिंगाला जीपमध्ये घालण्यात आले. जीप सुरू झाली. मागच्या बाजूला धूळ उडाली ! आणि त्या धुळीकडे पाहत पाहत अमरिकसिंग विचार करू लागला, “ काय होणार ? काय होणार ? निर्दोष की फाशी ! ”

दहा ऑक्टोबर १९५४. आज ‘ सरदार लाभसिंग खून खटल्या ’चा निकाल होता. सेशन्स कोर्टात उभे राहायलाच नव्हे तर आत शिरायलादेखील जागा नव्हती. आजूबाजूच्या खिडक्यांना लागून असलेल्या झाडांवर बसायलादेखील जागा नव्हती. बरोबर अकरा वाजता न्यायमूर्ती बेदी सिंहासनावर बसले. आपल्या इतमामाने बसले. शॉर्ट-हॅंड टायपिस्ट आला. त्यांच्या बाजूला बसला आणि न्यायमूर्ती बेदी जजमेंट सांगू लागले. लोक प्राण कानात ओतून ऐकू लागले. सरकारची केस काय आहे ? सरकार पक्षाचे ३६ आणि बचाव पक्षाचे २३ साक्षीदार मला कसे दिसले, काय घटना घडल्या असतील, कशा घडल्या असतील, साक्षीदारांपैकी खरे कोण, खोटे कोण ? याची बारीक सारीक चिकित्सा त्यांनी चालू केली. सेशन्स कोर्टात आवाज येत होते ते फक्त दोन ! एक न्यायमूर्ती बेदींचा आणि दुसरा घड्याळाचा! टक् टक् टक् टक् ! शेवटी दुपारी न्या. मू. बेदी यांनी निकाल जाहीर केला. आरोपी अमरिकसिंग आणि डॉ. अमरस्वरूप आझाद या दोन्ही व्यक्ती एकच आहेत आणि अमरिकसिंग यानेच सरदार लाभसिंग यांचा १५ फेब्रुवारी १९५० ला जाणून बुजून आणि हेतुपुरस्सर खून केला. दोन खुनांचा प्रयत्न केला !

(It is nobody, but the accused Amriksingh alias Dr. Amar-swarup Tejsingh Azad who has intentionally caused death of Sardar Labhsingh and... )

आणि स्वत: आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला! एवढेच नव्हे तर मॅजिस्ट्रेट कोर्टातून नंतर आरोपी पळाला, यालादेखील भरपूर पुरावा आहे आणि म्हणून इं. पी. को. कलम ३०२, ३०७, ३०९ आणि २२४ खाली आरोपी अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूप आझाद हा संशयातीतरीत्या दोषी आहे. आणि म्हणून त्याला मी खालीलप्रमाणे सजा फर्मावतो! order!

(१) सरदार लाभसिंग यांचा तारीख १५ फेब्रुवारी १९५० ला खून केल्याबद्दल आरोपी अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूप आझाद यांना ते मरेपर्यंत फाशी द्यावे.

( Accused should be hanged at neck, till he dies.)

(२) इं. पी. को. कलम ३०७ खाली दोन खुनांचा प्रयत्न केल्याबद्दल सात वर्षे सक्तमजुरी.

(३) इं. पी. को. कलम ३०९ खाली आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला या आरोपाखाली २ वर्षं सक्तमजुरी.

(४) आणि कायदेशीररीत्या अटक होऊनदेखील, मॅजिस्ट्रेट कोर्टातून पळाला याबद्दल सहा महिने सक्तमजुरी!

सर्व शिक्षा एकाच वेळी भोगायच्या आहेत!

आरोपी अमरिकसिंग स्वत: B. A., LL. B. होता! त्याला उत्तम इंग्रजी येत होते! ज्युडिशियल क्लार्कने शिक्षा आरोपीला समजावून सांगण्याचा प्रश्नच नव्हता! न्या. मू. बेदी यांची इंग्रजीतली 'ऑर्डर' ऐकल्याबरोबर त्याने हंबरडा फोडला. फाशी! आरोपी ओक्साबोक्शी रडू लागला. न्यायमूर्ती बेदींना हे दृश्य नवीन नव्हते! अशा अनेक 'बदमाषां'ना त्यांनी आत्तापर्यंत 'पोचवले' होते. मात्र कोर्टात हजर असलेल्या अनेक पामर लोकांच्या हृदयाचा ठोका चुकला! काय हे? किती हृदयभेदक रडतोय हा! अरे! मनुष्य कितीही वाईट असला म्हणून काय झाले? तो कधीच सुधारणार नाही? कालपर्यंत ज्याला आपण इथे आणताना, नेताना, बोलताना, चालताना, हसताना, रडताना पाहिला त्याला लटकवायचा? त्याचा जीव घ्यायचा? फाशी? त्यातले त्यात जे हळवे होते ते आरोपी अमरिकसिंगाचा हंबरडा ऐकून स्वत:च रडायला लागले. तेव्हा कुठे कळले की, प्रत्येक माणसाला केवळ स्वत:च्याच जीवाबद्दल नव्हे तर दुसऱ्या माणसाच्या जीवाबद्दल नाही म्हटले तरी थोडी सहानुभूती असते! न्यायमूर्ती बेदी यांनी जजमेंटवर सही केली आणि त्यानंतर उजव्या हाताच्या आंगठ्याचा दाब देऊन टाक मोडून टाकला. (ज्या टाकाने एका माणसाचा प्राण घेण्याची ऑर्डर दिली, तो टाक पुन्हा कधीही वापरायचा नाही, मोडून टाकायचा, असा सेशन्स कोर्टाचा प्रघात आहे.) आणि ते

त्यांच्या चेंबरमध्ये निघून गेले.

भावनेचा पहिला आवेग संपल्यानंतर आरोपी अमरिकसिंग त्याच्या वकिलांच्या अक्षरश: पाया पडला! डोळ्यांत पाणी आणून त्याने वकीलसाहेबांना सांगितले की, "साहेब ऽ! काही ऽ ही करून माझा जीव वाचवा. मी तुम्हांला तुम्ही सांगाल तेवढे पैसे द्यायला तयार आहे."

अमरिकसिंग आजपासून फाशीचा कैदी होता. इतर कैद्यांपासून त्याला वेगळे काढून खास फाशी कोठीत ठेवण्यात आले. ज्याने अनेकांची झोप उडवली त्या अमरिकसिंगाला रात्री झोप लागत नव्हती! एक एक दिवस कमी होत होता! आणि कधी रात्री झोप लागलीच तर अपरात्री त्याला पहारेकरी उठवीत असे! कारण तुरुंगाचा असा नियम आहे की, ज्याला फाशीची सजा झालेली आहे त्याला खास वेगळा ठेवावा! आणि तो आहे ऽ, का गे ऽ ऽ ला, का मेला ऽ ऽ हे बघण्यासाठी रात्रीतून दोनदा त्याला उठवावा.

...अखेर अमरिकसिंगाच्या वकिलाने मुदतीत पंजाब हायकोर्टामध्ये अमरिकसिंगाच्या शिक्षेविरुद्ध अपील दाखल केले. सदरहू अपील सुनावणीसाठी आले ते पंजाब हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश न्या. मू. जी. डी. खोसला आणि न्यायमूर्ती फॉलशॉ या डिव्हिजन बेंचसमोर!

१४ ऑक्टोबर १९५४! पंजाब हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचपुढे अमरिकसिंगाचे अपील सुनावणीसाठी आले. अमरिकसिंगाच्या वकिलांनी दुपारपर्यंत आर्ग्युमेंट केले आणि अमरिकसिंगाचे अपील अॅडमिट झाले. फक्त एकाच मुद्द्यावर की आरोपी अमरिकसिंग आणि डॉ. अमरस्वरूप आझाद या दोन व्यक्ती एकच आहेत की दोन? अजून पाहा. उगाच कुणाला तरी लटकावू नका!"

न्या. मू. जी. डी. खोसला यांनी खालच्या कोर्टाचे कागदपत्र, पुरावा, जजमेंट काळजीपूर्वक वाचले. त्यांची खात्री पटली की आरोपी अमरिकसिंग इं. पी. को. कलम ३०२, ३०७, ३०९ खाली दोषी आहे हे नक्की. आता फक्त प्रश्न इतकाच आहे हा आरोपी अमरिकसिंग आणि डॉ. अमरस्वरूप आझाद या दोन व्यक्ती एकच आहेत की नाही?

आणि न्या. मू. खोसला यांनी एक अफलातून गोष्ट केली. कायद्याने दिलेल्या स्वत:च्या अखत्यारात त्यांनी बलजीतकौर–अमरिकसिंगाची पहिली पत्नी आणि एस्. सेवासिंग– अमरिकसिंगाचा मेव्हणा यांना कोर्टाचे साक्षीदार म्हणून समन्स काढले. आणि बंदीपालावर हुकूम बजावला की "आरोपी अमरिकसिंग याला ओळख पटवण्यासाठी २५ ऑक्टोबर १९५४ ला पंजाब हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचपुढे हजर करा!" पंजाब हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशांचा हुकूम होता तो! समन्सेस ताबडतोब 'लागली' आणि २५ ऑक्टोबर १९५४ ला आरोपी अमरिकसिंग पिंजऱ्यात बसला होता! बलजीतकौरचे नाव पुकारले



जीव वाचला होता पण......

गेले ! आणि ती साक्ष देण्यासाठी पिंजऱ्यात शिरली. कुठल्या न्यायनिष्ठुर न्यायाधीशापुढे उभी होती बलजीतकौरसारखी सामान्य स्त्री ?

चीफ जस्टिस जी. डी. खोसला. जे स्वत: गांधीवादी होते. विश्ववंद्य महात्मा गांधींचे व्यक्तिगत जीवनात मित्र होते. त्रिखंडात गाजलेल्या महात्मा गांधी खून खटल्यात नथूराम गोडसेचे अपील ऐकून घणाऱ्या बेंचचे मुख्य न्यायाधीश होते. गांधीजींचे मित्र. नथुराम गोडसेवर त्यांचा किती राग असायला हवा होता ? पण नाही ! न्यायासनावर बसल्यावर नथुराम गोडसेची फाशीची शिक्षा कायम करतानासुद्धा नथुरामचे शुद्ध चारित्र्य, त्याचे वक्तृत्व त्याचा बेडरपणा, याची आपल्या जजमेंटमध्ये त्यांनी स्तुती केली. कुणाचीही पर्वा न करता.

अशा ह्या न्यायनिष्ठुर रामशास्त्रीपुढे बलजीत कौर उभी होती ! न्या. मू. जी.

डी. खोसला यांनी बलजीतकौरपुढे एक कोरा कागद ठेवला आणि तिला हुकूम फर्मावला, " बलजीतकौर, या कागदावर तू नेहमी करतेस तशी तुझी सही कर."

बलजीतकौरने सही केली ! आणि काय आश्चर्य ! बलजीतकौरची ती सही आरोपी अमरिकसिंगाकडे मिळालेल्या रेल्वे क्लोक रूमच्या रसीटवर असलेल्या 'बलजीतकौर' या सहीशी तिची सही जुळली !

( The judges, however, observed that her signature, bore a surprisingly striking resemblance to the signature on the receipt ! )

न्या. मू. खोसला यांनी त्यानंतर बलजीतकौरला फर्मावले, " बलजीतकौर, आरोपीकडे पाहा ! नीऽट पाहा ! काळजीपूर्वक पाहा ! आणि सांग, आरोपी अमरिकसिंग हा तुझाच नवरा का ?"

बलजीतकौरने आरोपी अमरिकसिंगाकडे नीट पाहिले ! बराच वेळ पाहिले ! तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. न्यायमूर्तींकडे पाहत तिने नकारार्थी मान हालवली ! नाही. साहेब नाही ! हा माझा नवरा अमरिकसिंग नव्हे ! फौजदारी कोर्टात—विशेषतः हायकोर्टात—साक्षीदार काय बोलला, या बरोबरच साक्षीदाराच्या पिंजऱ्यात तो कसा दिसला, यालाही महत्त्व असते. जर का आरोपी अमरिकसिंग हा बलजीतकौरचा नवरा नव्हता, तर त्याच्याकडे बराच वेळ पाहून नंतर ती का रडली ? आपल्या नवऱ्यासाठी ती खोटे बोलली ! त्यानंतर आले ते एस. सेवासिंग.

" सेवासिंग ! तुम्ही नोकरी कुठे करता ?"

"मी न्याय खात्यात (Judiciary) ज्युडीशियल क्लार्क आहे !"

" मग न्यायखात्यात नोकरी करणाऱ्या माणसाला खरं बोलणं ह्याला किती महत्त्व आहे हे सांगायला नको ! आता खरं सांगा पिंजऱ्यात बसलेला आरोपी हा अमरिकसिंग आहे का अमरिकसिंग नाही ! नीऽऽट पाहून सांगा !"

( ' Are you prepared to say ', he was asked by the division bench, ' definitely whether the appellant present in this court is Amriksingh or not Amriksingh ?"

आणि न्यायमूर्ती जी. डी. खोसलांपेक्षा सेवासिंग जास्त हुशार निघाला. त्याने उत्तर दिले की, " हा माणूस अमरिकसिंगासारखा दिसतो, एवढंच नव्हे तर याचा आवाज अमरिकसिंगाच्या आवाजाशी मिळता जुळता आहे, पण हाच अमरिकसिंग आहे का नाही, हे मी निश्चित सांगू शकत नाही !"

( I cannot say one way or the other ! )

किती झाले तरी एस. सेवासिंग अमरिकसिंगाचा मेव्हणा होता ! दोन्ही साक्षीदारांचा यत्न अमरिकसिंगाला वाचवण्याचाच होता. (Interested witnesses ! )

न्यायमूर्ती खोसला आणि न्यायमूर्ती फॉलशा काय समजायचे ते समजले !

उभय न्यायमूर्तींनी चेंबरमध्ये बसून बराच वेळ विचार केला ! आणि ते दोघेही न्यायमूर्ती या निर्णयापर्यंत येऊन पोचले, की आरोपी डॉ. अमरस्वरूप आझाद आणि अमरिकसिंग या व्यक्ती दोन नव्हेत, एकच आहेत. (हाच तो अमरिकसिंग हा ऽच !) आणि खालच्या कोर्टाने दिलेला निर्णय योग्य आहे. न्या. मू. जी. डी. खोसला यांना आणखी एक मुद्दा सरकार पक्षाच्या बाजूने मिळाला होता. आरोपी अमरिकसिंगाचे नाव काय होते ? अमरिकसिंग तेजसिंग आलुवालिया ! आणि डॉ. अमरस्वरूचे सबंध नाव काय होते ? डॉ. अमरस्वरूप तेजासिंग आझाद. अमरिकसिंगाने नाव बदलूनदेखील आपली आद्याक्षरे (Initials) कायम ठेवली होती. " A. T. A. ! " फक्त बापाच्या नावात थोडा फरक केला ! तेजसिंगच्या ऐवजी तेजासिंग ! माणसाला स्वत:बद्दलच नव्हे तर स्वत:च्या नावाबद्दलदेखील इतका लोभ असतो.

आपला निर्णय उभय न्यायमूर्तींनी अमरिकसिंगाच्या वकिलांना कळवला ! ... आणि आपला अशील अमरिकसिंग याला नव्हे तर जणू काही स्वत:लाच फाशीची शिक्षा झालेली आहे इतक्या कळवळ्याने अमरिकसिंगाच्या वकिलांनी पंजाब हायकोर्टाला दयेचा अर्ज दाखल केला ! आणि कळवळा येऊन कोर्टाला विनंती केली,

(Your Lordships may kindly hear me, before Your Lordships are pleased to pass any order over my application for mercy ! )

(सन्माननीय न्यायमूर्ती ! माझ्या आरोपीमार्फत केलेल्या दयेच्या अर्जाचा निकाल देण्यापूर्वी मी काय म्हणतो ते निदान ऐकून तरी घ्या.)

न्या. मू. खोसला यांनी घड्याळ पाहिले ! पावणे पाच झाले होते ! आधीच वकील ! त्यात बचावाचा वकील. आणि त्यात फाशीची शिक्षा कमी व्हावी म्हणून तो बोलणार. किती बोलेल ? कमीत कमी २ तास ! न्या. मू. खोसला यांनी वकिलाच्या भाषणात व आपल्या ऐकून घेण्यात खंड पडू नये म्हणून तारीख दिली,

( Tomorrow morning ! at 11 A. M. sharp ! ) " उद्या सकाळी ११ वा ! कारण न्या. मू. खोसला यांना ठाऊक होते की, न्यायाला विलंब म्हणज अन्याय. तरीदेखील अमरिकसिंगाचे वकील कमरेत अक्षरश: इंग्रजी L च्या आकाराने वाकले आणि म्हणाले,

" As Your Lordships desire ! " कारण त्यांना मुख्य भीती ही होती की आजच्या आज शेवटच्या पंधरा मिनिटांत आपल्याला भाषण करायला सांगून दयेचा अर्ज फेटाळला गेला तर ? निदान हायकोर्ट ऐकून घ्यायला तरी तयार आहे !

त्या दिवशी रात्री फाशी कोठीत अमरिकसिंग सबंध रात्रभर जागला ! सारखा विचार करीत होता की उद्या आपले भवितव्य ठरणार ! काय होणार ? काय होणार ? मन चिंती ते वैरी न चिंती ! अमरिकसिंगाला सारखे वाटत होते की

आपली फाशी कायम होणार ! अमरिकसिंग रात्रभर फक्त रडला.

——दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता पंजाब हायकोर्टात, अमरिकसिंगाचा दयेचा अर्ज सुनावणीसाठी आला. अमरिकसिंगाचे डोळे सुजून लाल झाले होते. न्या. मू. खोसला यांनी सुरुवातीलाच अमरिकसिंगाच्या वकिलांना सांगितले,

आम्ही दोघांनी तुमचा दयेचा अर्ज कालच वाचला. भाषण सुरू करा……. आणि अमरिकसिंगाचे वकील उभे राहिले !

"सन्माननीय न्यायमूर्ती, अंबाल्याचे सेशन्स जज्ज न्या. मू. वेदी यांनी आरोपी अमरिकसिंग याला दिलेल्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध हे अपील होते आणि त्यावर मिलॉर्ड, आपण उभय न्यायमूर्तींना एकमताने असा निर्णय दिलात की ती शिक्षा योग्य आहे आणि त्यावर मी हा दयेचा अर्ज केला आहे. मिलॉर्ड, माझी अशी प्रामाणिक समजूत आहे की पुरावा असे दाखवतो की दिनांक १४ फेब्रुवारी १९५० ला आरोपी अमरिकसिंग मद्रासहून निघाला. पिस्तुल घेऊन निघाला—— त्या वेळी त्याचा हेतू कुणाचाही खून करण्याचा नव्हता. त्याचा हेतू फक्त जयपालकौरला परत आणणे हा होता ! बघा ऽ ! साक्षीदार असे म्हणतो, की "जिना चढून वर जाणाऱ्या जयपालकौरला आरोपी अमरिकसिंग ओरडून म्हणाला की, जयपा ऽ ल थांब ! अजून सांगतो थां ऽ ऽ ऽ ब ! ' याचा अर्थ काय? जर ती थांबली असती तर कदाचित रिव्हॉल्व्हरमधून गोळ्या सुटल्या नसत्या ! दुसरा मुद्दा बघा मिलॉर्ड ! साक्षीदार असं ही सांगतात की ज्या वेळी हा भीषण प्रकार घडला त्या वेळी अमरिकसिंग त्यांच्या वागणुकीवरून सहज लक्षात येईल इतकी दारू प्यायला होता. मिलॉर्ड ! काही काही लोक इतकी दारू पितात की ते धड चालू शकत नाहीत, धड बोलू शकत नाहीत ! काही फक्त इतपत पितात की ते बोलू शकतात, चालू शकतात. त्या वेळी त्यांना असंच वाटतं की आपण लोकांना बनवलं. आपण पितो हे त्यांना कळलं नाही ! पण मिलॉर्ड, त्या वेळी-देखील असा थोडा पिणारा माणूस त्याच्या स्वतःच्या मूळ स्वभावाप्रमाणे वागत नाही. थोडा वेगळा वागतो. तो बोलायला लागला तर फार बोलतो. लिहायला बसला तर फार लिहितो. मनात इच्छा नसताना कुणाचा तरी उगाच अपमान करतो आणि १–२ तासांनंतर तोच माणूस विचार करतो की, आपण इतकं बोलायला नको होतं, इतकं लिहायला नको होतं ! अमक्या तमक्याचा उगाचच अपमान करायला नको होता ! मिलॉर्ड, आरोपी अमरिक-सिंगाने आपल्या स्वतःवरदेखील दोन गोळ्या मारून घेतल्या होत्या याची दयेच्या अंतःकरणाने दखल घ्या. मिलॉर्ड, एखाद्या माणसाच्या उजव्या हातात ब्लेड देऊन त्याला जर का सांगितलं की तू तुझ्या डाव्या हाताचं बोट कापून दाखव ! तर तो तयार होणार नाही. इथं मात्र आरोपी स्वतःच आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो, का? कारण त्याला पश्चात्ताप झाला म्हणून ! मिलॉर्ड, मेननसारखा

जबाबदार सैन्याधिकारी आपल्या साक्षीत सांगतो की, 'आरोपी अमरिकसिंग हा एक तल्लख बुद्धिमत्तेचा, हुशार एफिशिएंट सिव्हिल गॅझेटेड ऑफिसर आहे. तो आपलं काम फार चांगलं जाणतो! मिलॉर्ड, दैवदुर्विलासाने एखादा बुद्धिमान गुणी माणून दारू प्यायला लागतो तेव्हा त्याच्या ठिकाणी दोन व्यक्तिमत्त्वं असतात. त्याला खरा ओळखायचा, पाह्यचा असतो तो तो दारू प्यायलेला असताना. का! कारण सकाळी दारू उतरल्यावर तो नेहमीच असं म्हणतो की "काल रात्री आपण जे केलं, जे वागलो, बायकोशी उगाच भांडलो ते चांगलं नाही." त्याला कळतं, पण ऽ पण वळत नाही. पण मिलॉर्ड! जोपर्यंत त्याला निदान ते कळतं तोपर्यंत त्याला फाशी देण्याचं कारण नाही. का? कारण कदाचित् पुढेमागे तो सुधारण्याची आशा असते म्हणून! मिलॉर्ड, आणखी एक मुद्दा पाहा. आरोपी अमरिकसिंग याचा कुणाही विशिष्ट माणसाचा जाणून बुजून खून करावा असा उद्देश नव्हता. कारण त्याने जयपालकौरला फक्त एक गोळी मारली. सरदार लाभसिंगांना दोन मारल्या. त्यानंतर ते अठरा तास जिवंत होते! – जर का त्यांच्यावरचं ऑपरेशन यशस्वी झालं असतं तर तेही वाचले असते! त्यानंतर त्याने अमरनाथना फक्त एक गोळी मारली आणि त्यानंतर स्वतःला दोन गोळ्या मारून घेतल्या. हा सर्व प्रकार काय दर्शवितो? हेच की त्या वेळी आरोपी अमरिकसिंग हा अमरिकसिंग तेजसिंग, B. A. LL. B. Gazetted Officer नव्हता! होता तो फक्त मद्यपी अमरिकसिंग! 'तो मी नव्हेच!' असं इतके दिवस आरोपी अमरिकसिंग म्हणत होता ते फक्त या अर्थानं खरं आहे मिलॉर्ड! आणि म्हणून मी अशी नम्र विनंती करतो मिलॉर्ड, की अमरिकसिंगाने जे काही केलं त्या वेळी तो नशेत होता. त्याला पश्चात्ताप झाला म्हणूनच त्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. किती झालं तरी तो एक बुद्धिमान माणूस आहे! शिक्षणाचे संस्कार त्याच्या मनावरून एकदम नाहीसे होणे शक्य नाही. तो अजूनही सुधारण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन त्याची फाशीची शिक्षा कमी करावी, अशी मी नम्र विनंती करतो."

...... आणि आरोपी अमरिकसिंगाच्या वकिलाच्या भाषणाचा परिणाम न्यायमूर्तींच्या मनावर चांगला झाला. आपल्या अखेरच्या निकालपत्रात न्या. मू. खोसला आणि न्या. मू. फॉलशॉ यांनी आरोपी अमरिकसिंग याची फाशीची शिक्षा रद्द करून त्याला जन्मठेपेची सजा फर्मावली.

पंजाबच्या तुरुंगात अमरिकसिंग अजूनही जन्मठेपेची सजा भोगतो आहे. तुरुंगात त्याची वागणूक चांगली असेल तर ह्या वर्षी किंवा पुढल्या वर्षी अमरिकसिंग तुरुंगातून सुटेल! तब्बल १५ वर्षे जन्मठेप भोगून!


## स मा प्त

# खात्रीचा ताईत

मी तुम्हाला एक ताईत देतो. जेव्हां जेव्हां शंका निर्माण होईल किंवा तुमचा स्वार्थ अतिशय बळावेल तेव्हां तेव्हां खालील उपाय योजा. तुम्ही पाहिलेल्या अत्यंत गरीब व अत्यंत लाचार माणसाचा चेहरा आठवा, आणि आपल्या मनालाच विचारा की, तुमचा बेत, त्याच्या काही तरी उपयोगी पडेल काय? आपल्या स्वतःच्या जीवनावर व नशिबावर ताबा ठेवण्याच्या बाबतीत तो बेत त्याला साह्यभूत ठरेल काय? दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, आपल्या देशातील लक्षावधी भुकेल्या लोकांना आणि आध्यात्मिक दृष्ट्या भुकेल्या लोकांना सुद्धा तो बेत स्वराज्य किंवा आत्म-नियमनाच्या मार्गाकडे घेऊन जाईल काय? तेव्हां तुमच्या शंका व तुमची स्वार्थ-वृत्ती नाहीशी होत असल्याचे तुम्हाला दिसेल!



महात्मा गांधी



# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी सायनाचार्य

## फेब्रुवारी १९६९ चे राशी भविष्य

**मेष :** जानेवारी महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातील अनंत शुभयोगांमुळे हा फेब्रुवारी महिना आपणांस अनंत प्रगत घटनांनी भरलेला जाणवेल. साडेसातीचा अनिष्ट काळ आता आपण विसरू शकता.

अंगीकृत कार्ये गती घेऊ लागतील. विरोधक मागील दाराने पसार होतील. अनेकांच्या मदतीचे हात पुढे होऊ लागतील.

नोकरीधंद्याचा प्रश्न हातोहात सुटेल. मंगल कार्यात पुढाकार घेऊन ती यशस्वी करून दाखवावी लागतील. यांत्रिक-विद्युत क्षेत्रात अपेक्षेबाहेर यश मिळू शकेल. प्रकृतीच्या तक्रारी फारशा जाणवणार नाहीत.

दि. ३ ते ७, १४ ते १९, २४ ते २६ अनेक प्रगत घटनांनी भरलेला काळ.

**वृषभ :** सूर्य–बुधादी अनेक ग्रह भाग्यस्थानातून संचारत आहेत. ते आपले सर्व सामर्थ्य पणाला लावून तुमचे जीवन कृतार्थ करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करतील.

गेल्या आठवड्यातच प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात आल्या असतील. या महिन्यात त्या वाटांनी वेगाने वाटचाल सुरू होईल. नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे फार मोठी प्रगती होईल.

व्यवसायक्षेत्रात फार मोठी क्रांती घडून येईल, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभही या महिन्यात होतील.

वाहनाचा–स्थावराचा प्रश्न सुटेल. प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल होतील.

दि. १ ते ५, ७ ते १९, २३ ते २६ नोंद करण्यासारखा महत्त्वाचा काल.

**मिथुन :** हा फेब्रुवारी महिना आपणांस अनेक बाबतींत निर्णायक ठरेल. प्रामुख्याने दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य–बुध भाग्यस्थानी येताच आपल्या अंगीकृत व्यवसायात क्रांती घडून येईल. नव्या आशा अंकुरायला लागतील. दूरच्या प्रवासाचे, बदलीबढतीचे योग स्पष्टपणे दिसू लागतील.

प्रगतीचे नवे क्षेत्र हस्तगत होईल. नोकरीधंद्यासाठी केलेले सर्व प्रयत्न आकार घेऊ लागतील. व्यवसायाचे क्षेत्रफळ वाढीस लागेल.

पहिला पंधरवडा यथातथाच आहे. साहित्याशी घनिष्ठ संबंध येईल.

दि. ३ ते ९, १६ ते २१, २५ ते २८ विशेष यशदायी काल.

**कर्क :** चौथ्या मंगळाची अनिष्टता आता संपल्यासारखीच आहे. दि. ११ ला मंगळाचे वृश्चिक राशीत राश्यंतर घडणार आहे. आता तुमची प्रगती रोखली जाणार नाही.

फेब्रुवारीचा मध्यकाळ तर अनेक चिरस्मरणीय घटनांनी भरलेला जाणवेल. व्यवसायधंद्याचे तंत्र निश्चितच सुधारेल.

राहत्या जागेची विवंचना मिटेल. वादविवाद, व्यावसायिक संघर्ष, अनारोग्य यांचा त्रास आता मुळीच होणार नाही. नोकरीधंद्यातील हुकलेल्या संधी या महिन्यात पुन्हा लाभू लागतील.

दि. ६ ते ९, १३ ते १९, २४ ते २८ अपेक्षित यशाचा काल.

**सिंह :** अजुनही काही काल मंगळ आपल्या पराक्रमस्थानी आहे. दि. ११ ला त्याचे राश्यंतर घडल्याने, काही फारसे बिघडणार नाही. आपली प्रगती अनिर्बंधच राहील.

व्यावसायिक व राजकीय जबाबदाऱ्या वाढू लागतील, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

राहत्या जागेसाठी केलेले प्रयत्न या महिन्यातच यशस्वी व्हावेत. यांत्रिक–विद्युत ही तर तुमची खास क्षेत्रे. त्यांमध्ये काही नेत्रदीपक कार्य करून दाखवण्याची आपणांस संधी लाभेल, नवे स्नेहसंबंध जोडले जातील, प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात येतील.

दि. ६ ते ११, २१ ते २८ या काळी नव्या योजना आकार घेऊ लागतील.

**कन्या :** सूर्य–बुध–गुरू हे सारे ग्रह आपणांस पूर्णत्वाने अनुकूल आहेत. मंगळही आता आपल्या पराक्रमस्थानी प्रकटणार आहे. गुरूच्या कृपादृष्टीचा प्रत्यय याच महिन्यात येणार आहे.

हा महिना फारच घाईगर्दीचा जाणवेल, सामाजिक–राजकीय क्षेत्रांत भाग घ्यावा लागेल.

सभासंमेलने गाजवली जातील. धनिकांचे साहाय्य मिळवून नवा भव्य उद्योगधंदा उभारावा लागेल. आता शनी–राहू सहसा तुमच्या प्रगतीच्या आड येण्याचे साहस करणार नाहीत. तुमच्या सर्वंकष प्रगतीचा हा काल आहे.

दि. १ ते ५, १० ते १७, २३ ते २९ विशेष लाभाचा काळ.

**तूळ :** तुमच्या राशीतून मंगळाचे उच्चाटन होत आहे. आपल्या व्यथा-विवंचना बऱ्याच प्रमाणांत कमी व्हाव्यात. गुरूचे सहकार्य फारसे मिळत नसल्यामुळे कोणतेही

काम यशस्वी करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करावे लागतील.

व्यवसायधंद्यातील मतभेद मिटू शकतील. पैशाविना कोणतीही कामे सहसा नडणार नाहीत. प्रामुख्याने दुसऱ्या पंधरवड्यात सूर्याचे राश्यंतर घडताच अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडून यायला लागेल.

नोकरीतील प्रगतीची लक्षणे स्पष्टपणे दिसायला लागतील. व्यापारधंद्यात मोठ्या प्रमाणांत उलाढाल करावी अशा ऊर्मी उठू लागतील.

दि. ३ ते ७, १३ ते १९, २१ ते २४ नोंद करण्यासारखा काल.

**वृश्चिक :** फेब्रुवारीला मंगळाचे राश्यंतर घडताच आपल्या प्रगतीचा वेग आणखी वाढू लागेल. या महिन्यात जगाच्या नजरा आपणांवर खिळून राहतील असे काही लोकविलक्षण कार्य आपल्या हातून घडेल.

तुमच्या जीवनात जे अनेक सर्वोत्तम प्रगतीचे कालखंड असतील त्यांपैकीच हा एक आहे. सामाजिक क्षेत्रात, यांत्रिक व्यवसायधंद्यात आपण कुठेही गेलात तरी तेथे आपले स्वागतच घडेल.

नवे साहस करण्यास उद्युक्त व्हाल. नोकरीधंद्यात बदल घडवून आणण्यास प्रवृत्त व्हाल. साहित्य-कला या क्षेत्रांतही आवाज उठवाल.

दि. १ ते १०, १८ ते २७ या कालाची नोंद ठेवा.

**धनू :** गेल्या २-३ महिन्यांच्या मानाने या महिन्याची ग्रहस्थिती आपणांस बरीचशी अनुकूल आहे. दि. ११ ला मंगळ पुन्हा व्ययस्थानी येणार आहे आणि तेथेच त्याचे ५-६ महिने वास्तव्य घडणार आहे. यामुळे काही अडीअडचणी वाटू लागतील.

दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य पराक्रमस्थानी येताच तुमची बरीचशी कामे गती घेऊ लागतील, नोकरीधंद्यात स्थानांतर-स्थित्यंतर घडून येण्याची शक्यता दिसू लागेल. प्रगतीकडे मंदगतीने पावले पडू लागतील. औद्योगिक क्षेत्रात पुन्हा आपले आसन स्थिरावेल. हाती पैसा मोठ्या प्रमाणावर यायला लागेल.

दि. ९ ते १६, २१ ते २८ या वेळी अपेक्षित यश लाभावे.

**मकर :** मंगळाचे राश्यंतर घडणे आणि सूर्याच्या अवस्थेत बदल घडून येणे या दोन्हीही अवस्था आपल्या प्रगतीला निश्चितच पोषक ठरणाऱ्या आहेत.

माझ्या या म्हणण्याचा प्रत्यय दि. ६–७ पासून हातोहात येऊ लागेल.

आजवर न होणारी कामे या वेळी भराभर यशस्वी होऊ लागतील, आपल्या प्रगतीच्या आड येणारी विघ्ने पूर्णत्वाने नष्ट होतील.

अनेक चिरंतन स्मृतींच्या घटनांनी भरलेला हा महिना आहे.

अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभ होतील, मंगलकार्याचे निश्चित ठरेल, आपण हाती घेतलेल्या कार्याला अनेकांचा हातभार लागेल.

दि. ६ ते १०, १८ ते २३, २५ ते २८ अपेक्षासाफल्याचे दिवस.

**कुंभ :** शनी-राहूंची अनिष्टता ओसरू लागलेली आहे आणि मंगळाची अनुकूलता अधिकाधिक वाढत आहे. गेल्या कित्येक महिन्यांतील तुमच्या साऱ्या व्यथा-विवंचना पूर्णत्वाने मिटू लागतील.

या महिन्यापासूनच आपल्या अंगीकृत कार्याला विशेष रंगरूप चढू लागेल. प्रगतीच्या नव्या वाटा दिसू लागतील. नोकरीधंद्याचे नवे क्षेत्र निवडले जाईल आणि त्या नव्या वातावरणात अनेक प्रगतिपूर्ण घटना भराभर घडून यायला लागतील.

साहित्य-संशोधन-कला या बाबतींत आपले स्थान निश्चितच उंचावेल.

दि. ३ ते ५, ९ ते १६, २६ ते २८ या काली आपली सारी कामे गती घेऊ लागतील.

**मीन :** आठव्या मंगळाची अनिष्ट कारकीर्द संपुष्टात आल्यासारखीच आहे. दि. ११ ला मंगळाचे राश्यंतर घडताच आजवरच्या आपल्या साऱ्या व्यथा-विवंचना दूर व्हायला लागतील आणि नव्या आशा अंकुरायला लागतील.

दुसऱ्या पंधरवड्यात बदली-बढतीचे योग दिसू लागतील, प्रगतीच्या कक्षा विस्तारू लागतील, उद्योगधंद्याचे क्षेत्र अधिक प्रगतीचे जाणवू लागेल.


कला-साहित्य क्षेत्रांतील व्यक्तींना तर याच्याइतका सर्वांगीण प्रगतीचा काल यापूर्वी कधीच अनुभवण्यास मिळाला नसेल. आजवरच्या भंगलेल्या साऱ्या आशा-आकांक्षा या महिन्यातच सांधल्या जातील.

दि. ९ ते १५, १९ ते २३, २५ ते २८ या काली अनेक लाभ होतील.


पहिल्या बक्षीसाचें रु. २५,००० जिंकून हा रेकॉर्ड मोडा!

लिट्क्विज क्र. ४५

५०,००० रु.



लिट्क्विज विकली मोफत मागवा

प्रवेश-पत्रिका रविवारच्या नवशक्ति मध्यें पहा.

१५ भाषेंत १७५ एजन्ट २५० पत्रांत जाहिरात

लिट्क्विज प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई-७.

# हो ल गा । जे व्हा । ला ल । हो ते

वि. स. वा ळिं बे । मू ल्य । अ ठ रा । रु प ये

लेनिनचे चरित्र रंजक करून सामान्य वाचकांपर्यंत पोहोचविणे हे तसे कठीण आहे. कारण लेनिनच्या व्यक्तित्वाच्या बाजू बऱ्याच असल्या तरी नेपोलियनसारखे थक्क व्हावे असे रंग त्यात नाहीत. तो एका कठीण अशा तत्त्वज्ञानाचा भाष्यकार आहे! 'जागतिक क्रांती होणार नसेल तर रशियावर मी थुंकतो' असे म्हणणारा तो पहिला आणि अखेरचा आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट आहे. पक्षसंघटक आणि क्रांतीला स्थिरता देणारा नेता असेही त्याच्या व्यक्तित्वाचे पदर आहेत. या सर्व गोष्टींमुळे त्याच्या व्यक्तित्वात रोमहर्षक असे नाट्य नाही. तो खडकासारखा भक्कम असला तरी त्याच्या आत कुठे झुळझुळ नाही. एकूण क्रांतिकारकाभोवती जे एक रोमँटिक वलय असते ते लेनिनमागे नाही. तरीही श्री. वाळिंबे यांनी हे चरित्र चांगले वाचनीय केले आहे. लेनिनच्या चरित्रात अपरिहार्यपणे येणारी तत्त्वचर्चा त्यांनी सर्वसाधारण वाचकांना समजेल अशा सोप्या भाषेत केली आहे. त्या चर्चेत कोठेही तत्त्वजडपणा किंवा भाषेचा बोजडपणा आलेला नाही. शिवाय श्री. वाळिंबे यांच्या शैलीमुळेही आवश्यक अशी एक रंगत या चरित्राला आली आहे.

**रविवार केसरी दि. २९ डिसेंबर १९६८**


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**